




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २८ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०








# अकोला देशात सर्वात ऊष्ण,पारा 46.9°C

## यूपीच्या 60 जिल्ह्यांत ऊष्णतेची लाट, वाराणसीच्या रूग्णालयात हीटस्ट्रोक युनिट, बाथटब बसवले

**अकोला/ प्रतिनिधी-**अकोल्याच्या तापमानात मोठी वाढ झाली आहे. तापमानाने उच्चांक गाठला आहे. जिल्ह्यात थेट ४६.९ अंश तापमानाची नोंद झाली आहे. आज अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांत उष्णतेची लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर या भागांना आज ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय.तर नागपूर, चंद्रपूर, भंडारा, बुलढाणा या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आलाय. अकोला जिल्ह्यात सलग ३ दिवसांपासून ४५ अंशापार तापमान पोहोचले आहे.नागरिकांना स्वतःची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आलं आहे. मागील पाच वर्षातील एप्रिल महिन्यातील अकोल्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. ४६.९ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदवले गेले. यापूर्वी एप्रिल महिन्यातील आतापर्यंतचे सर्वाधिक तापमान ४७.७ इतके अकोला येथेचं २०१९ मध्ये नोंदले गेले होते. आता पुन्हा यंदा अकोल्याच्या तापमानाचा पारा एप्रिल महिन्यात ४७ अंशाच्या जवळपास पोहोचला.




*__नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर/लखनौ/वृत्तसंस्था :__देशात भीषण उष्णता वाढत आहे. ईशान्य भारताचा अपवाद वगळता, भारतातील बहुतेक राज्यांमध्ये कमाल तापमान ४०°C ते ४६°C दरम्यान राहिले आहे. रविवार रोजी यूपी, राजस्थान आणि महाराष्ट्रातील ७ शहरांमध्ये तापमान ४६°C च्या वर गेले. आज यूपीच्या ६० जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा (लू) इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील अकोला येथे सर्वाधिक ४६.९°C तापमान नोंदवले गेले. त्यानंतर अमरावती (महाराष्ट्र) मध्ये ४६.८°C, बांदा (यूपी) मध्ये ४६.६°C, वर्धा (महाराष्ट्र) आणि बाडमेर (राजस्थान) मध्ये ४६.४°C, जैसलमेर (राजस्थान) आणि यवतमाळ (महाराष्ट्र) मध्ये ४६°C तापमान होते. मध्य प्रदेशातील खजुराहो येथे प्रथमच तापमान ४५°C पर्यंत पोहोचले. इंदूर-भोपाळमध्ये पारा ४३°C होता. तर, उत्तराखंडमधील डेहराडूनमध्ये उष्णतेच्या लाटेमुळे (हीटवेव) आजपासून १ ली ते १२ वी पर्यंतच्या शाळा आणि अंगणवाडी केंद्रे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बिहारमधील ११ जिल्ह्यांमध्ये रविवारी पारा ४०°C च्या वर गेला. आरा येथे भीषण उष्णतेमुळे एका खाजगी शाळेतील महिला कर्मचा-याचा मृत्यू झाला. पाटणा येथील प्राणीसंग्रहालयात प्राण्यांसाठी १७ कूलर आणि ११ एसी लावण्यात आले आहेत.*

### अमरावती जिल्हा होरपळला

अमरावती जिल्ह्यामध्ये सूर्य अक्षरशः आग ओकतोय. जिल्ह्यात एप्रिल महिन्यात तापमानांचे उच्चांक होत आहे. काल अमरावतीचे तापमान ४६.८ नोंदवण्यात आल्याने वर्षातला सर्वात हॉट दिवस ठरलाय. तर राज्यात अकोला आणि अमरावती या दोन्ही जिल्ह्यात सर्वाधिक तापमानाची नोंद सुद्धा झाली आहे. तर हा उष्णतेचा पारा ४७अंश डिग्री सेल्सिअस वर जाईल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तविला आहे.

### वर्ध्यातही ४६.४ तापमान

वर्धा जिल्ह्याच्या तापमानाचा पारा पुन्हा वाढला आहे. तापमानाचा पारा हा ४६.४ अंशावर पोहचला आहे. तसेच आज मंगळवारी तापमान आणखी वाढणार असल्याची शक्यता आहे. सोमवारी जिल्ह्याचे तापमान ४६.४ अंशावर होते, हा तापमान तीस वर्षानंतर पुन्हा उच्चाक गाठलाय. वर्ध्याला उष्णतेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून तापमान पुन्हा वाढणार आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

परतवाडा लैंगिक शोषण व व्हिडिओ कांड

# आरोपी अयानसह ४ जणांना न्यायालयीन कोठडी

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा येथील लैंगिक शोषण आणि आक्षेपार्ह चित्रफिती प्रसारित करण्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी अयान अहमद याच्या सह पाच आरोपींना आज सोमवार २७ एप्रिल रोजी न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर ४ जणांना न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली. पण, यात आरोपी उजैर खान इक्बाल खान याला पोलिसांनी दुसऱ्या गुन्ह्यात ताब्यात घेतले आहे. यामुळे तो चौकशीच्या फेऱ्यात पुन्हा अडकणार आहे. आतापर्यंत दोन मुली तक्रार देण्यास समोर आल्या असल्या, तरी पोलिसांसमोर तपासाची व्याप्ती वाढवण्याचे आव्हान आहे. परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी अयान अहमद तन्वीर अहमद, उजैर खान इक्बाल खान, मो. साद मो. साबिर, एहफाज खान मन्सूर खान आणि तरबेज खान तसलीम खान यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली होती. आज सोमवारी पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्यांना अचलपूर येथील न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी वकिलांनी अधिक तपासासाठी आरोपींना पोलीस कोठडी देण्याची विनंती न्यायालयात केली. पण, न्यायालयाने या पाचही जणांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. त्यामुळे त्यांना कारागृहात पाठविण्यात आले आहे. आरोपी क्रमांक २ उजैर खान हा परतवाडा येथील एका १६ वर्षीय मुलीशी सातत्याने संपर्क साधत होता. ही बाब पीडित मुलीच्या पालकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी उजेर खान याला समजावून सांगितले होते. परंतु त्यानंतरही त्याने पीडित मुलीला मोबाइलद्वारे संपर्क करणे सुरू ठेवले. ही बाब पीडित मुलीच्या पालकांच्या निदर्शनास आली. त्यामुळे पीडित मुलीच्या आईने १९ एप्रिल रोजी परतवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी उजैर खानविरुद्ध स्वतंत्र गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात उजैर खान याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

**दुसऱ्या प्रकरणात उजेर खान ताब्यात**




### पिडितांनी तक्रारीसाठी यावे समोर

या प्रकरणात गोपनीय पद्धतीने पीडितांशी संपर्क साधून त्या तक्रार देण्यास पुढे येण्यासाठी प्रयत्न करावेत आणि डिजिटल डिव्हाइसमधून प्राप्त झालेल्या डेटाच्या तांत्रिक व फॉरेन्सिक विश्लेषणावर भर द्यावा, अशा सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाल्या आहेत. त्या दृष्टीने विशेष तपास पथक काम करीत असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. पीडित मुलींनी कोणत्याही दडपणाला किंवा भीतीला बळी न पडता धैर्याने समोर येऊन आपला जबाब नोंदवावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# ऊष्णतेची लाट ‘वैद्यकीय आणीबाणी’

## खबरदारी घेण्याचा सार्वजनिक आरोग्य विभागाचा इशारा; मेडिकल ॲडव्हायझरी जारी

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्याच्या अनेक भागात सूर्यआग ओकत आहे. अतिउष्माघातामुळे अनेकजण आजारी पडत आहेत. पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहाणार आहे. त्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाने अतिउष्माघात ही वैद्यकीय आणीबाणी असल्याचा इशारा राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दिला आहे. राज्यातील अतिउष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मेडिकल ॲडव्हायझरी जारी केली असून उष्माघातामध्ये कोणती काळजी घ्यावी याचा सल्ला राज्यातील जनतेला दिला आहे. तहान लागली नसली तरीही शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्या. तहान लागणे हे निर्जलीकरणाचे लक्षण आहे. प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवा, ओरल रिहायड्रेशन सोल्युशन( ओआरएस) आणि लिंबूपाणी, ताक, लस्सी, यासारखे घरगुती पेय वापरा, थोडेसे मीठ घालून फळांचा रस घ्या. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर इतर उपलब्ध फळे आणि भाज्या यासारख्या पाण्याचे प्रमाण असलेली हंगामी फळे आणि भाज्या खा. पातळ सैल, सुती कपडे, शक्यतो फिक्ट रंगाचे कपडे घाला. डोके, झाकून ठेवा. थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असताना छत्री, टॉवेलने डोके झाकून ठेवा. सूर्यप्रकाशात-उन्हात बाहेर जाताना बूट किंवा चप्पल घाला. लहान मुले आणि बालके, घराबाहेर काम करणारे लोक, शारिरिकदृष्ट्या आजारी, खास करून हृदयरोग आणि उच्चरक्तदाबाचे रुग्ण, गर्भवती महिला, मानसिक आजार असलेल्या व्यक्ती. एकटे राहाणारी वृध्द, आजारी व्यक्तींची काळजी घ्यावी. तुमचे घर थंड ठेवा, पडदे, शटर किंवा सनशेड वापरा, रात्री खिडक्या उघड्या ठेवा. दिवसा खालच्या मजल्यावर राहाण्याचा प्रयत्न करा. शरीर थंड करण्यासाठी पंखे, स्प्रे बाटल्या. ओले कापड, बर्फाचा वापर करा. २० अशी सेल्सिअस असलेल्या पाण्यात घोट्यापर्यंत पाय बुडवल्याने निर्जलीकरण आणि थर्मल अस्वस्थता कमी होउन जलद थंडावा मिळतो.



# वेगळ्या घोषणेची गरज नाही, भारत आधीपासूनच हिंदूराष्ट्र-मोहन भागवत

## अयोध्या मंदिराच्या बांधकामाच्या देशभरातील ३० सारथ्यांचा संघस्थानी सम्मान, मुस्लिम व्यक्तीलादेखील संघस्थानी निमंत्रण

**नागपूर/प्रतिनिधी :** अयोध्येत श्रीराम मंदिर बांधले जाईपर्यंत, भारत एक हिंदू राष्ट्र आहे या दाव्यावर लोक हसायचे. मात्र आज तेच लोक म्हणत आहेत की भारत हा हिंदूंचा देश आहे. त्यांनी आम्हाला तशी घोषणा करायला सांगतात. मात्र असे काही घोषित करण्याची गरज नाही; भारत अगोदरपासूनच हिंदू राष्ट्र आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी केले. अयोध्या येथील श्रीराम मंदिराच्या बांधकाम प्रक्रियेत मौलिक भूमिका पार पाडणा-या देशभरातील मान्यवरांचा सोमवारी नागपुरात त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या डॉ.हेडगेवार स्मृतिमंदिर परिसरातील महर्षी व्यास सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला गोविंददेव गिरी महाराज, डॉ.हेडगेवार स्मारक समितीचे अध्यक्ष सुरेश उर्फ भैय्याजी जोशी उपाध्यक्ष श्रीधर गाडगे प्रामुख्याने उपस्थित होते. अयोध्येतील श्रीराम मंदिर कल्पनेपेक्षाही अधिक भव्य बांधले गेले आहे. आता आपणदेखील जगात धर्माची स्थापना होउ शकेल असे भव्य काम केले पाहिजे. आज जगाला ज्याची गरज आहे, ती केवळ भारतच पूर्ण करू शकेल. दुसरा कोणताही देश भारताला वाचवणार नाही. भारतच स्वतःच्या भरवशावर प्रगती करेल आणि संपूर्ण जगाला वाचवेल. आपण त्याच्या पूर्ततेसाठी पूर्ण योगदान दिले पाहिजे. आज अनुकूलता दिसते आहे. अनकुलतेमुळे आराम मिळतो. मात्र ती सर्वात धोकादायक गोष्टदेखील आहे व तिला नाकारता येत नाही. रामराज्य केवळ राजामुळेच साध्य होत नाही; ते प्रजेमुळेही होते हे लक्षात ठेवले पाहिजे, असे सरसंघचालक म्हणाले.

**मुस्लिम व्यक्तीलादेखील निमंत्रण -** अयोध्येतील मंदिरातील सिंहासन बनविण्याची जबाबदारी रमजानभाई या मुस्लिम व्यक्तीकडे होती. त्यांनादेखील या सत्कारासाठी निमंत्रण देण्यात आले होते. मात्र व्यक्तिगत कारणांमुळे ते या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर देशात झाले परिवर्तन** -छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर देशात बदलाची प्रक्रिया सुरू झाली. मुघल साम्राज्याचा अंत झाला. ब्रिटिशांचे आगमन सुरू झाले होते. पण संघर्षाचा काळ जवळजवळ संपला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर बदलाची प्रक्रिया सुरू च राहिली आणि भारताने टप्प्याटप्प्याने प्रगती केली, असे भैय्याजी जोशी म्हणाले.

**यांचा झाला सत्कार-**पंतप्रधानांचे माजी सल्लागार नृपेन्द्र मिश्र, गोविंददेवगिरी महाराज, चम्पत राय, जगदीश आफळे, गिरीश सहस्त्रभोजनी, जगन्नाथ गुळवे, आशिष सोमपुरा, निखिल सोमपुरा, अरु ण योगिराज, जय काकतीकर, मनिष त्रिपाठी, सत्यनारायण पांडे, अनिल सुतार, केशव शर्मा, विनोद शुक्ला, राजीव दुबे, मनिष दाधीच, विनोद मेहता, अंकुर जैन, राजूकुमार सिंह, ए. व्ही. एस्. सूर्या श्रीनिवास, नरेश मालवीय, परेश सोमपुरा, नाथ अय्यर, संजय तिवारी, शरद बाबू , अनिल मिश्र, गोपाल, वासदेव कामत यांचा यावेळी सत्कार झाला.

# अमरावतीतील ईडब्ल्यूएस भूखंड प्रकरणाची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी

■ विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे ■15 दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :**अमरावती शहरातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) आरक्षित भूखंड अन्य नागरिकांना विक्री झाल्याच्या आरोपांबाबत सखोल चौकशी करावी. तसेच यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून १५ दिवसांच्या आत अहवाल सादर करावा, असे निर्देश विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये विधानपरिषद सदस्य अनिल परब यांच्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस विधान परिषदेचे सदस्य अनिल परब, अप्पर मुख्य सचिव-महसूल विकास खारगे, सहसचिव सत्यनारायण बजाज, अवर सचिव विनायक लवटे, अमरावती तहसीलदार विजय लोखंडे उपस्थित होते तर अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. बैठकीत सदस्यांनी मांडलेल्या मुद्द्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या प्रकरणात काही अनियमितता झाल्याची शक्यता यावेळी अतिरिक्त मुख्य सचिव-महसूल विकास खारगे यांनी व्यक्तकेली. तसेच वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी सखोल तपासाची आवश्यकताही स्पष्ट केली. ईडब्ल्यूएस प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी राखीव भूखंड इतरांना देण्यात आल्याच्या तक्रारींची चौकशी करून सत्यता तपासावी, असे आदेश सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले. या चौकशीसाठी आवश्यक त्या यंत्रणांचा समावेश करून संपूर्ण तपास विभागीय आयुक्त यांचेमार्फत करण्यात यावा. चौकशीअंती दोषी आढळणा-यांवर नियमांनुसार कडक कारवाई करु न तातडीने १५ दिवसात अहवाल सादर करावा, असेही सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

# बिर्याणीनंतर कलिंगड खाल्ल्याने विषबाधा; एकाच कुटुंबातील 4 ठार

**मुंबई /प्रतिनिधी-** मुंबईतील पायधुनी परिसरातून एक मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. रात्रीच्या जेवणानंतर कलिंगड खाल्ल्यामुळे झालेल्या विषबाधेतून एकाच कुटुंबातील चार सदस्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये पती-पत्नी आणि त्यांच्या दोन मुलांचा समावेश आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. तसेच अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २५ एप्रिल रोजी रात्री १०.३० च्या सुमारास अब्दुल्ला डोकाडिया (४०), त्यांच्या पत्नी नसरीन (३५), मुलगी आयशा (१६) आणि जैनब (१३) यांनी आपल्या नातेवाईकांसोबत रात्रीचे जेवण केले होते. या जेवणात बिर्याणीचा बेत होता. हे जेवण आटोपून त्यांचे नातेवाईक आपापल्या घरी निघून गेले.



त्यानंतर रात्री १ ते १.३० च्या सुमारास कुटुंबातील या चारही सदस्यांनी कलिंगड खाल्ले. त्यानंतर काही तासांनी या चौघांची प्रकृती बिघडण्यास सुरु वात झाली. यानंतर २६ एप्रिल रोजी पहाटे ५.३० ते ६ च्या दरम्यान कुटुंबातील सर्वांना उलट्या आणि जुलाबाचा तीव्र त्रास सुरू (पान २ वर)

# वंदे भारत ट्रेनचा डबा घसरला

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कडून सोलापूरला निघालेल्या २२२२५ वंदे भारत एक्स्प्रेसला पुणे रेल्वे स्थानकात अपघात घडला. रेल्वेच्या चौथ्या डब्याची एक ट्राली रुळावरून घसरली. रेल्वेने पुणे रेल्वे स्थानकात प्रवेश करताच ही ट्राली स्थानकाच्या डायमंड क्रासिंगवर रु ळावरू न घसरली. संयकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. महत्वाचे म्हणजे, या घटनेत कुणालाही दुखापत झालेली नाही. सर्व प्रवासी सुरक्षित असल्याचे समजते. पुणे रेल्वे स्थानकाच्या यार्ड रिमॉडेलिंग अंतर्गत क्रासिंग अपग्रेड करण्याचे काम नियोजित आहे. त्याच दरम्यान हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रेनचे केवळ एक चाकच डायमंड क्रासिंगवर घसरले आहे. ती डायमंड क्रासिंग लगेचच बदलण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. खरेतर, देशभरातील अशा सर्व नॉन स्टॅन्डर्ड डायमंड क्रॉसिंग बदलण्यात येत आहेत.या अपघातामुळे प्रवाशांचा खोळंबा होउ नये, यासाठी रेल्वे प्रशासनाने तत्परता दाखवत त्यांच्या सोयीसाठी, त्यांची दुस-या रेल्वे संचात व्यवस्था करण्यात आली. जेणेकरू न त्यांना आपल्या पुढील प्रवासासाठी रवाना होता येईल. या घटनेमुळे पुणे स्थानकावरील इतर गाड्यांच्या वेळापत्रकावर किंचित परिणामही होउ शकतो.

# न्यायाची अपेक्षा उरली नाही

## केजरीवाल यांचा बहिष्कारासह ‘सत्याग्रहा’चा एल्गार!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**दिल्ली मद्य धोरण प्रकरणातील कायदेशीर लढाई आता एका अत्यंत नाट्यमय वळणावर येउन पोहोचली आहे. आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्या न्यायालयावर थेट अविश्वास व्यक्त करत सुनावणीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. आता न्यायाची कोणतीही अपेक्षा उरलेली नाही, असे म्हणत केजरीवाल यांनी कायदेशीर प्रक्रियेऐवजी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्याचे जाहीर केले आहे.



दिल्ली मद्य धोरण प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने केजरीवाल यांची निर्दोष मुक्तता केली होती, ज्याला सीबीआयने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्या पीठासमोर सुरू आहे. केजरीवाल यांनी यापूर्वीच या पीठावर पक्षपातीपणाचा आरोप करत न्यायमूर्तींनी स्वतःला या प्रकरणातून वेगळे करावे अशी याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावली. न्यायालयाला लिहिलेल्या पत्रात आणि आपल्या भूमिकेत केजरीवाल यांनी काही खळबळजनक दावे केले आहेत. न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित संस्थांच्या कार्यक्रमांना अनेकदा उपस्थित राहिल्या आहेत, असा आरोप केजरीवाल यांनी केला. आम्ही ज्या विचारधारेचा विरोध करतो, त्याच विचारधारेशी संबंधित कार्यक्रमांत न्यायमूर्ती सहभागी होतात, मग आम्हाला न्याय कसा मिळणार?असा सवाल त्यांनी उपस्थित केला. न्यायमूर्तींची मुले केंद्र सरकारच्या वकील पॅनेलमध्ये (पान २ वर)

# बोगस बियाणे रोखण्यासाठी सरकारची कडक नियमावली

## बियाण्यांची नोंद ठेवण्यासाठी साथी पोर्टलचा वापर बंधनकारक!

### कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :**शेतक-यांना दर्जेदार आणि गुणवत्तापुर्ण बियाणे उपलब्ध व्हावे यासाठी येत्या खरीप हंगामापासून बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार आहे. बियाणे कायदा व बियाणे नियंत्रण आदेशांचे काटेकोर न केल्यास व शेतक-यांना बनावट व निकृष्ट बियाणे दिल्यास उत्पादक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे. तसेच बियाण्यांची नोंद ठेवण्यासाठी साथी पोर्टलचा वापर बंधनकारक करण्यात आला असून बियाणे उत्पादक ते शेतकरी या संपूर्ण प्रक्रियेत बियाण्यांची नोंद डिजिटल साखळीच्या स्वरू पात करण्यात येणार आहे. शेतकरी हित हेच सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

आज पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांच्या खरीप हंगाम पूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेत आगामी हंगामासाठीची पूर्वतयारी, बियाण्यांचे नियोजन, उपलब्धता व वितरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



यंदा संभाव्य एल निनो पार्श्वभूमीवर पाण्याचा ताण सहन करणारे व कमी कालावधीतील वाढणारे वाण उपलब्ध करु न द्यावेत. तसेच जिल्हानिहाय पीक नियोजन मजबूत करु न जर पेरणी उशीरा झाली तर पर्यायी पीक नियोजन तयार करा अशा सुचनाही कृषी मंत्र्यांनी विभागाला दिल्या. याप्रसंगी कृषी राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद महासंचालक राहुल रंजन महिवाल, संचालक रफिक नाईकवाडी, संचालक सुनिल बोरकर, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी, गुणवत्तापूर्ण बियाण्यांमुळे उत्पादनात साधारणतः १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ होउ शकते, हे लक्षात घेता प्रमाणित व दर्जेदार बियाण्यांची शंभर टक्के उपलब्धता असल्याची खात्री करणं आवश्यक असल्याचे सांगितले. राज्यात यंदा १४५.२० लाख हेक्टर पेरणी क्षेत्र अपेक्षित असून त्यानुसार पिकनिहाय बियाण्यांची गरज निश्चित करण्यात आली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, खरीप २०२६ साठी राज्याची एकूण बियाणे गरज २०.१६ लाख क्विंटल इतकी असून, सध्या सुमारे २८.१४ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहे. म्हणजेच गरजेच्या सुमारे १४० टक्के साठा उपलब्ध असून बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अचलपुरात धीरेंद्र शास्त्री विरोधात काँग्रेसचे आंदोलन



**अचलपूर/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराजांविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ अचलपूर तालुका व परतवाडा- अचलपूर शहर काँग्रेसच्या वतीने तहसील कार्यालय अचलपूर येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार सुदर्शन शहारे यांना निवेदन देत धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करून महाराष्ट्रात कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी करण्यात आली.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी यावेळी संतप्त भावना व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून त्यांच्या संदर्भात चुकीचे वक्तव्य करून त्यांचा अवमान करण्यात आल्याचा आरोप केला. या पार्श्वभूमीवर आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निषेध नोंदविला.तसेच संबंधित कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत उपस्थित असतानाही या वक्तव्याचा निषेध न केल्याचा आरोप करत काँग्रेसने भाजप व संघावरही टीका केली.दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'धीरेंद्र शास्त्रीवर गुन्हा दाखल करा', 'बागेश्वरला महाराष्ट्रात बंदी घाला' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

या आंदोलनात काँग्रेस अचलपूर शहर अध्यक्ष श्रीकांत झोडपे, परतवाडा शहर अध्यक्ष राहुल

गवई, सेवादल अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष राहुल गाठे, माजी उपसभापती श्रीधरराव काळे, नगरसेवक साईंद भाई मौलाना, मोहम्मद अकबर सर, लकी अहमद, सौरभ भोजने, अरविंद नेतनराव, गोलू जमानिक, संजय बोचरे, एजाज खान, स्वप्नील बोबडे, प्रवीण हागोने, विशाल खानझोडे, प्रमोद पांडे, राहुल अपाले, दीपक मसराम, मनोहर कोथंळकर, सुनील दौलतानी, सुरज दामले, उज्वल दाभाडे, रुपेश जावंजाळ, पियुष दाभाडे, रितेश दामले, सरफाराज खान, संघेश गावंडे, बाबू लहाने, जय घोरे, अब्दुल मजीद यांच्यासह युवक काँग्रेस, सेवादल, अनुसूचित जाती व ओबीसी विभागाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्याचा निषेध

## अमरावतीत प्रहार आक्रमक, धीरेंद्र शास्त्रींच्या पोस्टरला मारले जोडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या बेताल वक्तव्याचे पडसाद आता उमटू लागले आहेत. इतिहासाची मोडतोड करून जनतेच्या भावना दुखावल्याचा आरोप करत, आज सोमवार २७ एप्रिल रोजी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने अमरावतीत तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी धीरेंद्र शास्त्री यांच्या पोस्टरला जोडे आणि चप्पल मारून आपला संताप व्यक्त केला.

धीरेंद्र शास्त्री महाराजांनी नागपूर येथील एका कार्यक्रमात शिवाजी महाराजांबद्दल बेताल वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे जनतेच्या भावना दुखावल्या आहे. ही दुसरी वेळ आहे जेव्हा त्यांनी महाराजांबद्दल बेताल वक्तव्य केले आहे. मुख्यमंत्री यांनी धीरेंद्र शास्त्री यांच्या वक्तव्याला कुठलाही ऐतिहासिक संदर्भ नसल्याचे माध्यमांसोबत बोलताना जाहीर केले आहे. याचा अर्थ ते विधान खोटे असल्याचे स्पष्ट होत आहे. शिवाजी महाराज महाराष्ट्र नव्हे तर अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत आहे. महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे. शिवाजी महाराजांबद्दल ज्यांना माहिती नाही आहे त्यांना त्यांच्याबद्दल काहीही बोलण्याचा अधिकार नाही. त्यामुळे धीरेंद्र शास्त्री यांच्यावर गुन्हा दाखल करून महाराष्ट्रात बंदी करण्याची मागणी प्रहार ने केली आहे. जोडे मारो आंदोलन करणाऱ्यांमध्ये महानगर प्रमुख बंटी रामटेके, जितू दुधाने, प्रशांत देशमुख, श्याम इंगळे, शेख अकबर भाई, निलेश लंगोटे, विक्रम शेगोकार, मधुकर मुले, शेषराव धुळे, मनीष देशमुख, रतन गिरी, नितीन नाचडे, अर्जुन अवशीकर, निरंजन ठाकरे, नंदू वानखडे, अजय तायडे, कुणाल खंडारे, विक्रम जाधव, कविता भूसूम, शुभांगी बावणे, पूजा तेलमोटे आदिंचा सहभाग होता.



# अंधश्रद्धेच्या जाळयात अडकवून महिलेवर अत्याचार-दोन आरोपी अटकेत




अमरावती/प्रतिनिधीः-

नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ३५ वर्षीय महिलेची मानसिक अवस्था आणि मजबुरीचा फायदा घेत अंधश्रद्धेच्या माध्यमातून फसवणूक व अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तुटलेले लग्न पुन्हा जुळवून देण्याचे आमिष दाखवत महिलेचे आर्थिक व लैंगिक शोषण करण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी रियाजुद्दीन (वय ४५) व वसीम (वय ३२) या दोघांना अटक केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचे सुमारे एक वर्षापूर्वी लग्न तुटले होते. संबंधित तरुणाने तिचा मोबाईल क्रमांक ब्लॅकलिस्टमध्ये टाकल्याने ती मानसिक तणावाखाली होती. काही दिवसांपूर्वी रस्त्यावर तिची रियाजुद्दीन याच्याशी ओळख झाली. महिलेने त्याच्या मोबाईलवरून संबंधित तरुणाला संपर्क करण्याचा प्रयत्न केला, त्यातून आरोपीला तिची संपूर्ण परिस्थिती समजली. महिलेची अडचण ओळखून रियाजुद्दीनने तिला जाळ्यात ओढले. त्याने वसीम नावाच्या व्यक्तीमार्फत 'विशेष पूजा' व तंत्र-मंत्र करून तुटलेले लग्न पुन्हा जुळवून देता येईल, असा विश्वास दिला. या आमिषाने वसीमने महिलेकडून सुमारे २५ ते ३० हजार रुपये उकळले. दरम्यान, रियाजुद्दीनने महिलेच्या घरी ये-जा वाढवून तिच्या एकटेपणाचा फायदा घेत तिच्यावर बलात्कार केला. आरोपींचा छळ असह्य झाल्यानंतर पीडित महिलेने धाडस करून नांदगावपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोन्ही आरोपींविरुद्ध बलात्कार तसेच अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. आरोपींचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून ते न्यायवैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# दर्यापूरात मध्यरात्री तळोकार ज्वेलर्समध्ये चोरीचा प्रयत्न

## सिक्युरिटी सायरन वाजल्याने चोरटे पळाले



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील गौरक्षण चौक येथे असलेल्या तळोकार ज्वेलर्स मध्ये रात्री तीन ते साडेतीन च्या वाजताच्या दरम्यान चोरीचा प्रयत्न फसला. दहा ते बारा चोरट्यांनी शटर फोडण्याचा प्रयत्न केला. दुकानाचे शटर, खालील स्टाईल फोडून लॉक तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र दुकानात लावलेले आतील सिक्युरिटी सायरनला काहीतरी टच झाल्याने तो वाजला. सायरनचा आवाज इतका मोठा होता की चोरटे धूम ठोकून पळाले. समोरच जयस्तंभ चौक येथे पोलिस पेट्रोलिंग गाडी नेहमी रात्री उभी असते. हाकेच्या अंतरावर पोलिसांची गाडी असून सुद्धा चोरट्यांचे चोरी करण्याचं धाडस दिसून आल्यामुळे चोराना भीती उरली नाही का? असा प्रश्न आता शहरातील नागरिकांना पडला आहे.

# अवैध दारू तस्करी प्रकरणात दोघांना अटक



अमरावती/प्रतिनिधीः-

गुन्हे शाखेने गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू तस्करी करणाऱ्या दोघांना अटक करून त्यांच्याकडून दारूसह वाहन असा एकूण ७९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई सोमवार, २७ एप्रिल रोजी करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे प्रथम गौतम धाडसे व राम भगवानदास अहिरवार अशी आहेत.

गुन्हे शाखेचे पथक गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना एका तरुणाकडून मोपेडवरून अवैध दारूची तस्करी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित वाहन अडवले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १४ हजार रुपये किमतीच्या गावठी दारूच्या तीन पेट्या तसेच ४ हजार ८०० रुपये किमतीची आणखी एक पेटी आढळून आली. पोलिसांनी दारूसह मोपेड जप्त केली असून जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ७९ हजार २०० रुपये इतकी आहे. घटनास्थळी पकडलेल्या आरोपी प्रथम धाडसे याच्याकडे दारूच्या मालकीबाबत चौकशी केली असता, ती दारू राम भगवानदास अहिरवार याची असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करून मुख्य आरोपी राम अहिरवार याला ताब्यात घेतले. या प्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# अवैध १३ तंबाखू विक्रेत्यांकडून दंड वसूल



रुग्णालयाचा राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, सिटी कोतवाली पोलीस स्टेशन आणि संभाजीनगर येथील मराठवाडा ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त पथकाने ही मोहीम राबवली. शहरातील गांधी चौक, अंबादेवी मंदिर परिसर, राजकमल चौक आणि श्याम चौक या १३ विक्रेत्यांकडून ४ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्री करणाऱ्यांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कडक कारवाई सुरूच राहणार आहे.

# दिव्यांगांना तालुकास्तरावरच मिळणार दिव्यांग प्रमाणपत्र

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील दिव्यांगांच्या सोयीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता दिव्यांगांना प्रमाणपत्रासाठी जिल्हा मुख्यालयात येण्याची गरज भासणार नाही. ही सुविधा लवकरच तालुकास्तरावर उपलब्ध करून दिली जाणार आहे.

उपजिल्हा रुग्णालय अचलपूर, धारणी, मोर्शी, दर्यापूर आणि ग्रामीण रुग्णालय चांदूर बाजार, तिवसा येथे कायमस्वरूपी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव 'आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे' यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळताच संबंधित केंद्रांना 'युडीआयडी' पोर्टलचे लॉगिन आयडी व पासवर्ड दिले जातील. त्यानंतर तालुकास्तरावरच प्रमाणपत्र वाटप सुरू होईल.

जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत सन २०२२ ते २०२५ या कालावधीत आयोजित शिबिरांद्वारे एकूण २ हजार ४७३ दिव्यांग प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील दिव्यांगांना अमरावती शहरात येण्या-जाण्याचा होणारा त्रास आणि खर्च वाचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

दिव्यांग प्रमाणपत्र, आजाराचे प्रमाणपत्र किंवा वृद्धांच्या वयाचा दाखला देण्यासाठी शासन स्तरावरून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. ही प्रक्रिया पूर्णतः मोफत आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही दलालांच्या आमिषाला बळी पडू नये. कोणी पैशांची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांच्याकडे तक्रार करावी, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विनोद पवार यांनी कळविले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

### बिर्याणीनंतर कलिंगड खाल्ल्याने

झाला. प्रकृती चिंताजनक झाल्यामुळे त्यांना तातडीने जे.जे. रु ग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्रकृती अधिकच खालावली. यावेळी सर्वात आधी जैनब (१३) यांचा सकाळी १०.१५ वाजता मृत्यू झाला. त्यानंतर दिवसभरात पत्नी आणि मोठी मुलगी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर रात्री १०.३० च्या सुमारास कुटुंबप्रमुख अब्दुल्ला यांनीही प्राण सोडले.

**पोलिस तपास सुरु -**प्राथमिक संशयानुसार, बिर्याणी आणि कलिंगड यांच्या एकत्रित सेवनामुळे ही विषबाधा झाली असावी, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. मात्र, पोलिसांनी सर्व शक्यता लक्षात घेउन तपास सुरू केला आहे. त्यांच्या अन्नात काही विषारी पदार्थ मिसळले गेले होते का, याचाही शोध घेतला जात आहे. सध्या या चौघांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून, मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करण्यासाठी हिस्टोपॅथालाजी अहवालाची प्रतीक्षा केली जात आहे. हा अहवाल आल्यानंतरच त्यांच्या मृत्यूमागचे गूढ उकलणार आहे.

### न्यायाची अपेक्षा उरली

काम करत असून, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्यासोबत कार्यरत आहेत, असा दावा करत केजरीवाल यांनी हितसंबंधांच्या संघर्षाचा मुद्दा मांडला. या सर्व पार्श्वभूमीवर, मी स्वतः किंवा माझे वकील आता या कोर्टात हजर राहणार नाहीत असे केजरीवाल यांनी स्पष्ट केले आहे.

**न्यायालयाची कडक भूमिका-**यापूर्वी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी केजरीवाल यांचे आरोप फेटाळून लावताना म्हटले होते की, केवळ संशयावरून न्यायाधीश बदलण्याची मागणी करणे म्हणजे न्यायव्यवस्थेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे. न्यायाधीशांच्या मुलांनी कोणते करिअर निवडावे, हे पक्षकार ठरवू शकत नाहीत, अशा शब्दात न्यायालयाने केजरीवाल यांना सुनावले होते.

कायदेतज्ज्ञांच्या मते, केजरीवाल यांनी घेतलेली सत्याग्रहाची भूमिका त्यांना महाग पडू शकते. आरोपी आणि वकील गैरहजर राहिल्यास न्यायालय पुराव्यांच्या आधारे एकतर्फी निकाल देउ शकते. न्यायालयावर अविश्वास व्यक्त करणे आणि सुनावणीला दांडी मारणे या कृतीला कोर्टाचा अवमान समजले जाउ शकते. केजरीवाल या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची शक्यता असली, तरी सध्याच्या भूमिकेमुळे राजकीय आणि कायदेशीर वातावरण चांगलेच तापले आहे.

### वाघ शिकार प्रकरणात

धरत १३ एप्रिल रोजी त्यांच्या निलंबनाचे आदेश जारी करण्यात आले. त्यानंतर २७ एप्रिल रोजी त्यांना कार्यमुक्त करून मोर्शी वनपरिक्षेत्र मुख्यालयात संलग्न करण्यात आले आहे. वन्यजीव संरक्षणासारख्या संवेदनशील विषयात कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरू असून आणखी काही आरोपींची नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### शौचालयाच्या टाक्यात पडून

झाले. स्थानिकांच्या मदतीने टाक्यातून कार्तिकचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, उघड्या अवस्थेत ठेवण्यात आलेल्या अशा टाक्यांमुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. निष्काळजीपणामुळे घडलेल्या या दुर्घटनेबाबत नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास खोलापुरी गेट पोलीस ठाण्याकडून सुरू असून, नेमकी परिस्थिती आणि जबाबदारी निश्चित करण्याचे काम पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### रहाटगावात प्राणघातक हल्ला

रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून हल्ल्यामागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. हल्लेखोरांची ओळख पटवून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात आहेत. दरम्यान, या घटनेमुळे रहाटगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी पोलिसांकडून तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे. पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस करत आहेत.

### विद्युत प्रवाहाचा धक्का लागून

पसरली आहे.

कवठा येथील युवा शेतकरी वैभव संजय जुमडे हा नेहमीप्रमाणे खुदावतपूर येथील स्वतःच्या शेतात गेला व दुपार पर्यंत घरी पोहचला नाही. त्यांचा फोन ही लागत नसल्याने शोधाशोध सुरू असतांना दुपारी ३ च्या दरम्यान गावातील लोकांना माहिती मिळाली की, वैभव जुमडे स्वतःच्या शेतात करंट लागून मृत्यूमुखी पडला. ही बातमी वाऱ्यासारखी कवठा गावात पसरली. सदर घटनेची माहिती चांदूररेल्वे पोलिस स्टेशन मध्ये देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी जावून चौकशी करत मृतदेह शवविच्छेदनासाठी चांदूररेल्वे ग्रामीण रूग्णालयात आणला. शेतकरी वैभवच्या मागे आई, वडील,पत्नी व एक मुलगा आहे. या घटनेने कवठा गावात शोककळा पसरली आहे.

### स्वस्तिक स्क्रॅप सेंटरवर पोलिसांची

गेट) याला मालाबाबत विचारणी केली असता कोणत्याही मालकी हक्काबाबतचे कागदपत्र किंवा पुरावे त्याने सादर केले नाही. सदर मुद्देमाल हा चोरीचा असल्याचा दाट संशय असल्याने तो जप्त करण्यात आला. हा मुद्देमाल खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आला आहे.

### अनाथ विद्यार्थिनी रुग्णालयात

लागली. या संपूर्ण घटनेत विद्यार्थिनी पूर्णपणे असहाय अवस्थेत असल्याचे दिसून आले.

दरम्यान, या घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते व भोई संघटनेचे अध्यक्ष अशोक मोरे यांना मिळताच त्यांनी तातडीने रुग्णालयात धाव घेतली. त्यांनी मुलीची विचारपूस केली असता, तिला आई-वडील नसून ती पूर्णपणे अनाथ असल्याचे समोर आले.

या संदर्भात आमच्या प्रतिनिधींनीने संबंधित निवासी शाळेच्या मुख्याध्यापिकांशी संपर्क साधला असता त्यांनी 'आमचे काम मुलीला रुग्णालयात दाखल करणे इतकेच आहे, त्यानंतर आमची जबाबदारी नाही,' असे बेजबाबदार उत्तर मुख्याध्यापिका कल्पना हजारे दिले. या वक्तव्यामुळे शाळा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणामुळे एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे की, ज्या अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना शासनाच्या निवासी शाळांमध्ये दाखल केले जाते, त्यांच्या सुरक्षिततेची व आरोग्याची जबाबदारी नेमकी कोणाची? अधिकारी आपली जबाबदारी झटकत असल्याचे चित्र समोर येत असल्याने पालक व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सदर प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### दर्यापूर तहसिलसमोर अंगावर

रॉयल्टीच्या माध्यमातून परवानगी दिली आहे व त्याकरता वेळेचे बंधन सुद्धा आखून देण्यात आले आहे . करतखेड येथील रहिवाशी नागेश वावरे हे वाळूची वाहतूक करत असताना दर्यापूरचे तहसिलदार व महसूलच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा ट्रॅक्टर करतखेड येथे नदी बाहेर पकडून तहसिल कार्यालयामध्ये जप्त केला.सदर ट्रॅक्टर सोडून देण्यासाठी मालकाला एजन्ट कडून ६० हजार रुपयांची मागणी केल्याचा गंभिर आरोप नागेश वावरे यांनी केला आहे .वारंवार अधिकाऱ्यांना पुरावे सादर करूनही महसूल अधिकाऱ्यांनी राजेश वावरे यांचा ट्रॅक्टर सोडला नाही. त्यामुळे अखेर संतप्त झालेल्या नागेश वावरे यांनी आज तहसिल कार्यालयाच्या परिसरात अंगावर डिझेल घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी येवदा पोलीस स्टेशन व दर्यापूर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. तहसील कार्यालयाच्या परिसरात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### कृषी केंद्र संचालकांच्या

होत आहे. पॅक माल विकल्यावरही दुकानदारांवर गुन्हे दाखल होत आहे. याच्या आम्ही सरासर विरोध करत आहोत,असे सांगण्यात आले. या विरोधात संचालकांनी बंद पुकारला आहे. या संपामुळे कोट्यावधीचा व्यवहार ठप्प झाला आहे. संपामध्ये अध्यक्ष मिलिंद इंगोले, संजय उंबरकर,वीरेंद्र शर्मा, मनोहर अग्रवाल, सुहास ठाकरे, राजेश अग्रवाल, सुजित मुंदडा, अभिषेक कडू, उमेश सोनोंने, पंकज गांधी, कैलास मालवीय, गिरीश राठी, पुरुषोत्तम अग्रवाल, जगदीश सारडा, श्रीकृष्ण काळमेघ, जयेंद्र टावरी, सुनील शिरभाते, अमित गांधी, योगेश भट्टड, घनश्याम राठी, सुनील सावरकर, राजेश बजाज, जयेश लड्ढा, निलेश गांधी, नितेश कावेरकरसह इतरांचा सहभाग आहे.

### १० कृषी केंद्रांचे परवाने निलंबित

वाहतूक आणि विक्री करणे आदी बाबी तपासून कारवाई करण्यात आली आहे. कृषी विभागाने एप्रिल २०२६ अखेरपर्यंत १०० टक्के विक्री केंद्रांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. फसवणूक टाळण्यासाठी बियाणे किंवा खते केवळ अधिकृत परवानाधारक केंद्रांकडूनच खरेदी करावीत, खरेदी केल्यानंतर पक्के बिल आवर्जून घ्यावे आणि बियाण्यांच्या पाकिटाचे सील तपासावे, खते खरेदी करताना दुकानदार अनावश्यक उत्पादने (लिंकिंग) घेण्याची सक्ती करत असल्यास तक्रार करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

शेतकऱ्याची फसवणूक झाली किंवा खतांचा अवाजवी दर आकारला गेल्यास, त्यांनी तात्काळ तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षकांकडे संपर्क साधावा. तक्रारीसाठी कृषी विभागाने ८०८०५३६६०२ हा व्हॉट्सअॅप क्रमांक देखील जाहीर केला आहे.

### वरूडातील आडवडी बाजाराचा

स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळणार होती. मात्र नगरपरिषदेच्या महसुलात वाढही होणार होती. भुसंपादन उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून २४ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या आठवडी बाजाराच्या जागेच्या घोषणापत्रामुळे वरूड शहरात नव्या वादाला तोंड फुटले.

माहितीनुसार, संबंधित जमीन सार्वजनिक उपयोगासाठी आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले होते. यासंदर्भात आ.उमेश यावलकर यांनी स्थानिक नागरिकांची मागणी लक्षात घेता, हा मुद्दा अधिवेशनात लक्षवेधी स्वरूपात मांडला होता. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता नियोजन आवश्यक असून या जागेवर आठवडी बाजार विकसित केल्यास नागरिकांना मोठा फायदा होईल असे त्यांनी स्पष्ट केले होते. या मागणीनुसार या प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होतील, असा दावा करण्यात आला होता. शहराचा वाढता व्याप व लोकसंख्येचा विस्तार लक्षात घेता हीच जागा भविष्यात आठवडी बाजारासाठी वापरण्यात यावी अशी मागणी प्रशासनाकडुन सुद्धा रेटुन धरण्यात आली होती. त्यामुळे संबंधित जमीन सार्वजनिक प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्याच्या प्रक्रियेला प्रशासनाकडून सुरुवात करण्यात आली होती. मात्र, शहरातील काही भूमाफिया व संबंधित जमीन धारकांनी शासनाच्या निर्णयावर आक्षेप घेत न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे सध्या या प्रकरणात दोन्ही बाजूंनी कायदेशीर लढाई सुरू असून न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलढाणा

▪ मंगळवार २८ एप्रिल २०२६ ▪ मुल्य ३.०० ▪ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

## वाशिममध्ये 'मन की बात' कार्यक्रमाचा १३३ वा भाग उत्साहात



▪ प्रतिनिधी | वाशिम ▪

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' या कार्यक्रमाचा १३३ वा भाग आज वाशिम शहरात उत्साहपूर्ण वातावरणात ऐकण्यात आला.

आमदार श्याम खोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात शहराध्यक्ष मनीष मंत्री यांच्या नियोजना खाली मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अमित प्रमोद गंडागुळे (MBBS, DMRD, वाशिम) उपस्थित होते. या भागात पंतप्रधानांनी विज्ञान व विकास, अंतरिक्ष व तंत्रज्ञान, पवन ऊर्जा, भगवान बुद्धांचे विचार, अन्नदात्यांची मेहनत, नारी शक्ती, पर्यावरण संवर्धन आणि आत्मनिर्भर भारत यांसारख्या विविध महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला नगराध्यक्ष अनिल केंदळे, नगरसेवक गणेश खंडाळकर, शहराध्यक्ष मनीष मंत्री, कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष रामा इंगळे, जिल्हा महामंत्री संगीताताई इंगोले, शहर सरचिटणीस सुनील तापडिया, शहर उपाध्यक्ष बंटी सेठी, राजू वर्मा, डॉ. जयश्री गुट्टे, गजानन वाळके, शंकर देशमुख, जयेश आंबटपुरे, कपिल सारडा, गजानन खांजोडे, प्रभाकर पद्मने, विलास ढगे, दिलीप पिवाल, सारिका वानखेडे यांच्यासह महिला व पुरुष पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमा नंतर उपस्थितांनी 'मन की बात' मधील विचार समाजाच्या सर्वांगीण विकासा साठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

## बायकोच्या चारित्र्यावर संशय, नवऱ्याने भर रस्त्यात वार करून संपवले

▪ प्रतिनिधी | मालेगाव ▪

मालेगाव शहरात चारित्र्याच्या संशयावरून भर रस्त्यात पतीनेच आपल्या पत्नीची धारधार शस्त्राने निर्घृण हत्या केल्याची घटना दि २७ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता घडली आहे. या हत्येच्या घटनेमुळे मालेगाव शहरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी आरोपीवर अटकेची कारवाई केली आहे

घटनेची हकीकत अशी की ओम नारायण राऊत राहणार बेलगाव तालुका मेहकर यांनी मालेगाव पोलीस स्टेशनला फिर्यादी दिली की, मालेगाव शहरातील रहिवाशी विठ्ठल वाघ (वय वर्षे ४०) हे पुणे येथे काम करत असल्याने नेहमी त्याचे वास्तव्य पुण्यात असायचे. मात्र ते जेव्हा जेव्हा मालेगाव शहरातील घरी येत असत तेव्हा त्याची पत्नी पुष्पा वाघ (वय ३५ वर्षे) यांच्या सोबतच कौटुंबिक कारना वरून नेहमी कडाक्याचे भांडण होत असे. आजही त्या दोघांमध्ये कडाक्याचे भांडण होऊन पती विठ्ठल वाघ याने पत्नी पुष्पा वाघ यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केली पत्नी जीव वाचविण्यासाठी घराबाहेर पळाली. मात्र पती विठ्ठल वाघ याने कोणतीही दयामाया न दाखवता रस्त्यावर तिची हत्या केली. पत्नीच्या हत्या प्रकरणात आरोपी पती विठ्ठल वाघ यास मालेगांव पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास ठाणेदार राजेश खेरडे यांच्या सह पोलीस स्टेशन चे कर्मचारी करत आहेत.



> अख्खं वाघ कुटुंब उद्ध्वस्त झाले असून त्यांची दोन्ही मुले ही आईच्या मायेपासून कायमची मुकली आहेत. तर वडील जेलमध्ये जाणार असल्याने त्यांच्यावरील वडिलांचे छत्रही हरवले आहे.

## कल्याणी साठेची वैद्यकीय क्षेत्रात गगण भरारी

▪ प्रतिनिधी | मालेगाव ▪

येथील कल्याणी मंदा राजू साठे हिने वैद्यकीय क्षेत्रातील एम.बि.बी.एस .ची पदवी प्राप्त केली असून मुंबई येथील मास्टर दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह विलेपार्ले येथे तिला नुकतीच पदवी प्रदान करण्यात आली कल्यानीने वैद्यकीय क्षेत्रात घेतलेल्या गगण भरारीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे






तिने एम .बी.बी.एस.पदवीचे शिक्षण मुंबई येथील प्रसिद्ध हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मेडिकल कॉलेज व डॉ. आर.एन. कूपर हॉस्पिटल, येथून यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. कल्याणीने आपले शालेय शिक्षण वाशिम येथील जवाहर नवोदय विद्यालयात पूर्ण केले तिने १० वी मध्ये ९२.८ टक्के १२ वी मध्ये ७९.४ टक्के गुण मिळवल्या नंतर निट मध्ये ५२६ गुण प्राप्त करून वैद्यकीय शिक्षणा साठी प्रवेश मिळवला होता तिने आपल्या यशाचे श्रेय गुरुजना समवेत वडिल राजु साठे, आई मंदाताई, मोठे काका चंद्रकांत साठे, काका स्व अशोक साठे, काका अनील साठे, भाऊ भूषण साठे, मामा गजानन वायसे, सुनील वायसे यांना दिले आहे.

## विद्याभारती शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षा केंद्रास भेट; व्यवस्थेचे कौतुक

▪ प्रतिनिधी | वाशीम ▪

येथील विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळेत आज प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे इयत्ता ४थी आयोजन परीक्षा केंद्र क्र. ६४०१०६ येथे यशस्वीरित्या करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता व बौद्धिक क्षमतेची चाचणी घेणारी ही महत्त्वपूर्ण परीक्षा शांततापूर्ण, शिस्तबद्ध व सुरळीत वातावरणात पार पडली.



परीक्षे दरम्यान मा. उपशिक्षणाधिकारी क्रिष्णा बिरादार साहेब, मा. गटशिक्षणाधिकारी गजानन बाजड साहेब, संजय वाकुडकर केंद्रप्रमुख यांनी परीक्षा केंद्राला सदिच्छा भेट देऊन संपूर्ण व्यवस्थेची पाहणी केली. त्यांनी परीक्षा केंद्रावरील बैठक व्यवस्था, परीक्षा केंद्रावरील विद्यार्थ्यांची १००% उपस्थिती, प्रश्नपत्रिकांचे वितरण, विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधा तसेच परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता तपासणी केली. परीक्षा केंद्रावरील सर्व व्यवस्था नियोजनबद्ध व समाधानकारक असल्याचे निरीक्षण नोंदवत अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांना कोणताही तणाव न येता शांत व सकारात्मक वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी शाळा प्रशासनाने केलेल्या नियोजनाचे कौतुक केले. या परीक्षेसाठी केंद्र प्रमुख तथा शाळेचे मुख्याध्यापक नितेश रमेश मिटकरी, पर्यवेक्षक विजय गोटे, महेश लावरवार, अनिल भिसडे, अमोल इंगळे, श्रीकृष्ण गोरे, अर्जुन मुंढे, वृषाली नवलकार, भारती तांबेकर, पद्मिनी खराटे, सुमित्रा ठाकरे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी जबाबदारीने कार्य पार पाडत परीक्षा यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने परीक्षेत सहभाग घेत आपली तयारी सिद्ध केली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत शाळेच्या शिस्तबद्ध व गुणवत्तापूर्ण कार्यपद्धतीचे कौतुक केले. विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळेने शैक्षणिक क्षेत्रातील आपली उत्कृष्ट परंपरा कायम राखत शिष्यवृत्ती परीक्षेचे यशस्वी आयोजन करून एक आदर्श निर्माण केला.

## 'बोलके व्हा, कला आत्मसात करा' – डॉ. दरेकर एस.एम.सी. स्कूलमध्ये प्रेरणादायी उद्बोधन वर्ग

▪ प्रतिनिधी | वाशीम ▪

स्थानिक एस. एम. सी. इंग्लिश स्कूलमध्ये शनिवार, २५ एप्रिल रोजी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी एका विशेष उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेते उद्योजक तथा युवा मार्गदर्शक डॉ. अजय दरेकर (प्रमुख, व्हरसाटाईल एज्युकेअर सिस्टम, मुंबई) यांनी उपस्थितांना प्रबोधन करत जीवनात यशस्वी होण्याचे प्रभावी मंत्र दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. हरिभाऊ क्षीरसागर होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून मुख्याध्यापिका मीना उबगडे उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. दरेकर म्हणाले की, 'क्षेत्र कोणतेही निवडा, पण त्यात निष्णात व्हा. 'बोलणाऱ्याची माती विकली जाते, पण न बोलणाऱ्याचे सोनेही विकले जात नाही' या म्हणीप्रमाणे स्वतःला व्यक्त करायला शिका.



अवांतर वाचन करा आणि नवनवीन कला आत्मसात करा, तरच स्पर्धेच्या युगात तुम्ही यशस्वी व्हाल.'पालकांना मार्गदर्शन करताना त्यांनी कौरव-पांडवांचे उदाहरण दिले. द्रोणाचार्यांनी सर्वांना सारखेच शिक्षण दिले, तरीही प्रत्येकाची प्रगती वेगळी ठरली. शिक्षणासोबतच मुलांच्या प्रवृत्तीवर पालकांनी लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, शिक्षकांनी केवळ कॅमेरा किंवा वरिष्ठांच्या भीतीने न शिकवता, 'मला उद्याचा सुजाण नागरिक घडवायचा आहे' या भावनेने अध्यापन करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. डॉ. दरेकर यांनी खेळ आणि हास्याच्या माध्यमातून सर्वांना खिळवून ठेवत हे मार्गदर्शन सत्र अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडले.

## गंगापूर गावातून जाणारी अवैध गौण खनिज वाहतूक तात्काळ बंद करा

▪ प्रतिनिधी | वाशीम ▪

कारंजा तालुक्यातील गंगापूर गावातील ग्रामस्थांसह गोरसेनेने गावातून अवैधरित्या होत असलेली गौण खनिज वाहतूक तात्काळ बंद करण्याची मागणी नुकतीच जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

गोरसेनेचे कारंजा तालुकाध्यक्ष शेषराव जानूसिंग चव्हाण यांच्यासह गंगापूर गावातील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गंगापूर गावातून अवैधरित्या गौण खनिज वाहतूक करणाऱ्या जड वाहनांमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात हानी होत असून, या वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे ग्रामस्थांना प्रचंड त्रास होत आहे.गावालगत असलेल्या गिट्टी खदानमधून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असून ही जड वाहने थेट गावाच्या मध्यवर्ती भागातून जातात. परिणामी रस्त्यांची दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी रस्ते खड्डेमय झाले आहेत. इतकेच नव्हे तर जड वाहनांच्या कंपनामुळे रस्त्यालगतच्या घरांच्या भिंतींना तडे गेल्याचेही ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे. या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी यापूर्वी तीन वेळा तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊनही प्रशासनाने ठोस पावले उचलली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कारंजा येथील आमदार सईताई डहाके यांनाही निवेदन दिले आहे. मात्र या तक्रारीबाबत कार्यवाही होत नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याशिवाय, गंगापूर गावाला मागील तीन वर्षांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही अत्यंत गंभीर बनला आहे. या समस्येचे तातडीने निराकरण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



ग्रामस्थांनी प्रशासनाकडे गावातून जाणारी जड वाहतूक तात्काळ बंद करण्यासोबतच खराब झालेले रस्ते तातडीने दुरुस्त करण्याची आणि पाणीटंचाईचा प्रश्न सोडवण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः गावाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशीही विनंती करण्यात आली आहे.दरम्यान, प्रशासन या गंभीर प्रश्नांकडे कितपत गांभीर्याने लक्ष देऊन उपाययोजना करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

> **पोलीस म्हणतात गावातून जड वाहने जाऊ द्या !**
> गंगापूर गावातून जाणाऱ्या जड वाहनांच्या गौण खनिज वाहतुकीमुळे गावकऱ्यांना अतोनात त्रास होत असताना पोलिसांनी मात्र, ही जड वाहतूक गावातूनच जाणार, गावकऱ्यांनी ही वाहने गावातून जाऊ द्यावीत, अशी भूमिका घेतल्यामुळे या बिट मधील पोलिसांच्या भूमिकेबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची महसूल प्रशासनाची जबाबदारी असताना पोलीस प्रशासनाने येथे हस्तक्षेप करण्याची गरज नसतानाही संबंधित पोलीस कर्मचारी गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर एवढे मेहरबान का? याची चर्चा परिसरात होत आहे. याकडे पोलीस अधीक्षकांनी लक्ष देण्याची गरज आहे.

## बाकलीवाल विद्यालयाच्या एनसीसीची 'ए' प्रमाणपत्र परीक्षेत गगनभरारी सलग १०० टक्के निकालाची परंपरा कायम

▪ प्रतिनिधी | वाशीम ▪

शिस्त, जिद्द आणि कठोर परिश्रमाचे प्रतीक असलेल्या एनसीसी (राष्ट्रीय छात्र सेना) विभागात वाशिम येथील श्री बाकलीवाल विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. ११ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अकोला यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'ए' प्रमाणपत्र परीक्षेत विद्यालयाने १०० टक्के निकालाची आपली दैदीप्यमान परंपरा कायम राखली आहे.

सत्र २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन वर्षांचा 'ए' प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर घेण्यात आलेल्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेत विद्यालयाचे सर्वच्या सर्व ४६ कॅडेट्स उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे, या सर्व विद्यार्थ्यांनी केवळ उत्तीर्ण न होता 'अ' श्रेणी प्राप्त करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.विद्यालयाची कॅडेट नम्रता इंगळे आणि कॅडेट विघ्नेश वानखेडे यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर परीक्षेत सर्वाधिक गुण (अ‍ह) मिळवून संपूर्ण बटालियनमध्ये प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे एनसीसी अधिकारी अमोल काळे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व कठोर सराव कारणीभूत ठरला आहे.

## गिव्हा येथे महिला आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

▪ प्रतिनिधी | वाशिम ▪

सामाजिक बांधिलकी जपत मराठा समाज सेवा मंडळ, वाशिमच्या वतीने वाशिम तालुक्यातील गिव्हा येथे रविवारी, २६ एप्रिल रोजी महिला आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात परिसरातील १२३ महिलांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली असून, त्यांना मोफत औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. भाऊसाहेब काळे व सर्व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. याच कार्याचा एक भाग म्हणून रविवारी गिव्हा येथील जिल्हा परिषद शाळेत या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, वाशिम यांच्याकडून आवश्यक औषध पुरवठा करण्यात आला होता. तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रोहिणी ऋषिकेश उखळे पाटील आणि डॉ. कु. वैष्णवी गजानन महाकाळ यांनी महिलांची सखोल तपासणी केली. त्यांना डॉ. सुरेंद्र उखळे व रेडिओलॉजिस्ट डॉ. ऋषिकेश उखळे यांनी तांत्रिक सहकार्य केले. ग्रामीण भागातील महिलांना आपल्या आरोग्याकडे लक्ष देता यावे आणि आजारांचे वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने तज्ज्ञांनी मोलाचे मार्गदर्शन केले. मराठा समाज सेवा मंडळ केवळ नावालाच नाही तर प्रत्यक्ष कृतीतून समाजकार्य करत आहे. याप्रसंगी मंडळाचे कार्याध्यक्ष तानाजी कव्हर, सहकोषाध्यक्ष प्रा. तुकारामजी शेवाळे, सचिव प्रा. रघुनाथ उखळे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद शाळा गिव्हाचे मुख्याध्यापक भारत गोरे, कु. ढगे, , मानद शिक्षिका दुर्गा उखळे, अंगणवाडी सेविका सौ. लताताई भुसारी, अनिताताई भुसारी, आशा वर्कर संगीता मधुकर भुसारी यांनी परिश्रम घेतले. ग्रामस्थांच्या वतीने पोलीस पाटील नामदेव महाकाळ, ग्रा.पं. सदस्य सौ. मालतीताई उखळे, विष्णू भुसारी, कैलास आश्रुजी भुसारी, जगदीश प्रकाश भुसारी, मधुकर उखळे, अशोक उखळे श्रीराम भुसारी यांनी मोलाचे सहकार्य केले.



मराठा समाज सेवा मंडळचा उपक्रम; आरोग्य विभागाचे सहकार्य

**CHANGE IN NAME**
MY OLD NAME IS MOHD JAFFAR MOHD JAKARIA Which now I am Changing as new name MOHAMMAD ZAFAR MOHAMMAD ZAKRIYA hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same MOHAMMAD ZAFAR MOHAMMAD ZAKRIYA
Sign by
MOHAMMAD ZAFAR MOHAMMAD ZAKRIYA
R/O Begam Manjil Khadan Dist.Akola Pin Code - 444001 (M.S)
M.No.9373879898

## चिमुकल्या ज्ञानेश्वरीचा आगळा वेगळा छंद! वृक्षसंवर्धनाचे ध्येय १००० वृक्षांच्या बिजांचे केले संकलन

▪ प्रतिनिधी | वाशिम ▪

ग्लोबल वार्मींगमुळे पर्यावरणाचा झपाट्याने -हास होत आहे .बदलेले ऋतुचक्र ,तापमानात झालेला बदल ,अवकाळी पाऊस ,गारपीट , आसमानी सुल्तानी संकट हे जगावर घोंघावत आहे .हे नैसर्गिक संकटे दूर करायचे असेल तर वृक्ष लागवड व त्याच बरोबर त्याच्या संवर्धनावर भर द्यावा लागणार आहे .



हि महत्वाची बाब एस एम सी इंग्लिश स्कूल ,वाशीम येथे इयत्ता ६ वीत वर्गात शिकत असलेली चिमुकली ज्ञानेश्वरी अशोक तडस हिने ओळखली. ज्ञानेश्वरीने पर्यावरण बचावाचा संदेश देण्या करीता आगळा वेगळा छंद जोपासला खेळण्या -बागडण्याच्या वयात तीने तब्बल १००० विविध आणी दुर्मिळ वृक्षांच्या बिया गोळा करून वृक्षांची बेसुमार कत्तल करणार्यांसमोर नवा आदर्श निर्माण केला आहे. ज्ञानेश्वरी अशोक तडस (वय १२ वर्षे) इयत्ता ६ वीतील विद्यार्थीनी असून स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल ,वाशीम येथे शिक्षण घेत आहे. शाळेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या हरित सेनेच्या उपक्रमातुन प्रेरणा घेत ज्ञानेश्वरीने हा छंद जोपासला. विदर्भातील शहरी ,ग्रामीण भाग आणि राना वनात पूर्वी विविध प्रकारचे वृक्ष राहायचे .मात्र गेल्या काहि दशकात या वृक्षांची अमाप कत्तल होउन सिमेंट तथा डांबरी करणाचे रस्ते उदयास आले .मोठ मोठी घरे उभारतांना वृक्षांचे मुळातुन अस्तीत्व संपविण्यात आले .परिणामी हल्ली अनेक मानवी आरोग्यास हितकारक तथा औषधी पयोगी वृक्षवेली , झाडे नामशेष झाली आहे .हि महत्वाची बाब लक्षात घेउन एस एम सी इंग्लिश स्कूलने महाराष्ट्र शासनाच्या हरित सेना उपक्रमात सहभाग नोंदविला आहे. शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे व राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी हा उपक्रम गेल्या सतरा वर्षापासून पर्यावरण संवर्धनाशी निघडीत विविध उपक्रम राबवित असून हे उपक्रम केवळ कागदोपत्री न राबविता प्रत्यक्ष कृतीवर अधिक भर दिला. यातुनच प्रेरणा घेत हरित सेनेत सहभागी विद्यार्थ्यांना देखील विविध प्रकारच्या वृक्षाशी लळा लागला आहे .त्यातीलच ज्ञानेश्वरी या चिमुकलीने प्राचार्य मीना उबगडे व राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांच्या मार्गदर्शनात चक्क १००० प्रजातीच्या वृक्ष वनस्पतीच्या बियांचा संग्रह करून जन सामान्यात एक नवा आदर्श निमार्ण केला आहे .ज्ञानेश्वरीने महतप्रयासाने गोळा केलेल्या या बियांचे वेगवेगळे संच तयार करण्यात आले असून त्यातील काहि संच वाशीमच्या सामाजीक वनिकरण विभागाला आगामी पावसाळ्यात लागवड करण्यासाठी दिले जाणार आहे व उरलेल्या बियांचा वापर एस एम सी स्कूलच्या परिसरातील बॉटनिकल गार्डन साठी वापरला जाणार आहे.तीच्या या उपक्रमा बदल समाजातील सर्वच स्तरातून तीचे कौतुक होत आहे.

# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५१ ■ मंगळवार, २८ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# डिजिटल जनगणनेची रणधुमाळी : १ मेपासून वर्ध्यात 'स्वगणना'चा बिगुल

## १५ दिवसांत नागरिकांनी स्वतः नोंदवायची माहिती; प्रशासन सज्ज, यंत्रणा अलर्ट

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय पातळीवरील अत्यंत महत्त्वाच्या जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा आता प्रत्यक्षात उतरणार असून, १ मेपासून वर्धा जिल्ह्यात 'स्वगणना'ची सुरुवात होणार आहे. १ ते १५ मे या कालावधीत नागरिकांनी स्वतः पुढाकार घेत अधिकृत संकेतस्थळावर जाऊन माहिती नोंदवायची आहे. या डिजिटल प्रक्रियेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी संजय तेली यांनी केले.



जनगणना २०२७ चा संपूर्ण कार्यक्रम दोन टप्प्यांत राबवला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात घरयादी व प्राथमिक माहिती संकलन, तर दुसऱ्या टप्प्यात सविस्तर लोकसंख्या गणना केली जाणार आहे. स्वगणना हा या पहिल्या टप्प्याचा कणा मानला जात असून, यामध्ये नागरिकांनी स्वतः ३३ प्रश्नांची अचूक माहिती भरायची आहे.

प्रभारी जिल्हाधिकारी तेली यांनी स्पष्ट केले की, १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक घराघरात जाऊन माहितीची पडताळणी व संकलन करतील. या व्यापक मोहिमेसाठी प्रशासनाने मोठी यंत्रणा उभी केली आहे. डॉ. मंगेश घोगरे आणि मुकेश गोंडाने या मास्टर ट्रेनर्सनी प्रशिक्षण प्रक्रिया हाती घेतली असून, ८ मेपर्यंत प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण केले जाणार आहे.

शहरी भागासाठी १० आणि ग्रामीण भागासाठी ८ चार्ज अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. याशिवाय ४२ फिल्ड ट्रेनर, तब्बल २२०२ प्रगणक, ३६८ पर्यवेक्षक आणि २० तांत्रिक सहाय्यक यांच्या समन्वयातून ही भव्य जनगणना प्रक्रिया पार पडणार आहे. पत्रपरिषदेला निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवार, नायब तहसीलदार धनंजय वाघ आदींची उपस्थिती होती.

### घराघरात ठोका : ३.९६ लाख घरांचा डेटा संकलन

१६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणक जिल्ह्यातील सुमारे ३.९६ लाख घरांना भेटी देणार आहेत. प्रत्येक प्रगणकावर सुमारे १८० घरांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नागरिकांनी ओळखपत्रधारक प्रगणकांना आवश्यक माहिती देत सहकार्य करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवार यांनी केले.

# पोपटांनी उद्ध्वस्त केली शेती; पण कोर्टात शेतकऱ्याची बाजी : न्याय मिळालाच

## वन विभागाने झटकला हात, न्यायालयाने दिला दिलासा; वर्षानुवर्षांच्या लढ्यानंतर भरपाईचा मार्ग मोकळा

**सेलू जनमाध्यम :** निसर्गाच्या तडाख्याने होरपळलेल्या शेतकऱ्याला प्रशासनाने नाकारले, पण न्यायालयाने न्याय दिला, अशी हिंगणी येथील शेतकरी अजय महादेव डेकाटे यांची हृदयद्रावक आणि तितकीच प्रेरणादायी कहाणी सध्या वर्धा जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे. पोपटांच्या थव्याने अक्षरशः उद्ध्वस्त केलेल्या डाळिंब बागेच्या नुकसानीसाठी अखेर न्यायालयाने भरपाई देण्याचे आदेश देत शेतकऱ्याच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय दिला आहे.

डेकाटे यांनी बँक ऑफ इंडियाकडून कर्ज घेऊन दीड हेक्टर क्षेत्रात तब्बल ८०० डाळिंबाची रोपे लावली होती. कष्ट, मेहनत आणि आशेच्या जोरावर उभी केलेली ही बाग मार्च २०१६ मध्ये फळधारणेच्या उंबरठ्यावर होती. पण याच काळात पोपटांच्या मोठ्या थव्याने बागेवर हल्ला चढवत डाळिंबांना टोचून प्रचंड नुकसान केले. पाहता पाहता शेतकऱ्याच्या कष्टाचे सोनं राखेत परिवर्तित झाले.

या मोठ्या नुकसानीनंतर डेकाटे यांनी वन विभागाकडे धाव घेतली. मात्र पोपट हा वन्य प्राणी नाही असा धक्कादायक युक्तिवाद करत विभागाने भरपाई देण्यास साफ नकार दिला. प्रशासनाकडून पाठ फिरवली गेल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्याने १ ऑक्टोबर २०१६ रोजी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले.



वर्षानुवर्षे सुरू राहिलेल्या या कायदेशीर लढ्यानंतर अखेर न्यायालयाने शेतकऱ्याच्या बाजूने निकाल देत दिलासा दिला.

प्रति झाड २०० रुपये या प्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. ८०० झाडांपैकी सुमारे २०० झाडांना फळधारणा झाली होती, मात्र त्या सर्वांचे नुकसान झाल्याने लाखो रुपयांचा फटका बसला होता. या आर्थिक आघातामुळे डेकाटे काही काळ शेतीपासून दूर गेले होते.

या निर्णयामुळे केवळ एका शेतकऱ्यालाच नव्हे, तर वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकांचे नुकसान सहन करणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना आशेचा किरण मिळाला आहे. प्रशासनाच्या दारात न्याय न मिळाल्यास न्यायालयातून तो मिळवता येतो, हा संदेश या प्रकरणातून अधोरेखित झाला आहे.

### शेतकऱ्याचा विजय, अन्यायावर प्रहार

दीर्घ संघर्षानंतर अखेर न्याय मिळाला. हा निर्णय केवळ माझ्यासाठी नाही, तर सर्व शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा आहे, अशी भावना अजय महादेव डेकाटे यांनी व्यक्त केली. वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या खचत आहेत, अशा परिस्थितीत अशा निर्णयांमुळे त्यांना आधार मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

# सावंगी मेघे पोलिसांची कारवाई : अवैध दारूसह युवक अटकेत, १.२४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी (मेघे) पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध दारू वाहतुकीवर कारवाई करत एका तरुणाला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून एकूण १ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. सालोड (हिरापूर) येथील प्रणय विशाल सुटे (वय २४) हा सावंगी ते पालोती रोडदरम्यान अवैध देशी व विदेशी दारू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार मेघदूत अपार्टमेंटसमोर, शाही दावत हॉटेल परिसरात नाकेबंदी करण्यात आली.

नाकेबंदी दरम्यान संशयित युवक काळ्या रंगाच्या बजाज चेतक इलेक्ट्रिक दुचाकीवरून येताना आढळला. त्याला थांबवून तपासणी केली असता, वाहनाच्या डिक्कीत काळ्या बॅगेत विविध कंपन्यांच्या विदेशी दारूच्या बाटल्या सापडल्या. यात रॉयल ग्रीन, ऑल सीजन आणि बी सेवन कंपनीच्या १८० एमएलच्या बाटल्यांचा समावेश असून अंदाजे ४ हजार रुपयांचा दारू साठा जप्त करण्यात आला.

तसेच संबंधित दुचाकी (किंमत अंदाजे १ लाख २० हजार रुपये) जप्त करण्यात आली. आरोपीकडे दारू वाहतुकीसाठी कोणताही परवाना नसल्याचे तसेच वाहनाची कागदपत्रे व वाहन चालविण्याचा परवाना नसल्याचेही निष्पन्न झाले.

या प्रकरणी सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे व त्यांच्या पथकाने केली.

# पत्नीच्या खुनाप्रकरणी पतीला जन्मठेप

## -सासूवरही जीवघेणा हल्ला; जिल्हा न्यायालयाचा निकाल

**वर्धा जनमाध्यम :** पत्नीची हत्या करून सासूला गंभीर जखमी करणाऱ्या पतीला जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. जिल्हा न्यायाधीश-२ एस. जे. अन्सारी यांनी हा निकाल दिला.

विनोद उरकुडे (रा. आंजी पेठ) असे दोषी ठरलेल्या आरोपीचे नाव आहे. मयुरी उरकुडे हिच्यासोबत त्याचे वारंवार वाद होत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. २१ ऑगस्ट २०२० रोजी रात्री ही घटना घडली. मयुरी ही पिपरी (मेघे) येथील गिरीपेठ परिसरात आईच्या घरी राहण्यासाठी गेली होती. रात्री आरोपी तेथे पोहोचला. तू इथे का आलीस या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपीने चाकूने मयुरीवर वार केले. तिला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या आईवरही त्याने हल्ला केला. या घटनेत मयुरीचा मृत्यू झाला, तर तिची आई गंभीर जखमी झाली. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता. रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. एपीआय मेघाली गावंडे यांनी तपास पूर्ण करून प्रकरण न्यायालयात सादर केले.या खटल्यात एकूण १४ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील विनय आर. घुडे यांनी युक्तिवाद मांडला. पैरवी अधिकारी म्हणून नारंगी वाढई यांनी काम पाहिले. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि सादर पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने आरोपीला जन्मठेप व दंडाची शिक्षा सुनावली.



# पुलफैलात आयपीएल सट्टेबाजीचा पर्दाफाश

## -१.४० लाखांचा मुद्देमाल जप्त, दोघांवर गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** आयपीएल क्रिकेट सामन्यांवर पैशाची हार-जीत लावून सुरू असलेल्या अवैध सट्टेबाजीच्या रॅकेटचा स्थानिक गुन्हे शाखेने पुलफैल परिसरात पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन आरोपींवर गुन्हा दाखल करून एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वर्धा शहर परिसरात गस्तीवर असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली होती की, पुलफैल येथील एका ठिकाणी आयपीएल सामन्यांवर सट्टेबाजी सुरू आहे. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ कारवाई करत अविनाश मतेलकर (रा. सुदर्शन नगर, पुलफैल) यांच्या राहत्या घरी छापा टाकला.



छाप्यादरम्यान राजस्थान रॉयल्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद या लाईव्ह सामन्यावर पैशाची हार-जीत लावून सट्टा घेतला जात असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून रोख पाच हजार रुपये, दोन मोबाईल फोन तसेच सट्टेबाजीसाठी वापरण्यात येणारे इतर साहित्य असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी अविनाश संजय मतेलकर (वय ३७, रा. सुदर्शन नगर, पुलफैल) आणि संदीप जगजीत नैन (वय ३१, रा. सिंदी मेघे) यांच्याविरुद्ध वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल आणि अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, सहाय्यक पोलिस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू, सचिन इंगोले, अरविंद इंगोले, मिथुन जिचकार, दीपक साठे, प्रफुल पुणवटकर व पल्लवी बोबडे यांचा सहभाग होता.

दरम्यान, आयपीएलच्या पार्श्वभूमीवर शहरात अशा प्रकारच्या सट्टेबाजीवर पोलिसांची नजर अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

# मराठा अस्मितेला धक्का देणाऱ्यांना जोडे दाखवले

## वर्ध्यात संतापाचा स्फोट; धिरेंद्र शास्त्री, आ. गायकवाड यांच्या वक्तव्यांचा तीव्र निषेध

**वर्धा जनमाध्यम :** मराठा समाजाच्या भावना दुखावणाऱ्या वक्तव्यांमुळे वर्धा शहरात संतापाचा जणू ज्वालामुखीच उसळला. अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात धिरेंद्र शास्त्री आणि आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात 'जोडेमारो' आंदोलन करत तीव्र निषेध नोंदविण्यात आला. घोषणाबाजी, संतप्त प्रतिक्रिया आणि आक्रमक भूमिका यामुळे परिसर काही काळ दणाणून गेला.



शिवरायांचा अवमान सहन केला जाणार नाही, वक्तव्ये मागे घ्या, अन्यथा परिणाम भोगा' अशा जोरदार घोषणांनी आंदोलनकर्त्यांनी चौक हादरवून सोडला. आंदोलनकर्त्यांनी प्रतिकात्मक जोडे दाखवत संबंधितांच्या वक्तव्यांचा निषेध व्यक्त केला. या वेळी वातावरण प्रचंड तणावपूर्ण झाले होते. आंदोलनाचे नेतृत्व खासदार अमर काळे आणि नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी केले.

त्यांनी आपल्या भाषणात संतप्त सूर लावत संबंधितांनी मराठा समाजाच्या अस्मितेला ठेच पोहोचवली असल्याचा आरोप केला. समाजाच्या भावना भडकवणारी वक्तव्ये करणाऱ्यांना मराठा समाज कधीही माफ करणार नाही, असा कडक इशारा त्यांनी दिला. तसेच, अशा प्रकारच्या वक्तव्यांवर शासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. या आंदोलनात महिला, युवक आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग दिसून आला. पुखराज मापारी, सुभाष पाटणकर, संदीप भांडवलकर, रोहिणी बाबर, चंद्रशेखर घोडे आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. परिस्थिती नियंत्रणात ठेवत आंदोलन शांततेत पार पडले असले, तरी मराठा समाजातील संताप अजूनही धगधगत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांना १००% फी माफी द्या

## -महात्मा फुले समता परिषदेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग, मेडिकल तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १०० टक्के फी माफी लागू करावी, अशी ठोस मागणी महात्मा फुले समता परिषद, वर्धा यांच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन पाठविण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेतील कलम ३४० नुसार मागासवर्गीयांना न्याय देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच १६ डिसेंबर १९९२ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निर्णयानुसार ओबीसी प्रवर्गाला नॉन-क्रीमीलेयरच्या अटीवर मागासवर्गीय म्हणून मान्यता देत विविध शैक्षणिक सवलती देण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, महाराष्ट्रात प्रत्यक्ष अंमलबजावणीत तफावत दिसून येत असून ओबीसी विद्यार्थ्यांना केवळ ५० टक्के फी सवलत मिळत आहे, तर उर्वरित रक्कम त्यांना स्वतः भरावी लागत आहे.

राज्यात एससी, एसटी तसेच विजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग व मेडिकल शिक्षणासाठी १०० टक्के फी माफी दिली जाते. तसेच मुलींसाठीही शासनाने मोफत शिक्षणाची योजना लागू केली आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी विद्यार्थ्यांना समान सवलती न मिळाल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी यापूर्वीही ओबीसी विद्यार्थ्यांच्या फी माफीसंदर्भात शासनाकडे पाठपुरावा केला होता. तसेच ३ सप्टेंबर २०२५ रोजी स्थापन करण्यात आलेल्या ओबीसी उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीने या प्रश्नावर सकारात्मक शिफारस करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षांत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्कात मोठी वाढ झाल्याने नॉन-क्रीमीलेयर ओबीसी कुटुंबांवरील आर्थिक भार वाढला आहे. परिणामी, अनेक गुणवंत व पात्र विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ओबीसी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि त्यांना समान संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासनाने तातडीने १०० टक्के फी माफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन सादर करताना नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, जिल्हाध्यक्ष विशाल हजारे, विनय डहाके, बंटी खडसे, डॉ. कपिल मून यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृषी पुरवठा ठप्पः ११०० केंद्रांचा बेमुदत संप

## -खरीप तोंडावर शेतकरी अडचणीत

**वर्धा जनमाध्यम :** खरीप हंगामाच्या तोंडावरच जिल्ह्यातील कृषी व्यवस्थेला मोठा धक्का बसला आहे. विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्ह्यातील तब्बल ११०० कृषी सेवा केंद्रांनी २७ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारला असून, संपूर्ण कृषी पुरवठा व्यवस्था ठप्प झाली आहे. या संपामुळे शेतकऱ्यांसमोर खत, बियाणे व कीटकनाशकांचा तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



कृषी सेवा केंद्र चालकांनी राज्याच्या कृषी विभागाविरोधात आंदोलनाचे शस्त्र उपसले आहे. कंपन्यांकडून खत व बियाणे पुरवठ्यात होत असलेल्या 'लिंकिंग' समस्येमुळे विक्रेत्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच शेजारील राज्यांतून येणाऱ्या अवैध एचटीबीटी कापूस बियाण्यांवर तातडीने बंदी घालावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

विक्रेत्यांनी शासनाच्या धोरणांवरही रोष व्यक्त केला आहे. बियाणे, खत व कीटकनाशके ही सीलबंद स्वरूपात विक्री केली जात असताना नमुने निकृष्ट आढळल्यास विक्रेत्यांनाच आरोपी ठरवले जाते, ही अन्यायकारक बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तपास अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याचा निर्णय मागे घ्यावा, 'साथी' पोर्टलची सक्ती कंपन्यांपुरतीच ठेवावी, खत पुरवठा एफओआर पद्धतीने करावा, विक्री मार्जिन वाढवावे आणि प्रलंबित देयके तातडीने द्यावीत, अशा मागण्यांचाही पाऊस आंदोलनातून पाडण्यात आला आहे.

# वर्धा ४६.०५ अंशांवर, सूर्याचा रौद्र अवतार

## - ३० वर्षांचे विक्रम मोडीत, जनजीवन पूर्ण ठप्प

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्हा सध्या भीषण उष्णतेच्या विळख्यात सापडला असून सूर्य जणू आकाशातून आग बरसवत आहे. गेल्या तीन दशकांतील सर्व विक्रम चक्काचूर करत सोमवारी तापमानाने थेट ४६.०५ अंश सेल्सिअसची भीषण पातळी गाठली. रविवारी ४६.०४ अंशांची नोंद होताच उष्णतेचा इशारा मिळाला होता; मात्र अवघ्या एका दिवसातच तापमानाने आणखी उसळी घेत नवा विक्रम प्रस्थापित केला. त्यामुळे संपूर्ण जिल्हा अक्षरशः होरपळून निघत असून जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

सकाळी ९–१० वाजताच उन्हाचे चटके असह्य होऊ लागतात. दुपारी ११ नंतर शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा ओस पडत असून जणू 'उष्णतेची संचारबंदी' लागू असल्याचे चित्र दिसत आहे. घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना अंगावर भाजून काढणारा उकाडा सहन करावा लागत असल्याने अत्यावश्यक कामांशिवाय लोक बाहेर पडणे टाळत आहेत. दुपारच्या सुमारास वर्दळ जवळपास शून्यावर येत असून शहराची गतीच मंदावली आहे.या भीषण उष्णतेचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत आहे.



एवढ्या कडाक्याच्या उन्हातही शाळांना सुट्टी जाहीर न केल्याने पालकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ का असा प्रश्न उपस्थित केला जात असून उष्माघात, चक्कर येणे, निर्जलीकरण यांचा धोका वाढला आहे. शाळकरी मुलांना दुपारच्या उन्हात प्रवास करावा लागत असल्याने त्यांच्या आरोग्याची चिंता अधिकच गडद झाली आहे.


# जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याने कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री. रत्नाकर भाऊराव काकडे हे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक व धारक आहेत.

सदर मिळकत ही मौजा – सुसुंद, ता. करंजा (घा.), जि. वर्धा, ग्रामपंचायत सुसुंद हद्दीत येणारी असून त्याचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:घर क्रमांक: २५०

शीट क्रमांक: १ नगर भूमापन क्रमांक: २१६ क्षेत्रफळ: १६८.२९ चौ. मीटर (मालमत्ता पत्रकानुसार)

मिळकतीच्या सीमा पुढीलप्रमाणे:

पूर्वेस: सिमेंट रस्ता

पश्चिमेस: सौ. बेबीबाई काकडे यांचे घर,उत्तरेस: श्री. जनार्दन नेहरे यांचे घर,दक्षिणेस: श्री. रत्नाकर काकडे यांचे घर,सादर कागदपत्रांच्या पडताळणीनुसार असे दिसून येते की वरील मिळकत ही श्री. रत्नाकर भाऊराव काकडे यांच्या नावावर असून ती पूर्वजांची (वंशपरंपरागत) मिळकत आहे, असे दिनांक १३/०३/२०२५ च्या मालमत्ता पत्रकात नमूद आहे.

तसेच, श्री. रत्नाकर भाऊराव काकडे यांनी वरील मिळकत गहाण ठेवून पिरामल फायनान्स लिमीटेड कडून कर्जासाठी अर्ज केलेला आहे.तरी, वरील मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीस, बँकेस, वित्तीय संस्थेस किंवा अन्य कोणास काही हक्क, दावा, आक्षेप किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात आवश्यक पुराव्यांसह खालील पत्त्यावर कळवावे.

निर्दिष्ट मुदतीत कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीसंबंधी कोणताही दावा नाही असे गृहित धरून पुढील व्यवहार करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा. मो.९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# तर बच्चू कडूंनी शिवसैनिक होउन आमदारकी घ्यावी-रामेश्वर पवळ

**अकोला/प्रतिनिधी :** बच्चू कडू यांनी शिवसैनिक होउन शिवसेनेच्या कोट्यातून विधान परिषदेची आमदारकी घेतल्यास कुणाचीही हरकत राहणार नाही. एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांच्या मनातील भावना जाणून अतिशय योग्य भूमिका घेतली. शिवसेनेत प्रहार विलीन केल्यास विदर्भात मोठी ताकद निर्माण होईल, असे मत शिवसेनेचे राज्य समन्वयक रामेश्वर पवळ यांनी व्यक्त केले आहे.

**बच्चू कडूंच्या नावावरून चर्चा अन् हालचालींना वेग-**विधान परिषदेवर शिवसेनेच्या कोट्यातून बच्चू कडू यांच्या नावाचा विचार होत असल्याची गेल्या काही दिवसांपासून चर्चा आहे. या संदर्भात शिवसैनिकांच्या तोंडाचा घास बाहेरच्या व्यक्तीला देउ नये, अशी भूमिका सर्वप्रथम रामेश्वर पवळ यांनी घेतली. बच्चू कडू यांच्या नावाला शिवसेनेतूनच विरोध झाला. या सर्व प्रकरणानंतर आता एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडू यांच्यासमोर पक्ष विलीन करण्याची अट ठेवल्याचे बोलल्या जात आहे. राजकीय हालचालींना वेग आला आहे.या संदर्भात रामेश्वर पवळ म्हणाले, उपमुख्यमंत्री तथा पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांच्या मनातील भावना ओळखली. शेवटी सर्वसामान्यांमध्ये जाणारा संदेश महत्त्वाचा आहे. बाहेरच्या व्यक्तीला एवढी मोठी संधी दिली असती तर सर्वसामान्य शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजीची भावना निर्माण झाली असती. मात्र, बच्चू कडू शिवसेनेत आल्यावर त्यांना ही संधी दिल्यास कुणालाही ते अडचणीचे ठरणार नाही. हे लक्षात घेउनच एकनाश शिंदे यांनी बच्चू कडू यांच्यापुढे प्रहार पक्ष शिवसेनेत विलीन करण्याची अट ठेवली असावी. सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या भावनांचा हा मोठा सन्मान आहे. एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांचा एवढा सन्मान करू शकतात. बच्चू कडू त्यांचा पक्ष शिवसेनेत विलीन करणार असतील, तर सर्वप्रथम त्यांच्या नावाची शिफारस करेल.



संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष- बच्चू कडू यांनी त्यांचा पक्ष एकनाश शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत विलीन करावा. शेतकरी, दिव्यांगांच्या प्रश्नांवर लढा देणा-या बच्चू कडू यांना पक्षनेतृत्व विधान परिषदेवर पाठवत असेल तर ते एक सकारात्मक पाउल ठरेल. शिवसेना वाढीसाठी त्याचा फायदा होईल. आक्रमक नेते बच्चू कडू शिवसेनेत आल्यास विदर्भात पक्ष वाढीसाठी निश्चितच फायदा होईल, असा विश्वास देखील रामेश्वर पवळ यांनी व्यक्त केला. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बच्चू कडू आता काय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष राहणार आहे.

# ऊपवर्गीकरणास 15 मेपर्यंत स्थगिती न दिल्यास मंत्रालयावर आक्रोश मोर्चा
## 18 मे पासून बेमुदत आंदोलन

**नागपूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अस्पृश्य जातींचे प्रश्न गोलमेज परिषदेत मांडले व अस्पृश्य हे हिंदू नाहीत, ते स्वतंत्र असल्याने त्यांच्याकरिता स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. सर्व अस्पृश्याना एकजूट केले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीमध्ये सुद्धा भेदभाव असल्याने ऊपवर्गीकरण



आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.न्यायालयाने नोंदवलेले मत एक व्यापक षडयंत्र असून आरक्षण संपवण्याची कुटनीती आहे. सर्व अनुसूचित जातीतील बांधवानी सजग असावे व एकजूट कायम ठेवावी, असे डॉ. सुखदेव थोरात यांनी व्यक्त केले.ते काष्ट्राईब महासंघ, भारतीय बौद्ध महासभा, संविधान परिवार, समता सैनिक दल, राष्ट्रीय संयुक्त मोर्चा, राष्ट्रीय चर्मकार महासंघ, आशा वर्कर्स संघटना व विविध सामाजिक संघटनाचे वतीने बानाई सभागृह नागपूर येथे अनुसूचित जातींचे ऊपवर्गीकरण व जनगणना आणि आंबेडकरी संगठनाची भूमिका व पुढील दिशा या विषयावर आयोजित जाहीर सभेत अध्यक्षीय भाषण करताना बोलत होते.

या प्रसंगी विचारपीठावर, प्रा डॉ. एन. व्ही. ढोके, ॲड. प्रदीप वाठोरे, ॲड. आकाश मून, इंजि. पद्माकर गणवीर, प्रा.रमेश पिशे, ज्ञानेश्वर काकडे, किशोर बिरला, अरुण गाडे,प्रा. राहुल मुन ऊपस्थित होते.याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक प्रा. ढोके म्हणाले की, बाबासाहेबानी शेड्युल्ड कास्टची स्थापना करून देशातील २५ कोटी जनतेला एकत्र केले त्यांच्या हक्का साठी संपूर्ण हयात घालवली. या सर्व समूहाला एकत्रित ठेवण्यासाठी बौद्ध धम्माची दीक्षा दिली. आज आरक्षण टिकवायचे असेल तर सर्व शेड्युल्ड कास्टच्या सर्व लोकांना बौद्ध धम्म स्वीकारावे लागेल.

ॲड. आकाश मून म्हणाले, ऊपवर्गीकरणची सुरुवात १९७५ सालापासून झाली आहे. इंद्रा साहनी प्रकरणात १९९२ मध्ये ११ न्यायाधीशांच्या खंडपीठाणे दिलेला निर्णय ७ न्यायाधीशांचे खंडपीठ बदलवू शकत नाही. अनुसूचित जातीतील जातींमध्ये भेदभाव न्यायालय करीत आहे. महाराष्ट्रात एका जातीसाठी ऊपवर्गीकरण हे जाती जातीत संघर्ष पेटवण्याचे मनुवादी कारस्थान जनतेने हाणून पाडावे. अनंत बदर समिती बेकायदेशीर असून या समितीचा अहवाल असंविधानिक असल्याचे मून म्हणाले. ॲड. प्रदीप वाठोरे म्हणाले की, संपूर्ण ऊपवर्गीकरण मागासवर्गीयांची कोंडी करण्यासाठी असून आरक्षण फक्त ऊच्च वर्गापर्यंत मर्यादित करायचे आरएसएसचे कारस्थान आहे..रमेश पिसे म्हणाले, रोहिणी आयोगाने सुद्धा ओबीसीचे ऊपवर्गीकरणची शिफारस केली असून ओबीसीत संघर्ष पेटवण्याचे कार्य होत आहे. सर्व ओबीसी, एससी, एसटी बांधवानी एकत्र येउन सत्तांतर करणे हाच ऊपाय आहे. ज्ञानेश्वर काकडे यांनी संपूर्ण चर्मकार समाज ऊपवर्गीकरणाचे विरोधात असल्याचे सांगितले. तर किशोर बिरला यांनी वाल्मिकी समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे आचरण करीत आहे. वाल्मिकी समाज ऊपवर्गीकरणच्या विरोधात असल्याचे ते म्हणाले. अरुण गाडे म्हणाले की, संघटनेतर्फे राज्य शासनाला नोटीस दिली असून १५ मे पर्यंत ऊपवर्गीकरण प्रक्रिया स्थगित न केल्यास मंत्रालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येईल. आझाद मैदान, मुंबई येथे आरक्षण हक्क कृती समिती द्वारा १८ मे पासून बेमुदत आंदोलन करण्यात येणार असल्याचे घोषित केले.

# १३०व्या घटना दुरुस्ती विधेयकाबाबत संयुक्त संसदीय समितीचा महाराष्ट्रात अभ्यास दौरा

**मुंबई/प्रतिनिधी :** संसदेच्या संयुक्त संसदीय समितीने संविधान (१३०वी दुरुस्ती) विधेयक २०२५, जम्मू-काश्मीर पुनर्गठन (दुरुस्ती) विधेयक २०२५ आणि केंद्रशासित प्रदेश शासन (दुरुस्ती) विधेयक २०२५ या महत्त्वपूर्ण विधेयकांवर सखोल चर्चा आणि व्यापक सल्लामसलत सुरू केल्याची माहिती समितीच्या अध्यक्षा अपराजिता सारंगी यांनी ह?टेल ताज येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.संविधान (१३०वी दुरुस्ती) विधेयक २०२५ तसेच जम्मू-कश्मीर पुनर्गठन (दुरुस्ती) विधेयक २०२५ आणि केंद्रशासित प्रदेश शासन (दुरुस्ती) विधेयक २०२५ संदर्भात मते जाणून घेण्यासाठी संयुक्तसंसदीय समिती २७ व २८ या दोन दिवसांसाठी महाराष्ट्र राज्याच्या अभ्यास दौ-यावर आली आहे. समितीने यासंदर्भात विविध घटकाशी संवाद साधला.संयुक्त संसदीय समितीच्या अध्यक्षा अपराजिता सारंगी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, ही तीनही विधेयके केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २० ऑगस्ट २०२५ रोजी लोकसभेत मांडली होती. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी ती तपासणी व अहवालासाठी संयुक्तसंसदीय समितीकडे वर्ग करण्यात आली. या समितीत लोकसभेतील २१ आणि राज्यसभेतील १० अशा एकूण ३१ संसद सदस्यांचा समावेश आहे.समितीने आतापर्यंत ९ बैठकांचे आयोजन करून गृह मंत्रालय, विधि व न्याय मंत्रालय, कायदा आयोग, विविध राष्ट्रीय कायदा विद्यापीठे, कायदा संशोधन संस्था तसेच राजस्थान, हरियाणा, मध्य प्रदेश आदी राज्य सरकारांचे प्रतिनिधी आणि इतर संस्थांचे




म्हणणे ऐकले आहे.संविधानिक नैतिकता जपणे आणि राजकारणाचे अपगुन्हेगारीकरण साध्य करण्याच्या दृष्टीने समितीने दिल्लीबाहेरही

## समितीकडून विविध राज्ये व कायदा तज्ज्ञांचे मत घेण्याची प्रक्रिया सुरू -अपराजिता सारंगी

बैठक घेण्याचा निर्णय घेतला असून, त्या अनुषंगाने समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गृह आणि विधि व न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी, न्यायिक संस्था व विधिज्ञ संघटनांचे मत प्रत्यक्ष ऐकण्यासाठी बैठक घेतली. २९ एप्रिल २०२६ रोजी भुवनेश्वर येथे जाउन ओडिशा सरकार आणि तेथील संस्थांकडूनही समिती मते जाणून घेणार असल्याचे सारंगी यांनी सांगितले.संविधान (१३०वी दुरुस्ती) विधेयक २०२५ द्वारे भारतीय संविधानातील कलम ७५, १६४ आणि २३९(अअ) मध्ये सुधारणा सुचवण्यात आली असून, गंभीर गुन्ह्यांच्या आरोपांखाली सलग ३० दिवस कोठडीत असणा-या ऊच्च घटनात्मक पदांवरील व्यक्तींना त्या काळात कार्यकारी अधिकारांचा वापर करता येउ नये, असा मुख्य हेतू असल्याचे सारंगी यांनी सांगितले.महत्वाच्या घटनात्मक विषयावर सर्वांगीण आणि सर्वसमावेशक चर्चा घडवून आणण्यास समिती बांधील असून, विविध संस्थाकडून प्राप्त होणा-या सूचनांमुळे लोकशाही संस्थांना बळकटी देतानाच संविधानिक मूल्यांचे संपूर्ण संरक्षण करण्यास मदत होईल, असा विश्वास समितीने व्यक्त केला. समितीकडून संवाद साधण्यात आलेल्या विविध संस्थाकडून आलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार केला जाणार असून, अंतिम अहवाल लोकसभा अध्यक्षमार्फत सभागृहात मांडला जाणार असल्याचेही सारंगी यांनी सांगितले.

# दक्षिण सुदानमध्ये भीषण विमान दुर्घटना!
## वैमानिकासह 14 जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दक्षिण सुदानमध्ये एक विमान दुर्घटना घडली आहे. दक्षिण सुदानची राजधानी जुबाच्या बाहेरील भागात विमान कोसळून वैमानिकासह १४ जणांचा मृत्यू झाला आहे. खराब हवामान आणि दृश्यमानता कमी असल्यामुळे हे विमान कोसळल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. सुदानच्या नागरी उड्डाण प्राधिकरणाने या अपघाताची पुष्टी केली आहे.आंतरराष्ट्रीय माध्यमांनी दिलेल्या विविध वृत्तांनुसार, जुबा येथे झालेल्या या विमान अपघातात सर्व १४ जणांचा (१३ प्रवासी आणि १ पायलट) मृत्यू झाला आहे. नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाच्या प्राथमिक अहवालानुसार, खराब हवामान आणि दृश्यमानता कमी असल्यामुळे हे विमान कोसळल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. दुर्घटना झालेले विमान सेसना विमान होते, अशी माहिती समोर आली आहे. समोर आलेल्या अधिकच्या माहितीनुसार, विमान दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांमध्ये दोन केनियाच्या नागरिकांचा समावेश आहे तर, उर्वरीत प्रवासी दक्षिण सुदानमधील असल्याचे सांगितले जात आहे. अपघाताची माहिती मिळताच संबधित अधिकारी आणि बचाव पथकाने अपघातस्थळी धाव घेतली. राजधानी जुबापासून २० किलोमीटरच्या अंतरावर हा अपघात झाल्याची माहिती आहे. सध्या अपघाताच्या कारणाचा शोध घेतला जात आहे.

# शैक्षणिक संस्थांसाठी अग्निशमन एनओसी प्रक्रियेत सुसूत्रता आणणार
### *मंत्री शंभूराज देसाई*

**मुंबई, दि. २७ :** शैक्षणिक संस्था व व्यावसायिक (कमार्शियल) आस्थापनांचे स्पष्ट वर्गीकरण केल्यानंतर आवश्यक ते परिपत्रक तातडीने जारी करावे, तसेच शाळा, शैक्षणिक संस्था आणि व्यावसायिक आस्थापनांसाठी अग्निशमन एनओसीचे दर वेगवेगळे निश्चित करण्यात यावेत, असे स्पष्ट निर्देश पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित महापालिका तसेच मुख्याधिका-यांना जबाबदार धरण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांना अग्निशमन विभागाकडून दरवर्षी एनओसी घेण्यासाठी करावा लागणारा खर्च, तसेच त्यासंदर्भातील अडचणींचा सविस्तर आढावा बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये विधानपरिषद लक्षवेधी क्र. ४१६ अंतर्गत मांडण्यात आलेल्या विषयाच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. राज्यातील शैक्षणिक संस्थांना दरवर्षी अग्निशमन विभागाकडून एनओसी घेण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असल्याची बाब विचाराधीन घेण्यात आली.



# सभागृहातील प्रलंबित आश्वासनांची विहित वेळेत पूर्तता करा
### विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** सभागृहात सदस्यांनी विविध संसदीय आयुधांद्वारे ऊपस्थित केलेल्या मुद्यांचे निराकरण विहित कालमर्यादेत होणे आवश्यक आहे. अतारांकित प्रश्न, औचित्याचे मुद्दे, लक्षवेधी सूचनांची निवेदने, विशेष उल्लेख सूचना, मंत्री महोदयांची आश्वासने, महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना याबाबत प्रलंबितता असल्यास ती तातडीने दूर करण्यात यावी. त्याचप्रमाणे एकाच विषयाची विविध संसदीय आयुधांद्वारे विधानपरिषद सभागृह कामकाजात पुनरावृत्ती होउ नये, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले. यासंदर्भात महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या सचिवांची महत्वपूर्ण बैठक घेण्यात येउन आढावा घेण्यात आला.या बैठकीस महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) जितेंद्र भोळे, सचिव (२) मेघना तळेकर-इटकेलवार, सचिव (३) डॉ. विलास आठवले, सचिव (४) शिवदर्शन साठ्ये आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी ऊपस्थित होत प्रलंबित कार्यवाहीची पूर्तता विहित कालमर्यादेत व्हावी यासाठी मंत्रालयीन विभागांशी स्मरणपत्रांच्या माध्यमातून सातत्याने संपर्क ठेवावा. विभागाचे सचिव आणि विभागाच्या मंत्री महोदयांचे खाजगी सचिव यांना प्रथम पत्र आणि त्यानंतर विभागाचे मंत्री महोदय आणि राज्याचे मुख्य सचिव यांना दुसरे पत्र पाठविण्यात यावे. यासंदर्भात महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने मंत्रालय विधान भवन समन्वयासाठी डॅशबोर्ड तयार केला असून तो सातत्याने अद्ययावत करण्यात यावा. सभागृहात एकाच विषयाची वेगवेगळ्या आयुधांमार्फत सभागृहात पुनरावृत्ती होणार नाही याबाबत अत्यंतीक दक्षता घेण्यात यावी, असे विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी स्पष्ट केले. अधिवेशन कालावधीतील प्रवेशपत्र वितरण प्रक्रिया आणखी कडक करण्यात यावी तसेच सुरक्षा यंत्रणेतील ३३ टक्के कर्मचारी वर्ग दर अधिवेशनाला चक्रक्रमानुसार पोलीस महासंचालकांशी समन्वय साधून बदलण्यात यावा, असेही निर्देश यावेळी त्यांनी दिले.

# नितेश राणेला एक महिन्याचा कारावास

**ओरोस :** मुंबई-गोवा महामार्ग अभियंता प्रकाश शेडेकर यांच्यावर चिखलफेक करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याच्या बहुचर्चित प्रकरणात जिल्हा न्यायालयाने सोमवारी (दि. २७ एप्रिल) निकाल दिला. न्यायालयाने सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांच्यासह अन्य २९ जणांची कलम ३५३ (शासकीय कामात अडथळा) मधून निर्दोष मुक्तता केली आहे. मात्र, सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी नितेश राणे यांना दोषी ठरवून एक महिना कारावास आणि एक लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. एस. देशमुख यांनी हा निकाल दिला. राणे यांच्या वकिलांनी या शिक्षेला स्थगिती मिळवून ऊच्च न्यायालयात धाव घेतली आहे. संशयितांच्यावतीने अड. संग्राम देसाई यांनी तर सरकार पक्षातर्फे सरकारी वकील रूपेश देसाई यांनी बाजू मांडली. तातडीने निर्णयाला स्थगिती घेत ऊच्च न्यायालयात अपील करण्यात आले आहे.

# बदलत्या काळातील गुन्ह्यांचे आव्हान स्वीकारण्यासाठी सज्ज होत काम करण्याची गरज-मुख्यमंत्री

### 36 व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-2026 चा समारोप

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र पोलीस दलाने बदलत्या काळातील सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांसारख्या आव्हानांना सामोरे जात अधिक सज्जतेने काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कलिना येथील सशस्त्र पोलीस मुख्यालयाच्या क्रीडांगणावर ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ च्या समारोप व बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रीमंगल प्रभात लोढा, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डा. पंकज भोईर, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा पाटणकर-म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते तसेच मुंबई पोलीस आयुक्त



देवेन भारती यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी ऊपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र पोलीस दल देशातील सर्वाधिक व्यावसायिक आणि सक्षम दलांपैकी एक असून कायदा व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे. राज्याच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीत पोलीस दलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पोलीस दलाचे दैनंदिन कार्य अत्यंत आव्हानात्मक असून अशा क्रीडा स्पर्धांमुळे फिटनेस, कौशल्य आणि संघभावना वृद्धिंगत होते. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पोलीस दल सातत्याने ऊज्वल कामगिरी करत आहे. अत्यंत ऊष्ण वातावरणातही स्पर्धांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल मुंबई पोलीस व आयोजकांचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी कौतुक केले. खेळामध्ये जिंकणे-हरणे यापेक्षा खेळाडूवृत्ती अधिक महत्त्वाची असल्याचे सांगत सर्व सहभागी खेळाडूंना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धांमध्ये यजमान मुंबई संघाने पुरुष व महिला गटात उत्कृष्ट संघाचा किताब पटकावला. ऊपविजेत्या संघासह वैयत्तिक्र व सांघिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणा-या सर्व खेळाडूंचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मृतीचिन्ह देउन अभिनंदन केले. १०० मीटर महिला स्पर्धेत पुणे शहरच्या निकिता संदीप खताळ आणि १०० मीटर पुरुष स्पर्धेत कोल्हापूर परिक्षेत्राच्या चैतन्य संतोष मरडे यांनी नवे विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल विशेष कौतुक केले.यावेळी मुख्यमंत्री फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक अपर मुख्य पोलीस महासंचालक मधुकर पांडे यांनी केले. पोलिस महासंचालक सदानंद दाते यांनी मनोगत व्यक्त केले. मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्यातील विविध पोलीस परिक्षेत्रातील खेळाडूंनी दिमाखदार संचलन सादर केले. यास पोलीस बँडची सुरेल संगीत साथ होती.

# ऊपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ग्रामीण ते अवकाश व्हिजन

## 59 ग्रामीण विद्यार्थ्यांची 'इस्त्रो' सफर

**ठाणे, दि. २७ :** जवळपास ९५०० विद्यार्थ्यांमधून निवड झालेल्या ५९ ग्रामीण विद्यार्थ्यांना थेट इस्त्रोसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेला भेट देण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्राचे ऊपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणा-या मिशन भरारी या ऊपक्रमातून ग्रामीण ते अवकाश हे व्हिजन प्रत्यक्षात ऊतरतानाचे चित्र पाहायला मिळत आहे. या शैक्षणिक सहलीला सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथून हिरवा झेंडा दाखवण्यात आला. मिशन भरारी ऊपक्रमाचे उद्घाटन २६ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. इयत्ता पाचवी ते आठवीच्या अभ्यासक्रमावर आधारित स्पर्धा परीक्षांद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. पहिल्या टप्प्यात ९३१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यातून २००७ विद्यार्थ्यांची तालुकास्तरावर निवड झाली आणि अंतिम टप्प्यात ४७८ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर परीक्षा घेण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेतून प्रत्येक तालुक्यातील सरासरी १० विद्यार्थ्यांची निवड करून एकूण ५९ विद्यार्थ्यांना या विशेष सहलीसाठी पात्र ठरवण्यात आले असून, यामध्ये ५४ मराठी माध्यम आणि ५ उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.



ही सहल केवळ पर्यटन नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आखलेला ऊपक्रम आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे तसेच विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जिज्ञासा निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे शिंदे म्हणाले. विद्यार्थ्यांना संशोधन, अवकाश विज्ञान, प्रयोगशाळा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे, याकडे देखील त्यांनी लक्ष वेधले.

सहल कार्यक्रमानुसार २८ एप्रिल रोजी विवेकानंद राक मेमोरियल, तिरु वल्लुवर पुतळा आणि सनसेट व्ह्यू पाईंटला भेट दिली जाईल. २९ एप्रिल रोजी विक्रम साराभाई स्पेस सेंटर, थुंबा इक्वेटोरियल राकेट लाँचिंग स्टेशन आणि प्रियदर्शिनी तारांगण येथे भेट दिली जाईल. ३० एप्रिल रोजी नैसर्गिक इतिहास संग्रहालये, तर १ मे रोजी नेपियर संग्रहालय येथे भेट देउन परतीचा प्रवास केला जाईल.विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. राहण्याची व्यवस्था फाईव्ह स्टार हाटेलमध्ये करण्यात आली असून, प्रवासासाठी वातानुकूलित बसेसची सुविधा ऊपलब्ध करून देण्यात आली आहे. सहलीदरम्यान वैद्यकीय अधिका-यांची ऊपस्थिती राहणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना ब्लेझर, टी-शर्ट, ट्रॅक पॅन्ट, कॅप, स्पोर्ट्स शूज, स?क्स, ओळखपत्र आणि ट्राली बॅग आदी साहित्य देण्यात येणार असल्याचे ऊपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.या ऊपक्रमासाठी ५० लाख रुपयांचा निधी ऊपलब्ध करून देण्यात आला असून, विद्यार्थ्यांना कोणतीही सुविधा कमी पडू नये, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या असल्याचे शिंदे म्हणाले.

जवळपास ९५०० विद्यार्थ्यांमधून ५९ विद्यार्थ्यांची निवड होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. जिल्हा परिषद शाळांमधील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इस्त्रोसारख्या संस्थेत जाण्याची संधी मिळत आहे.ते पुढे म्हणाले, एपीजे अब्दुल कलाम, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा यांनी नेहमीच ग्रामीण भागातील शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर भर दिला. त्या विचारांनुसार हा ऊपक्रम राबविण्यात आला आहे.

हे ५९ विद्यार्थी सहलीवरून परतल्यानंतर त्यांनी घेतलेले अनुभव जिल्हा परिषद शाळांमधील इतर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणार आहेत. त्यामुळे विज्ञानाविषयी कुतूहल आणि प्रेरणा निर्माण होणार असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा मिळणार आहे. या मुलांना इस्त्रो येथे पाठवण्यापूर्वी ऊपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या विद्यार्थ्यांची भेट घेतली.

# प्रत्येक व्यावसायिक वाहन चालकाला 'व्यवहारिक मराठी' अवगत असणे आवश्यक-परिवहन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात प्रवासी वाहन चालवण्याचा व्यवसाय करणा-या प्रत्येक चालकाला व्यवहारिक मराठी अवगत असणे आवश्यक आहे, यावर राज्य शासन ठाम आहे. ज्यांना मराठी येत नाही अशा अमराठी चालकांना ती शिकवण्यासाठी रिक्षा संघटनांनी सकारात्मक सहकार्य करावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

मंत्रालयातील आयोजित बैठकीत मंत्री सरनाईक बोलत होते. बैठकीला परिवहन आयुक्तराजेश नार्वेकर, कामगार नेते शशांक राव, संजय निरुपम, हजी अराफत शेख तसेच विविध रिक्षा व टॅक्सी संघटनांचे प्रतिनिधी ऊपस्थित होते.



मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र हे प्रगत राज्य असून रोजगारनिर्मिती हा सरकारचा प्रमुख उद्देश आहे. मात्र राज्यात व्यवसाय करताना आणि सर्वसामान्य प्रवाशांशी संवाद साधताना संबंधित चालकाला व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही किमान अपेक्षा आहे. राज्यभाषा म्हणून मराठीला सन्मान मिळावा, यासाठी अमराठी चालकांनी ती शिकणे आवश्यक आहे. प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी आवश्यक असलेली प्राथमिक मराठी चालकांना शिकवण्यासाठी शासन विविध ऊपाययोजना राबवत आहे. या ऊपक्रमात मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांसारख्या संस्थांचे तसेच साहित्यिकांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. याशिवाय रिक्षा व टॅक्सी संघटनांनीही मराठी शिकवण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे, ही अभिमानास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. अमराठी चालकांना मराठी शिकण्यासाठी ठराविक मुदत द्यावी, ही संघटनांची मागणी योग्य असून त्यावर सकारात्मक विचार सुरू आहे. तथापि, मराठी भाषा शिकणारच नाही अशी मजुरी दाखवणा-यांच्या बाबतीत मात्र कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्री सरनाईक यांनी दिला. तसेच मंगळवारी परिवहन आयुक्तलयात राज्यातील ५९ प्रादेशिक व ऊपप्रादेशिक परिवहन अधिका-यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली असून त्यामध्ये या विषयावर सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रिक्षाचालकांसाठी मराठी भाषेच्या व्यवहारिक ज्ञानासंदर्भात लघु अभ्यासक्रम तयार करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यानुसार जनजागृती ऊपक्रम राबवून चालकांना मराठी शिकण्यासाठी आवश्यक ते सहकार्य ऊपलब्ध करून दिले जाणार आहे, असे आश्वासन मंत्री सरनाईक यांनी दिले. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील व्यावसायिक प्रवासी वाहनचालकांना व्यवहारिक मराठी भाषा अवगत असणे अनिवार्य करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने ठोस पावले ऊचलण्यास सुरुवात केली असून या ऊपक्रमाला सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'आप'चा दैवदुर्विलास

भ्रष्टाचाराविरोधात एल्गाराची गर्जना करत तेरा वर्षांपूर्वी 'आप'ची स्थापना झाली. पक्ष संस्थापक अरविंद केजरीवाल सरकारी नोकरी सोडून राजकारणात आले होते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाची हमी देत त्यांनी सत्ता मिळवलीही. तथापि, नाकाने कांदे सोलणाऱ्यांचे जे होते, तेच केजरीवाल यांच्याही कपाळी आले. साधनसुचितेचा अविर्भाव दाखवणारे केजरीवाल मनमानी पद्धतीने वागू लागले.पक्ष स्थापनेपासून खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या दिग्गज आणि लोकप्रिय नेत्यांवर त्यांनी वक्रदृष्टी ठेवली. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. केजरीवाल यांनी जे स्वप्न दाखवले, तेच मुळी ठिसूळ पायावर उभे होते. बिनीच्या शिलेदारांना कस्पटासमान वागविण्याची त्यांची कृती अंगलट आली आहे. ज्या विश्वासाने लोकांनी 'आप'ला साथ दिली त्या विश्वासाला तडा गेला. चौदा वर्षांपूर्वी अण्णा हजारे यांनी नवी दिल्लीत भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन उभारले होते. आंदोलनावेळी केजरीवाल आणि अण्णांमध्ये मतभेद झाले. केजरीवाल बाहेर पडले आणि त्यांनी आम आदमी पार्टीची स्थापना केली. २०१३ मध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'आप'ला ७० पैकी २८ जागा मिळाल्या. काँग्रेसच्या कुबडीने केजरीवाल मुख्यमंत्री झाले. २०१५ च्या विधानसभा निवडणुकीत 'आप'ने दिल्लीत ७० पैकी ६७ जागा जिंकून विक्रम प्रस्थापित केला.२०२० च्या निवडणुकीत ६२ जागा जिंकून तिसऱ्यांदा सत्ता मिळवली. केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाची हॅट्ट्रिक केली. २०२२ मध्ये पंजाब विधानसभा निवडणुकीत पक्षाने ११७ पैकी ९२ जागा जिंकून नवा विक्रम केला. पक्षाने गुजरात, गोवा येथेही निवडणूक लढवली; पण फारसे यश पदरात पडले नाही. पण दिल्ली आणि पंजाबमध्ये लोकांना पर्याय मिळाला. या दोन्ही राज्यांत एकेकाळी प्रबळ काँग्रेस विकलांग झाली. नव्या पिढीने काँग्रेस पक्षाकडे पूर्ण पाठ फिरवली. पर्यायाच्या शोधात त्यांनी आम आदमी पक्षाला पसंती दिली. पंजाबात शिरोमणी अकाली दल पक्ष निष्प्रभ झाला होता आणि भाजपचे म्हणावे तेवढे ताकदवान अस्तित्व नव्हते. या पोकळीचा आम आदमी पक्षाला फायदा झाला. म्हणजे पक्षाला जे यश मिळाले ते बऱ्याचशा नकारात्मक पार्श्वभूमीवर, हे लक्षात घेतले पाहिजे. तथापि, आपल्यामुळेच हे यश आले, ही 'ग' ची बाधा केजरीवाल यांना झाल्याचे म्हटले जाते. त्यातून त्यांच्या अहंपणाच्या फुग्यात हवा भरली, असा सर्वसाधारण तर्क काढला, तर तो चुकीचा ठरणार नाही. दिल्लीत 'आप' सरकारने चांगली कामेही केली. वीज दरात ५० टक्के कपात, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुधारणा, यमुना नदी शुद्धीकरण या निर्णयांचे लोकांनी स्वागत केले. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यातही सरकारला प्रसंगी यश आले. तथापि, यानंतर केजरीवाल यांच्यात 'डॉन क्विक्झोट' संचारला असावा. कथित मद्य घोटाळ्यात ते अडकले आणि त्यांना जेलयात्रा करावी लागली. ते दोषमुक्त झाले, तरी ठपका राहिला आणि त्यातच एकेकाळच्या खंद्या समर्थकांशी त्यांचा आपपरभाव सुरू झाला. केजरीवाल कारावासात असताना राघव चड्ढा परदेशी गेले होते. तेथे त्यांचे काही फोटो प्रसिद्ध झाले. त्यावरून पक्षात उलटसुलट चर्चा होऊ लागली. केजरीवाल यांची तेव्हापासून राघव चड्ढा यांच्यावर खप्पामर्जी झाल्याचे सांगितले जाते. त्यातूनच नेते आणि केजरीवाल यांच्यात दुरावा निर्माण होत गेला. तथापि केजरीवाल यांनी समंजस भूमिका घेतली असती, तर राघव चड्ढा व इतर नेत्यांत बंड करायची वेळ आली नसती. केजरीवाल यांच्या स्वभावामुळे, वर्तणुकीने ती वेळ आली, अशीच याबाबत नोंद झाल्याशिवाय राहणार नाही. आता हे सातही खासदार भाजपमध्ये दाखल झाले. खा. राघव चड्ढा यांच्यासह इतर नेत्यांचा यात समावेश आहे. या फुटीचा 'आप'ला जबरदस्त फटका बसणार आहे. सात नेत्यांनी बंडाचे निशाण फडकावल्यावर केजरीवाल यांनी ही पंजाबच्या जनतेशी गद्दारी आहे, असे म्हटले आहे. तो पश्चात मिलाप झाला. ज्या नेत्यांनी हिरीरीने कष्ट करून 'आप'च्या पंजाबमधील ऐतिहासिक यशात सिंहाचा वाटा उचलला, त्या नेत्यांवरच जर दूषणे उलटणार असतील, तर त्या नेत्यांनी काय करावे? केजरीवाल यांच्याकडून होणाऱ्या मुस्कटदाबीला किती काळ सहन करावे?नेता जरी सर्वोच्च स्थानावर असला, तरी खंदे अनुयायी बरोबरीनेच मानणारा नेता यशस्वी होतो. केजरीवाल यांचा इतिहास कच्चा असावा आणि त्यांना वर्तमानाचेही भान नसावे, असाच निष्कर्ष या बंडावरून काढावा लागतो. 'आप'विषयी लोकांना अपेक्षा होत्या, काही तरी नवीन अनुभवाला येईल, अशी आशा होती. 'आप' दिलासा देईल, भ्रष्टाचारमुक्त राजवट देईल, अशी लोकांची भावना होती. तथापि, लोकांची निराशा झाली. इतर पक्षांप्रमाणेच 'आप'ची वाटचाल चालू झाल्याने केजरीवाल यांच्याविषयी प्रारंभी असलेल्या विश्वासाला जबरदस्त धक्का बसला आहे. जे सात खासदार पक्षातून बाहेर पडले, ते केजरीवाल यांच्याच तोलामोलाचे होते. राघव चड्ढा हे सुशिक्षित उमदा चेहरा होते. केजरीवाल कारावासातून बाहेर आल्यावर त्यांनी चड्ढा यांची राज्यसभेच्या उपनेते पदावरून हकालपट्टी केली. त्यांच्या जागी अशोक मित्तल यांची नियुक्ती केली; पण मित्तल यांनीही पक्षत्याग केला. संदीप पाठक हे राजनीतीकार म्हणून गाजलेले आहेत. पंजाबच्या यशामध्ये त्यांचे महत्त्वाचे सूत्रसंचालन होते. लवकरच पंजाबमध्ये विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामुळे या फुटीचा 'आप'ला फटका बसण्याची शक्यता आहे. पंजाबमध्ये सत्तांतर झाले आणि भाजप सत्तेवर आला, तर आश्चर्य वाटायचे कारण नाही. आता राज्यसभेतील भाजपचे संख्याबळ १५३ झाले आहे. त्यामुळे राज्यसभेत भाजपला विधेयक मंजूर करण्यात अडचण येणार नाही. सत्तेची नशा डोक्यात गेली की, स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्याची अवदसा आठवते. 'आप'मध्ये जे बंड झाले, त्याची पुनरावृत्ती होणार नाही, असे नाही. त्यामुळे स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेण्याचा उद्योग पुन्हा होणार नाही, असे नाही; पण 'आप'मधील या घटनाक्रमाच्या निमित्ताने लोकशाहीतील एक उमलत्या स्वप्नाचे तुकडे व्हावेत हा दैवदुर्विलास आहे.

# मजूर समस्या:शेतीत वानवा, शहरात शोषण

**ग्रामीण भागातील मजूर टंचाई आणि शहरी क्षेत्रातील मजुरांचा अतिरिक्त पुरवठा यातून एक जटिल आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला आहे. जोपर्यंत आपण शेतीला आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि पदवीधर तरुणांच्या प्रतिष्ठेला साजेसे बनवत नाही; तोपर्यंत हा मजुरांचा पेच सुटणार नाही. शेतीचे यांत्रिकीकरण आणि मजुरांना कायदेशीर संरक्षण या दोन आघाड्यांवर एकाच वेळी लढावे लागेल.**

जालना जिल्ह्यातील एका छोट्या गावात, निवृत्तीराव आपल्या कापसाच्या शेतात हताश होऊन बसले आहेत. शेतात कापूस वेचणीला आलाय, पण अख्ख्या गावात शोधले तरी मदतीला एक माणूस सुद्धा मिळेना झाला. दिवसाला ४०० रुपये मजुरी देऊनही कुणी फिरकेना. हतबल होऊन त्यांनी पुण्याला गेलेल्या आपल्या मुलाला, नारायणला फोन लावला. 'नारायण, अरे दोन दिवस तरी ये की. कापूस वेचला नाही तर मातीत जाईल. गावात कुणी मजूर मिळेना,' निवृत्तीराव कळवळून बोलले. पुण्याच्या ट्रॅफिकमध्ये अडकलेला नारायण मोबाइलवरचा 'टायमर' पाहत धापा टाकत म्हणाला, 'बाबा, इथे सहा महिन्यांच्या पिकापेक्षा १० मिनिटांच्या डिलिव्हरीला जास्त किमान किंमत आहे. एका मिनिटाचा उशीर झाला तरी माझा आजचा पगार कापला जाईल. मी आता नाही येऊ शकत...'

निवृत्तीरावच्या शेतात मजुरांच्या प्रतीक्षेत वेचणीविना पडून असलेला कापूस हा ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेच्या ढासळत्या स्थितीचे द्योतक आहे, तर शहरी अर्थव्यवस्थेतील वेळेचे अत्यंत कठोर व्यवस्थापन आणि त्यातून निर्माण झालेली तीव्र कार्यसंस्कृती ही शोषणात्मक स्वरूपाची आहे. ही विसंगती महाराष्ट्राच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक चित्राचे प्रतिबिंब आहे. ग्रामीण भागातील मजूर टंचाई आणि शहरी क्षेत्रातील मजुरांचा अतिरिक्त पुरवठा यातून एक जटिल आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला आहे.

### विदारक वास्तव

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार ही समस्या केवळ भावनिक उद्वेग नसून ती सांख्यिकीय दृष्ट्याही सिद्ध झाली आहे. मजूर टंचाई आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे राज्याचा कृषी विकास दर ३.४ टक्क्यापर्यंत मर्यादित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. गेल्या तीन वर्षांत ग्रामीण महाराष्ट्रात मजुरीच्या दरात वार्षिक ९.५ टक्के वाढ झाली असूनही प्रत्यक्ष पीक काढणीच्या मोसमात मजुरांची उपलब्धता सुमारे ४० टक्क्यांनी घटली आहे. किमान वेतन ३५० ते ४२० रुपयांच्या दरम्यान असताना, शेतकरी ४५० रुपयांपर्यंत मजुरी द्यायला तयार आहेत. मात्र, तरीही तरुणांनी शेतीकडे पाठ फिरवणे हे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या ढासळत्या सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात आहे.

### गिग इकॉनॉमी

या संकटाच्या मुळाशी असलेल्या कारणांचा सखोल वेध घेण्यापूर्वी, आधुनिक अर्थव्यवस्थेत परवलीची ठरलेली 'गिग इकॉनॉमी' (Gig Economy) ही महत्त्वाची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. गिग इकॉनॉमी म्हणजे एक अशी मुक्त बाजार व्यवस्था आहे जिथे कायमस्वरूपी नोकरीऐवजी कंत्राटी किंवा तात्पुरत्या स्वरूपाची कामे केली जातात.या आर्थिक आराखड्यामध्ये श्रमिक हे पारंपरिक अर्थाने कोणत्याही संस्थेचे अधिकृत कर्मचारी नसून, त्यांना एक 'स्वायत्त किंवा स्वतंत्र भागीदार' (Independent Partner) म्हणून गृहीत धरले जाते. हे सर्व व्यवहार प्रामुख्याने स्विगी, झोमॅटो, झेप्टो, ब्लिंकिट, ॲमेझॉन किंवा फ्लिपकार्ट यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे नियंत्रित केले जातात.सोप्या भाषेत सांगायचे तर, जोपर्यंत प्लॅटफॉर्मवरून काम (Gig) मिळते, तोपर्यंतच मोबदला मिळतो.

ही व्यवस्था लवचिकतेचे आणि कामाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न दाखवत असली तरी, प्रत्यक्षात ती मजुरांना कोणताही शाश्वत आधार किंवा सामाजिक सुरक्षा प्रदान करत नाही. यामध्ये प्रामुख्याने हॉटेलमधील अन्नपदार्थांची डिलिव्हरी, किराणा मालाचा जलद पुरवठा (Quick Commerce), ऑनलाइन खरेदी केलेल्या वस्तूंचे



वितरण, प्रवाशांची टॅक्सी किंवा दुचाकीवरून ने-आण आणि घरांची स्वच्छता किंवा उपकरणांच्या दुरूस्ती सेवा यांसारख्या वैविध्यपूर्ण कामांचा समावेश होतो.

### पदवीधर मजुरांचा नवा वर्ग

शेतमजुरी नाकारण्यामागे उच्च शिक्षणाचे वाढते प्रमाण हे एक महत्त्वाचे सामाजिक कारण ठरत आहे.आउटलुक बिझनेस आणि CIIE.CO (IIM अहमदाबाद) यांच्या ताज्या अहवालानुसार, भारतातील गिग मजुरांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचे वास्तव खालील तत्त्यावरून स्पष्ट होते. सुमारे चार हजार गिग मजुरांच्या सर्वेक्षणातून मिळालेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| शैक्षणिक पात्रता | मजुरांचे प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|
| माध्यमिक शाळा | २९% |
| उच्च माध्यमिक | २८% |
| पदवीधर | १५% |
| इंजिनिअरिंग पदवीधर | ७ ते ८% |
| प्राथमिक शिक्षण | १२% |
| औपचारिक शिक्षण नाही | ७.५% |
| डिप्लोमा | ७% |
| पदव्युत्तर | १.५% |

सर्वात चिंतेची बाब म्हणजे उच्च पदवीधरांचे या क्षेत्रातील वाढते स्थलांतर. सर्वेक्षणातील सुमारे १५% तरुण हे पदवीधर असून, त्यापैकी सुमारे निम्म्याहून अधिक (७% ते ८%) तरुण विशेषतः इंजिनिअरिंग शाखेचे शिक्षण घेतलेले आहेत. या सर्वेक्षणातील आणखी एक धक्कादायक वास्तव म्हणजे, गिग वर्कर्सपैकी ६० टक्क्यांहून अधिक मजूर हे प्रामुख्याने ग्रामीण भागातून उदरनिर्वाहासाठी शहरांकडे स्थलांतरित झालेले आहेत.

या उच्च पदव्यांच्या ओझ्यामुळे पदवीधर मुलाला शेतात राबणे 'मागे वळणे' वाटते. बी.ए. किंवा इंजिनिअर झालेला मुलगा शेतात कापूस वेचताना दिसला, तर सामाजिक स्तरावर त्याचा उपहास केला जातो. या सामाजिक दबावापोटी तो शहरात अनोळखी लोकांमध्ये डिलिव्हरी करणे पसंत करतो. तिथे त्याची ओळख पुसली गेल्याने त्याला कमीपणा वाटत नाही. गिग इकॉनॉमी या तरुणांच्या सामाजिक प्रतिष्ठेला धक्का न लावता काम उपलब्ध करून देते; जे शेती देऊ शकत नाही.

### डिजिटल शोषणाचे तंत्र

ग्रामीण तरुण आता पारंपरिक शेती सोडून ज्या गिग इकॉनॉमीकडे वळत आहेत, तिथे कोणताही माणूस नव्हे तर केवळ एक निर्दयी 'अल्गोरिदम' मालक असतो. ही व्यवस्था 'अल्गोरिदम मॅनेजमेंट'वर आधारित असल्याने मजुरांच्या प्रत्येक हालचालीवर डिजिटल पाळत ठेवली जाते. जेव्हा शहरात मजुरांची संख्या गरजेपेक्षा जास्त असते, तेव्हा या कंपन्यांकडे सौदेबाजीची प्रचंड शक्ती येते; अशा वेळी मजुरांना निवडीचे स्वातंत्र्य उरत नाही, तर त्यांना केवळ लादलेल्या अटी मान्य कराव्या लागतात.

रहदारी, खराब हवामान किंवा तांत्रिक बिघाड यांसारख्या मानवी नियंत्रणाबाहेरील घटकांचा विचार न करता, केवळ '१० मिनिटांत डिलिव्हरी' पूर्ण करण्याचे दडपण या तरुणांवर असते. जर हे उद्दिष्ट साध्य झाले नाही, तर अल्गोरिदमद्वारे मजुरांचे रेटिंग पाडले जाते. हे रेटिंग केवळ एक आकडा नसून तो त्यांच्या भविष्यातील कामाच्या संधी आणि मिळणाऱ्या 'इन्सेंटिव्ह'शी जोडलेला असतो. रेटिंग खालावल्यास दंड आकारणे किंवा थेट कामावरून काढून टाकणे (Id blocking) यांसारख्या कठोर कारवाया केल्या जातात. त्यामुळे या मजुरांच्या मानसिक स्वास्थ्यावर आणि रस्ते सुरक्षेवर गंभीर परिणाम होत आहेत.

हे तरुण तांत्रिकदृष्ट्या कंपनीचे कर्मचारी नसल्यामुळे त्यांना पीएफ, विमा किंवा पेन्शन यांसारखे कोणतेही सामाजिक सुरक्षा कवच मिळत नाहीत. फेअरवर्क इंडियाच्या अहवालानुसार, अनेक नामांकित प्लॅटफॉर्म कंपन्यांना कामगारांच्या सुरक्षेबाबत अत्यंत कमी गुण मिळाले आहेत. अल्गोरिदमसाठी तो डिलिव्हरी बॉय केवळ एक आकडा असतो, पण त्या १० मिनिटांच्या दबावाखाली नारायणसारखे हजारो तरुण आपला जीव मुठीत धरून पळत असतात.

### उत्पन्नाचा ताळेबंद आणि वास्तव

शहरात जरी पगाराचा आकडा मोठा वाटत असला, तरी वास्तवातील गणित वेगळे आहे. एका ग्रामीण शेतमजुराचे मासिक उत्पन्न ९,००० ते १२,००० रुपयांच्या दरम्यान असते. त्याचा राहण्याचा आणि खाण्याचा खर्च शहरापेक्षा खूपच कमी असतो. याउलट शहरी गिग वर्कर १५,००० ते २४,००० कमावत असला, तरी त्यातील ६,००० ते ९,००० केवळ गाडीचा हप्ता आणि इंधनावर खर्च होतात. शहरी राहणीमान आणि मेसचे ७,००० वजा जाता, एका डिलिव्हरी बॉयच्या हातात शेतमजुरापेक्षाही कमी म्हणजे केवळ ४,००० ते ८,००० रुपये उरतात.

### कर्जाचा सापळा

सर्वात विदारक विरोधाभास मुद्रा (MUDRA) योजनेच्या बाबतीत पाहायला मिळतो. ज्या योजनेचा मूळ उद्देश तरुणांना उद्योजक बनवणे हा होता, तोच योजना आज सुशिक्षित तरुणांसाठी कर्जाचा विळखा ठरत आहे. आरबीआयच्या आकडेवारीनुसार, मुद्रा योजनेअंतर्गत वाटप केलेल्या एकूण 'शिशु' कर्जापैकी लक्षणीय वाटा हा दुचाकी खरेदीसाठी वापरला जातो. उपलब्ध आकडेवारीनुसार, सुमारे ६० लाख ते ८० लाख 'शिशु' कर्ज खाती ही प्रामुख्याने डिलिव्हरी आणि तत्सम सेवांसाठी दुचाकींच्या खरेदीशी संबंधित आहेत. हे प्रमाण मुद्रा योजनेच्या एकूण 'शिशु' कर्ज वितरणाच्या जवळपास ६५ ते ७० टक्के इतके असल्याचे दिसून येते. अनेक तरुण या योजनेतून ५०,००० रूपयांपर्यंतचे 'शिशु' कर्ज घेऊन डिलिव्हरीसाठी दुचाकी विकत घेतात. दरमहा भरावा लागणारा हप्ता आणि पेट्रोलचा वाढता खर्च यामुळे या तरुणाकडे शहरात दिवसाला १२ ते १४ तास राबण्याशिवाय पर्याय उरत नाही. हप्ता वेळेवर न भरल्यास सिबिल स्कोर खराब होण्याची भीती आणि कायदेशीर कारवाईच्या दडपणाखाली हे तरुण कंपन्यांच्या जाचक अटी निमूटपणे स्वीकारतात. अशा प्रकारे, ज्या कर्जाचा उपयोग स्वावलंबी होण्यासाठी व्हायला हवा होता, तेच कर्ज तरुणांना शहराच्या अर्थव्यवस्थेत 'अदृश्य गुलाम' म्हणून राबण्यास भाग पाडत आहे.

### भविष्यातील दिशा

आपल्याला केवळ शेती किंवा कंपन्यांचा वेगळा विचार करून चालणार नाही, तर या संपूर्ण व्यवस्थेचा फेरविचार करावा लागेल. धोरणकर्त्यांनी बेरोजगारीच्या या वाढत्या संकटावर ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे; जेणेकरून उच्चशिक्षित तरुणांना गिग इकॉनॉमीच्या शोषणात्मक चक्रात अडकावे लागणार नाही. यासोबतच, गिग वर्कर्सच्या कायदेशीर अधिकारांचे सक्षमीकरण करणे ही काळाची गरज आहे. प्लॅटफॉर्म कंपन्यांनी '१० मिनिटांच्या डिलिव्हरी' सारख्या अवास्तव आणि अव्यवहार्य अपेक्षांना तिलांजली देणे आवश्यक आहे, कारण अशा अमानवीय अटींमुळे मजुरांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे.

जोपर्यंत आपण शेतीला आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि पदवीधर तरुणांच्या प्रतिष्ठेला साजेसे बनवत नाही, तोपर्यंत हा मजुरांचा पेच सुटणार नाही. शेतीचे यांत्रिकीकरण आणि मजुरांना कायदेशीर संरक्षण या दोन आघाड्यांवर एकाच वेळी लढावे लागेल. नारायणला त्याच्या पदवीचा अभिमान वाटेल असे कृषी-उद्योजकतेचे स्वरूप निर्माण करणे गरजेचे आहे. जेव्हा शेती केवळ मजुरी न राहता मूल्यवर्धन आणि प्रक्रिया उद्योग बनेल, तेव्हाच हा शिक्षित तरुण पुन्हा गावाकडे वळेल. नारायणचा जीव १० मिनिटांच्या डिलिव्हरीमध्ये नव्हे, तर शेतीच्या प्रगतीत आणि सुरक्षित कामाच्या हक्कांमध्ये सुरक्षित असायला हवा.(साभार-सकाळ ॲग्रोवन)

**अमोल साळे**
मो.७०८३५८१२८१
(लेखक आर्थिक विषयांचे अभ्यासक आहेत.)

# शाश्वत विकास-आजची अपरिहार्य गरज

विकासाच्या शर्यतीत जग वेगाने धावत असताना, 'शाश्वत विकास' हा शब्द केवळ चर्चेपुरता मर्यादित राहू नये,हीच काळाची मागणी आहे. आर्थिक प्रगती, औद्योगिकीकरण आणि नागरीकरण यामुळे जीवनमान उंचावले असले, तरी त्याची किंमत पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या रूपाने मोजावी लागत आहे. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे ही आजची सर्वात मोठी गरज ठरते.गेल्या काही दशकांत पाणीटंचाई, हवामान बदल, जंगलतोड आणि प्रदूषण यांसारख्या समस्या गंभीर होत चालल्या आहेत. शहरांमध्ये वाढत चाललेले प्रदूषण, तर ग्रामीण भागात कमी होत चाललेले जलस्रोत, ही त्याची जिवंत उदाहरणे आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेकाने वापर केल्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी संकट उभे राहण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे 'आजचा विकास' हा 'उद्याच्या विनाशाचा' कारण ठरू नये, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

शाश्वत विकास म्हणजे असा विकास, जो वर्तमानाच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. ही संकल्पना केवळ पर्यावरणापुरती मर्यादित नसून, ती सामाजिक आणि आर्थिक समतोल साधण्यावरही भर देते. उदाहरणार्थ, ऊर्जा बचत, जलसंवर्धन, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती यांसारख्या उपाययोजना केवळ पर्यावरणाचे संरक्षण करत नाहीत, तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरतात.सरकारकडून विविध योजना राबवल्या जात असल्या, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि जनसहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. प्लास्टिक बंदी, वृक्षारोपण मोहिमा, पाणी अडवा-पाणी जिरवा यांसारख्या उपक्रमांना लोकांनी सक्रिय पाठिंबा दिला, तरच त्यातून अपेक्षित परिणाम साध्य होऊ शकतो. शाश्वत विकास ही केवळ शासनाची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

आजच्या पिढीसमोर मोठे आव्हान आहे.विकासाचा वेग कायम ठेवत, निसर्गाचा समतोल कसा राखायचा?यासाठी शिक्षणातून पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे, नवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे आणि जबाबदार जीवनशैली अंगीकारणे गरजेचे आहे. 'कमी वापर, अधिक जतन' हीच शाश्वत विकासाची गुरुकिल्ली ठरू शकते. एकंदरीत, शाश्वत विकास ही पर्याय नसून गरज आहे. आज घेतलेले निर्णयच उद्याचे भविष्य ठरवणार आहेत. त्यामुळे विकासाच्या प्रत्येक पावलावर पर्यावरणाचा विचार करून, संतुलित आणि जबाबदार दृष्टिकोन स्वीकारणे हीच खरी प्रगती ठरेल.

**विरेंद्र सोनवणे**
मो.८८८८२४४८८३

# भगवान नृसिंह अवतार म्हणजे अधर्मावर धर्माचा विजय!



भगवान विष्णूचा प्रत्येक अवतार हा दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठीच असतो. ३० एप्रिल रोजी भगवान विष्णूच्या चौथ्या अवताराची नृसिंह जयंती आहे. हिरण्यकश्यपूला वाटायचं,' मीच ईश्वर आहे ,सर्वांनी माझंच नाव घ्यावं त्याचाच मुलगा भक्त प्रल्हाद हा विष्णुभक्त होता. जळी, स्थळी,काष्ठि, पाषाणी ईश्वर आहे. अशी त्याची श्रद्धा होती. पण हिरण्यकश्यपूला ते मान्य नव्हते. त्याच्यातला अहंकार, राक्षसी प्रवृत्ती इतकी वाढली होती की, त्याने स्वतःच्याच मुलाचा छळ केला. त्यासाठी भगवंताला नृसिंह अवतार घेऊन त्याचा नाश करावा लागला. जेव्हा जेव्हा अधर्म वाढतो ,तेव्हा तेव्हा धर्माच्या स्थापनेसाठी आणि सज्जनांच्या रक्षणासाठी प्रत्येक युगात ईश्वर अवतार घेतो असे श्रीकृष्ण वचन आहे .आज सर्वत्र अनाचार, अत्याचार, अधर्म वाढलेला दिसतो आहे ,दुष्ट प्रवृत्तींची आक्रमणे वाढलेली आहेत. पहलगाम हे त्याचे उदाहरण आहे. यासाठी हे ईश्वरा खरंच अवतार घे !आणि तुझ्या वाचनाप्रमाणे धर्माची संस्थापना आणि सज्जनांचे रक्षण कर आणि नांदू दे शांती या भारत वर्षात

**रमा देशमुख**

## संवाद

# मराठी सक्ती निर्णयानंतर मुजोरी वाढली

एकीकडे शासनाने मुंबईसह महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय घेतल्यानंतर समाजमाध्यमातून 'मराठी में बात नाही करेंगे' असे म्हणणाऱ्या मुजोर रिक्षा-टॅक्सी चालकांचे अनेक व्हिडीओ वायरल झाले. तर दुसरीकडे मुंबई शहर आणि उपनगरातील विविध रेल्वे स्थानकांबाहेर रिक्षा आणि टॅक्सी चालकांची मुजोरी कमालीची वाढली असून जवळच्या भाड्यास नकार देणे, जादा व मनमानी भाडे आकारणे, प्रवाशांबरोबर उद्धट वर्तन करणे, रेल्वे स्थानकांबाहेर वाहतूक कोंडी करणे असे प्रकार जोमात सुरु झाले आहेत. रेल्वे स्थानकांहून १.५ ते २ किमी अंतरासाठी मीटरनुसार अंदाजे ३० रुपये भाडे होत असताना चालकांकडून या अंतरासाठी माणशी ३० ते ४० रुपये मागितले जातात. एका रिक्षात केवळ ३ प्रवाशांची परवानगी असतानाही ४ ते ५ प्रवासी कोंबून नेले जातात. अनेक ठिकाणी प्रत्यक्ष पोलिसांच्या समोर हे प्रकार घडतात पण पोलीस हस्तक्षेप करत नाहीत. एकूणच मुंबईतील रिक्षा, टॅक्सीवाल्यांच्या वाढत्या मुजोरीपणामुळे सामान्य मुंबईकरांना नाहक त्रास भोगावा लागत आहे.

**- प्रदीप मोरे**

# यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँकेत शासनाचे ‘धडकले’ आदेश

## संचालक मंडळ बरखास्त, प्रशासक नेमणुकीने सहकार क्षेत्रात खळबळ

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभारावर अखेर शासनाने थेट ‘हातोडा’ मारत संचालक मंडळ बरखास्त करण्याचा धडक निर्णय घेतला. मुदत संपल्यानंतरही निवडणुका न झाल्याने निर्माण झालेल्या अनिश्चिततेवर शिक्कामोर्तब करत तातडीने प्रशासक नेमण्यात आला असून, या निर्णयामुळे सहकार क्षेत्रासह राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सोमवारी (ता. 27) शासनाचे आदेश प्राप्त होताच जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी प्रशासक म्हणून तात्काळ पदभार स्वीकारला. यानंतर बँकेचा संपूर्ण कारभार प्रशासनाच्या ताब्यात गेला आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळाची मुदत 20 डिसेंबर 2025 रोजी संपुष्टात आली होती. त्यानंतर निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असली तरी प्रारूप मतदार यादीवर आक्षेप घेण्याच्या टप्प्यावर न्यायालयाने ‘जैसे थे’ आदेश दिल्याने प्रक्रिया ठप्प झाली.



परिणामी, मुदत संपूनही संचालक मंडळ कायम राहिल्याने कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. सहकार कायद्यानुसार अशा परिस्थितीत प्रशासक नेमण्याची तरतूद असली, तरी निवडणूक प्रक्रिया सुरू असताना थेट बरखास्तीचा निर्णय घेतल्याने शासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. या निर्णयामागे राजकीय समीकरणांचा प्रभाव असल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे. दरम्यान, बरखास्त करण्यात आलेल्या संचालकांनी या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. “निवडणुका लांबणीवर टाकून मंडळ बरखास्त करणे अन्यायकारक आहे,” अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. शासनाचा आदेश मिळताच संचालकांनी तातडीने नागपूर गाठल्याची माहिती समोर येत असून, आदेशाविरोधात न्यायालयात ‘स्टे’ मिळविण्याची हालचाल सुरू झाली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत प्रशासक कायम राहणार की संचालक मंडळाला दिलासा मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यवतमाळ जिल्हा बँकेतील ही कारवाई केवळ प्रशासकीय आहे की राजकीय हस्तक्षेपाचा भाग, हा खरा प्रश्न आहे. सहकार संस्थांमध्ये पारदर्शकता आणि वेळेत निवडणुका घेणे जितके आवश्यक आहे, तितकेच अचानक घेतलेले असे निर्णय लोकशाही प्रक्रियेवर सावली टाकणारे ठरू शकतात. आता न्यायालयीन लढाईतूनच या निर्णयाचे खरे स्वरूप स्पष्ट होणार आहे.

### बैठकीतच ‘धडक’ आदेश

विशेष म्हणजे, सोमवारी संचालक मंडळाची बैठक सुरू असतानाच बरखास्तीचे आदेश बँकेत दाखल झाले. तक्रारींच्या पत्रावर चर्चा सुरू असतानाच आलेल्या या आदेशामुळे संचालकांना अक्षरशः धक्का बसला. आदेश मिळताच बैठक आटोपती घेण्यात आली.

# “बांधकाम विभागचा कारभार ‘पारदर्शक’ की ‘संशयास्पद’?

## यवतमाळात कोट्यवधींच्या कामांवर प्रश्नचिन्ह”, निधी वाटप, टेंडर प्रक्रियेवर संशयाची छाया

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभार आणि टेंडर प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या विभागाला मिळणाऱ्या शासकीय निधीतून कामे वाटप, टेंडर प्रक्रिया आणि कामांच्या अंमलबजावणीबाबत विविध स्तरांतून नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः 2025-26 या कालावधीत मजूर कामगार योजनांअंतर्गत मजूर कामगार सहकारी सोसायट्यांच्या नावावर नेमके किती कामांचे वाटप करण्यात आले, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसल्याने विभागाच्या कार्यकारी अभियंता आणि त्यांच्या मार्फत काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर संभ्रमाचे वातावरण आहे.



विभागामार्फत सुमारे 200 कोटी रुपयांची कामे झाल्याची चर्चा असताना, प्रत्यक्षात शासनाकडून केवळ 7 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाल्याचे सांगितले जात आहे. पण या पार्श्वभूमीवर निधीच्या वापराबाबत पारदर्शकतेचा अभाव असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जवळपास 90 कोटी रुपयांचा निधी केवळ नेर तालुक्यात खर्च करण्यात आल्याची चर्चा असून, त्यामुळे इतर तालुक्यांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. दरम्यान, यवतमाळ शहरातील नव्या पोलीस स्टेशनच्या बांधकामानंतर जुन्या इमारतीतील लोखंड व इतर साहित्याची विल्हेवाट लावताना नियमांचे पालन झाले नसल्याचे बोलले जात आहे, मिळालेल्या माहितीनुसार या इमारतींमधून निघालेला लाखो रुपयांचा स्क्रॅप मनमानी पद्धतीने आणि टेंडर न काढता फक्त एस्टिमेटच्या आधारावर विकून सरकारला चुना लावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.त्यामुळे या प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित प्रक्रियेसाठी आवश्यक निविदा काढण्यात आल्या होत्या का, याचीही चौकशी होणे गरजेचे झाली आहे. यात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपले उखळ केल्याची चर्चा आहे. याव्यतिरिक्त पी.डब्ल्यू.डी विभागातून निघणाऱ्या टेंडर प्रक्रियेत अनियमितता झाल्याच्या चर्चा रंगत असून, काही कामे सोयीच्या ठेकेदारांना देण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये मोजमाप पुस्तिका (एमबी बुक) संबंधित माहिती उपलब्ध होत नसल्याची तक्रारही समोर आली आहे. तसेच यवतमाळातील शासकीय विश्रामगृहांच्या बांधकाम आणि देखभालीकडे कार्यकारी अभियंता आणि शाखा अभियंत्याकडून गभीर दुर्लक्ष होत असल्याची बाबही पुढे येत असून, काही ठिकाणी निधीचा योग्य वापर होत नसल्याची चर्चा आहे.याशिवाय, या विभागात विविध कामांमध्ये इस्टिमेट नुसार अंमलबजावणी न झाल्याच्या तक्रारी असून 42-10 या लेखा प्रमुखा खालील तसेच 20-59, 04, 22-65, 58-54 42-10 या कामांची सखोल चौकशी आणि विविध हेडखाली झालेल्या कामांची चौकशी होणे आवश्यक आहे. याच विभागाने नगरपरिषद यवतमाळ अंतर्गत येणाऱ्या काही कामांसाठी निविदा प्रक्रिया राबवत स्वहित जोपासत जवळील ठेकेदारांना कामे देण्यात आल्याच्या चर्चांमुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, या सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व विविध संघटनांकडून केली जात आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देत पारदर्शकता राखावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## वेचक



### भीम आर्मी व आझाद समाज पार्टी यांच्या कडून उपवर्गीकरणाविरोधात आंदोलन

पुसद - अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाच्या निषेधार्थ आज तीव्र आंदोलन करण्यात आले. भीम आर्मी संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर आझाद खासदार उत्तर प्रदेश व भीम आर्मी राष्ट्रीय अध्यक्ष विनय रतन सिंग, व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अशोक कांबळे यांच्या आदेशाने आंदोलनादरम्यान भीम आर्मी महाराष्ट्र प्रदेश संघटक अशोकराव भालेराव यांनी महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा अन्यथा पूर्ण महाराष्ट्र मध्ये आंदोलन केल्या जाईल संविधानाच्या अनुच्छेद 341 नुसार अनुसूचित जातीची यादी एक संघ आहे राज्य सरकारांना त्यात उप वर्गीकरण करून या जातीला जास्त त्या जातीला कमी असं ठरवण्याचा अधिकार नाही तरीसुद्धा महाराष्ट्र सरकार कायद्याचे उल्लंघन करीत आहे हे कदापि मान्य केले जाणार नाही असे मत अशोक भालेराव यांनी व्यक्त केले आणि या निर्णयाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्या व आपला संताप व्यक्त केला.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/३४१/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १३/०४/२०२६

जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद कलीम सय्यद रज्जाक रा उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दिनांक-06/08/1983 मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज था कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.04.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा./-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# चक्काजामचा इशारा..! खा. प्रतिभा धानोरकरांचा ठाम पाठिंबा

## उकणी प्रकल्पग्रस्तांचा रोजगारासाठी एल्गार; ३ मे अंतिम मुदत

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी : उकणी प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने स्थानिक युवक-युवतींना रोजगार मिळावा या मागणीसाठी ३ मेपासून पुकारण्यात आलेल्या चक्काजाम आंदोलनाला खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी ठाम पाठिंबा दर्शविला आहे. रविवारी काँग्रेस नेते संजय खाडे यांच्या नेतृत्वाखाली समितीच्या पदाधिकाऱ्यांनी वरोरा येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देत सविस्तर निवेदन सादर केले.

समितीच्या निवेदनात वणी तालुक्यातील मौजे उकणी परिसरातील सुशिक्षित तसेच कुशल-अकुशल बेरोजगार युवक-युवतींना स्थानिक स्तरावर रोजगार देण्याची मागणी अधोरेखित करण्यात आली. विशेषतः हेव्ही वाहन परवाना धारक चालकांसह सुमारे २०० हून अधिक प्रकल्पग्रस्तांना एम/एस नारायणी



अँड सन्स कंपनीमध्ये प्राधान्याने नोकरीत सामावून घेण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, कंपनी व्यवस्थापनाकडून अद्याप ठोस निर्णय न झाल्याने स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. दरम्यान, संघर्ष समितीने कंपनीला ३ मेपर्यंतची अंतिम मुदत दिली असून, या कालावधीत समाधानकारक तोडगा न निघाल्यास तीव्र स्वरूपाचे चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी निर्णायक लढा उभारण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. या पार्श्वभूमीवर खासदार धानोरकर यांनी प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत प्रशासन व कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा करून सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. “प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य मागण्यांसाठी आपण त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहू,” असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस समितीचे पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ७ ते १२ वर्षापासून कार्यरत असलेल्या 'त्या' कर्मचाऱ्यांची बदली त्वरित करा !

ढाणकी - बिटरगांव पोलीस स्टेशन अंतर्गत ढाणकी पोलीस चौकी येथे सद्यस्थीतीत, काही कर्मचारी गेल्या सात ते बारा वर्षांपासून कार्यरत आहेत. महाराष्ट्र पोलीस दलातील नियमांनुसार, एका पोलीस स्टेशनमध्ये पोलीस शिपायाचा (कॉन्स्टेबल) सामान्य कार्यकाळ साधारणपणे २ ते ५ वर्षांचा असतो. परंतु बिटरगांव पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या ‘त्या' कर्मचाऱ्यांना हा नियम लागू होत नाही का ? सदर कर्मचारी एवढ्या वर्षापासून एकाच ठिकाणी असल्याकारणाने त्यांचे अवैध धंदेवाल्यांशी हितसंबंध निर्माण झाल्यामुळे, सामान्य नागरिकांनी पोलिसांकडून न्यायाची अपेक्षा करावीच तरी कशी ? आमची कुणीच बदली करू शकत नाही, कारण आमच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वरदहस्त आहे. अशा तोऱ्यात ते कर्मचारी शहरात वागताना दिसत आहेत. कारण पोलीस चौकीत जर एखादे प्रकरण गेलेचं तर, इकडच्या बाजूची खबर तिकडच्या बाजूवाल्यांना सांगायची आणि तिकडची खबर इकडे सांगून मॅनेज करण्याचे प्रकार हे सर्रास सुरू असल्याच्या चर्चेला शहरात उधाण आलेले आहे.

# ‘गाईला राष्ट्रमाता घोषित करा’

## गो सन्मान अभियानांतर्गत तहसीलदारांना निवेदन



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - देशाच्या संस्कृतीत गायीला असलेले अनन्यसाधारण महत्त्व आणि तिचे आध्यात्मिक व आर्थिक योगदान लक्षात घेता, गायीला 'राष्ट्रमाता' म्हणून घोषित करावे, या मागणीसाठी यवतमाळ येथे 'गो सन्मान अभियान' मोठ्या उत्साहात राबवण्यात आले. या अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या व्यापक स्वाक्षरी मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. गोभक्तांच्या हजारो स्वाक्षऱ्यांचे निवेदन आज यवतमाळच्या तहसीलदार साहेबांना सादर करण्यात आले.

यावेळी आंदोलकांनी भावना व्यक्त केल्या की, भारतीय गाय ही केवळ एक पशू नसून ती कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. गाईचे जतन आणि संवर्धन व्हावे, तसेच तिला कायदेशीररीत्या सर्वोच्च सन्मान मिळावा, ही काळाची गरज आहे. या मोहिमेत सामाजिक संस्था, धार्मिक संघटना आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. तहसीलदार साहेबांना निवेदन देताना शिष्टमंडळाने आग्रही मागणी केली की, जनभावनेचा आदर करून हे निवेदन राज्य व केंद्र सरकारपर्यंत त्वरित पोहोचवावे. "गाईला राष्ट्रमाता घोषित केल्यास गोवंश हत्या थांबण्यास आणि देशी गोवंशाच्या संरक्षणास मोठी मदत होईल," असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. या अभियाना मुळे जिल्ह्यात गोसंवर्धनाच्या विषयावर मोठी जनजागृती निर्माण झाली आहे.

# लग्नाच्या गोंधळात शिष्यवृत्ती परीक्षा

## भुलाई केंद्रावर विद्यार्थ्यांचा भविष्याशी खेळ!

जनमाध्यम प्रतिनिधी

दारव्हा - तालुक्यातील भुलाई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेदरम्यान गंभीर गोंधळ उडाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. परीक्षा सुरू असताना त्याच परिसरात विवाह सोहळा सुरू असल्याने विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. या पार्श्वभूमीवर संबंधित परीक्षा रद्द करून पुनर्परीक्षा घ्यावी, तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने 26 एप्रिल रोजी सकाळी 11 ते दुपारी 3.30 या वेळेत परीक्षा आयोजित करण्यात आली होती. मात्र, विद्यार्थी केंद्रावर पोहोचल्यावर तेथे विवाहासाठी उभारलेला मंडप, स्वयंपाकाची तयारी आणि गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले. सुरुवातीला प्रशासनाने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला,



मात्र प्रत्यक्षात त्याच ठिकाणी लग्न सुरू असल्याचे स्पष्ट झाले. अधिक गंभीर बाब म्हणजे परीक्षा सुरू असतानाच डी.जे. आणि साऊंड सिस्टीमचा कर्णकर्कश आवाज सुरू होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना एकाग्रतेने पेपर लिहिता आला नाही. या प्रकारामुळे त्यांच्या शैक्षणिक भविष्यावर परिणाम झाल्याचा आरोप पालकांनी केला आहे. या प्रकरणी विद्यार्थी पालक विशाल चव्हाण यांनी उपविभागीय अधिकारी, दारव्हा यांना निवेदन देत केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास पंचायत समितीसमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह वक्तव्यांवर कारवाईची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - छत्रपती शिवाजी महाराजांविषयी करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह व ऐतिहासिकदृष्ट्या चुकीच्या वक्तव्यांप्रकरणी कठोर कारवाई करण्याची मागणी करत शहर काँग्रेस कमिटी, यवतमाळ यांच्या वतीने राज्याचे गृहमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या मार्फत पाठविण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अलीकडे नागपूर येथे झालेल्या एका कार्यक्रमात धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर बाबा) यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेले विधान हे ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचे असून त्यांच्या कार्याचा अवमान करणारे असल्याचा



आरोप करण्यात आला आहे. शिवाजी महाराजांनी आपला राज्यकारभार समर्थ रामदास स्वामींच्या स्वाधीन केल्याचा दावा तसेच त्यांना शिष्य असल्याचे केलेले विधान समाजात संभ्रम निर्माण करणारे असल्याचे म्हटले आहे. तसेच, शिवसेना (शिंदे गट) चे आमदार संजय गायकवाड यांनी लेखक गोविंद पानसरे यांच्या ‘शिवाजी कोण होता’ या पुस्तकाच्या संदर्भात प्रकाशकाला फोनवरून दिलेल्या कथित धमक्या आणि वापरलेली शिवराळ भाषा ही निषेधार्ह असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा आधार घेत अशा प्रकारची आक्रमक भाषा वापरणे समाजात भीती व तणाव निर्माण करणारे असल्याची टीकाही करण्यात आली आहे. या दोन्ही घटनांमुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तींवर तात्काळ गुन्हा नोंदवून कठोर कारवाई करावी, अशा प्रकारच्या वक्तव्यांवर शासनाने स्पष्ट व कडक भूमिका घ्यावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हे निवेदन शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, सौ. वैशाली सवाई, जावेद अन्सारी आदींच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.

# उमरखेडमध्ये माता वासवी जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - आर्य वैश्य समाजाच्या वतीने माता वासवी कन्यका परमेश्वरी जयंती महोत्सव २०२६ निमित्त आज दि. २६ एप्रिल रोजी शहरात भव्य व उत्साहपूर्ण शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. सकाळी ७.३० वाजता आर्य वैश्य भवन येथून या शोभायात्रेला प्रारंभ झाला.

ही शोभायात्रा माहेश्वरी चौक, महात्मा गांधी चौक, खडकपुरा, हुतात्मा चौधरी चौक, सोनार लाईन, चौभारा चौक, नाग चौक या प्रमुख मार्गांवरून शहरभर फिरली. मार्गातील विविध ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शोभायात्रेचे भव्य स्वागत केले. या शोभायात्रेत



आर्य वैश्य समाजातील पुरुष, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांचा आणि शिस्तबद्ध सहभाग घेतलेल्या समाजबांधवांचा उत्साह पाहण्यासारखा होता. संपूर्ण वातावरण भक्तिमय व उत्सवी झाले होते. दरम्यान, आर्य वैश्य भवन येथे मातेची पूजा, कुंकुमार्चन व आरती तसेच रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. एकूणच, माता वासवी जयंतीनिमित्त आयोजित शोभायात्रेला उमरखेड शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून समाजातील ऐक्य व भक्तीभावाचे दर्शन या निमित्ताने घडले.

# प्रा. संतोष डोंगरे यांना ‘महाराष्ट्र राज्यभूषण कलारत्न’ पुरस्कार

जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा राज्यस्तरीय भव्य सन्मान सोहळा “महाराष्ट्र राज्यभूषण पुरस्कार 2026” नुकताच पुणे येथील पत्रकार भवन येथे पार पडला. या सोहळ्यात कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल “राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्यभूषण कलारत्न” पुरस्काराने प्रा. संतोष डोंगरे यांना सन्मानित करण्यात आले.

संकल्प कनिष्ठ महाविद्यालय, उमरी रोड येथे कार्यरत असलेले प्रा. संतोष डोंगरे यांनी कलेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य केले आहे. संगीत व नृत्य या क्षेत्रांमध्ये विशेष रुची असलेल्या डोंगरे सरांनी भारतीय कला समृद्ध व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. ग्रामीण भागातील



विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड निर्माण व्हावी व त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी यासाठी ते नेहमीच कार्यरत असतात. जिल्हास्तरीय, विदर्भस्तरीय तसेच राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून त्यांना दांडगा अनुभव आहे. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, पत्नी, बहिणी तसेच गुरुजनांना दिले आहे.

# खंडाळा घाटातील खून प्रकरणाचा पर्दाफाश

## लुटीच्या हेतूने हत्या, एक आरोपी अटकेत

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - खंडाळा घाटात सापडलेल्या दिलीप महादू ढाकरे (वय ३९, रा. फेट्रा) यांच्या खूनप्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या दोन दिवसांत उलगडा करत एक आरोपी अटकेत घेतला आहे. या प्रकरणात लुटीच्या उद्देशाने हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून दुसरा आरोपी फरार आहे.

२५ एप्रिल रोजी पुसद-वाशिम मार्गावरील खंडाळा घाटात सेवादास नगर शिवारात ढाकरे यांचा मृतदेह आढळून आला होता. अज्ञात व्यक्तींनी डोक्यावर दगड टाकून त्यांची हत्या केली होती तसेच ओळख पटू नये म्हणून चेहरा विद्रूप करण्यात आला होता. याप्रकरणी



वसंतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तपास सुरू केला. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गोपाल ऊर्फ गोलू बाळू पवार (वय २६, रा. सेवादासनगर) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने साथीदार प्रकाश ऊर्फ पक्या राठोड याच्यासह गुन्ह्याची कबुली दिली. दोघांनी मिळून घाटात बसलेल्या ढाकरे यांना ओढत नेऊन लुटीच्या उद्देशाने मारहाण केली आणि दगडाने ठेचून ठार मारले. त्यानंतर त्यांची मोटारसायकल घेऊन पळ काढला. पोलिसांनी आरोपीकडून मोटारसायकल जप्त केली आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कौशल्यपूर्ण तपास करत गुन्हा उघडकीस आणला असून पुढील तपास वसंतनगर पोलीस करीत आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावतीचा इतिहास मिळणार आता पुस्तकात

## मनपाने घेतला ऐतिहासिक निर्णय

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक शहराच्या वैभवात भर टाकणारा एक ऐतिहासिक निर्णय महानगरपालिकेने घेतला असून, सन १९८३ पासूनचा शहराचा सर्वांगीण प्रवास आता अधिकृत पुस्तक स्वरूपात जगासमोर येणार आहे. महापालिकेतील विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांनी मांडलेल्या या महत्त्वपूर्ण प्रस्तावामुळे अमरावती आणि बडनेरा या जुळ्या शहरांच्या विकासाची गाथा, राजकीय स्थित्यंतरे आणि सामाजिक बदलांचे दस्तऐवजीकरण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रस्तावाला सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी पाठबळ दिले असून, महापालिकेच्या या ऐतिहासिक पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नगरपालिकेच्या काळातील इतिहास बापूसाहेब कारंजेकर यांनी यापूर्वीच लिहून ठेवला आहे. मात्र, १९८३ मध्ये महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर शहराने मोठी प्रगती केली आहे. या काळात झालेले भौगोलिक बदल, प्रशासकीय निर्णय आणि राजकीय चढ-उतार यांचा लेखाजोखा भावी पिढीला मार्गदर्शक ठरावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. काँग्रेसचे नगरसेवक बबलू शेखावत, सुनीता भेले, ललिता रतावा आणि डॉ. संजय शिरभाते यांनी या प्रस्तावाचे जोरदार अनुमोदन केले असून, हा प्रस्ताव लवकरच सर्वसं-मतीने मंजूर होण्याची दाट शक्यता आहे. या नियोजित इतिहास लेखनात केवळ महा-नगरपालिकेच्या कामकाजाचाच आढावा घेतला जाणार नाही, तर अमरावती शहराने देशाला दिलेल्या महान व्यक्तींच्या कार्याचाही गौरव केला जाणार आहे. अमरावती आणि बडनेरा शहराला लाभलेला शिक्षणाचा वारसा, सामाजिक चळवळी, क्रीडा क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी आणि राज्याच्या राजकारणातील या शहराचे वजनी स्थान यावरही या पुस्तकात सविस्तर प्रकाश टाकला जाईल. शहरातील क्रीडा संस्थांचे योगदान आणि खेळाडूंनी गाजवलेले शौर्य विशेषत्वाने मांडले जाणार असून, अमरावतीची एक धगधगती ओळख ग्रंथाच्या माध्यमातून जगासमोर येण आहे. प्रशासकीय आणि राजकीय प्रवासासोबतच सामान्य माणसाच जीवनाशी





निगडित असलेल्या विवि क्षेत्रांतील घडामोडींचे संकलन करून ऐतिहासिक ठेवा जतन करण्याचा माना या प्रस्तावाद्वारे व्यक्त करण्यात आले आहे.

अमरावतीची अस्मिता जपणारा ऐतिहासिक ठेवा अमरावती शहराने देशाला महान नेतृत्व दिले असून इथल्या इथल्या मातीने समाजकारण आणि शिक्षणाची मोठी परंपरा जपली आहे. महापालिकेचा हा निर्णय आपल्या पूर्वजांच्या कष्टाची जाणीव करून देणारा ठरेल. शहराची ही गौरवगाथा येणाऱ्या काळात तरुणांसाठी प्रेरणेचा मोठा स्रोत बनेल हे निश्चित आहे.

### महारुद्र नगरातील रस्त्यांची दयनीय अवस्था

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरातील प्रभाग क्र. ८ मधील महारुद्र नगर परिसरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. याबाबत स्थानिक रहिवाशांनी नगर परिषद प्रशासनाला निवेदन देत तातडीने रस्त्याचे डांबरीकरण अथवा सिमेंट काँक्रीटीकरण करण्याची मागणी केली आहे.

नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्यांची दुरवस्था कायम असून अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही झालेली नाही. पाहणी करूनही काम प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.दरम्यान, बांधकाम विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार नगर परिषदेकडून आवश्यक NOC न मिळाल्यामुळे रस्त्याचे काम थांबले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पावसाळ्याच्या दिवसात या रस्त्याची अवस्था इतकी खराब होते की,पाई चालणे तसेच दुचाकीस्वारांनाही चालणे अगदी धोकादायक झाले आहे. पावसाळ्यात नाल्यांचा अभाव असल्यामुळे रस्त्यावर पाणी साचते, चिखल तयार होतो आणि अपघाताचा धोका वाढतो. तसेच आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता देखील व्यक्त करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नगर परिषदेला इशारा देत म्हटले आहे की, मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत काम सुरू न झाल्यास नगर परिषदेसमोर उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येईल.महारुद्र नगरातील नागरिकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्त्याच्या समस्येचे निराकरण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# रेल्वे प्रवासात आता मिळणार ‘फिटनेस’चा डोस

## सुपरफास्ट गाड्यांमध्ये ‘ग्रीन जिम’ आणि ‘योग’ सुविधेचा प्रस्ताव

**अमरावती/का.प्र.**

लांब पल्ल्याच्या रेल्वे प्रवासात प्रवाशांना येणारा शारीरिक थकवा आणि मानसिक तणाव दूर करण्यासाठी मध्य रेल्वेच्या झेडआरयूसीसी १२७ वी बैठकीत एक अभिनव प्रस्ताव मांडण्यात आला आहे. प्रवाशांच्या आरोग्यासाठी सुपरफास्ट गाड्यांमध्ये ‘इन-कोच योग’ आणि ‘मिलेनिअम ग्रीन जिम’ (फिटनेस झोन) सुरू करण्याची मागणी सदस्य नितीन सोळंके यांनी केली आहे.



प्रस्तावात प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे.इन-ट्रेन योग मार्गदर्शन (Chair Yoga): रेल्वेतील स्क्रीनवर किंवा रेल्वेच्या ’रेल मदत’ (Rail Madad) आणि वाय-फाय पोर्टलवर ५ ते १० मिनिटांचे ‘सीट-योग’ व्हिडिओ दाखवले जावेत. जेणेकरून प्रवासी आपल्या जागेवर बसूनच प्राणायाम आणि सूक्ष्म व्यायाम करू शकतील.

स्ट्रेचिंग गाईड स्टिकर्स: रेल्वे डब्यांच्या गॅलरीमध्ये (Aisle) किंवा गेटजवळ माहितीपूर्ण बोर्ड (Infographics) लावले जावेत, जे प्रवाशांना रक्ताभिसरण सुधारण्यासाठी सोपे स्ट्रेचिंग प्रकार सांगतील.मिलेनिअम ग्रीन जिम: राजधानी, दुरंतो आणि वंदे भारत सारख्या प्रीमियम गाड्यांच्या वेस्टिब्युल एरियामध्ये (दोन डब्यांच्या जोडणीची जागा) छोटे ‘कॉम्पॅक्ट जिम’ उपकरणे उदा. रेझिस्टन्स बँड्स किंवा फिक्स्ड पॅडल सायकल बसवण्यात यावीत.

**डिजिटल हेल्थ इंटिग्रेशन:** रेल्वेच्या डिजिटल पोर्टलवरून प्रवाशांना सकाळी व्यायामासाठी ‘रिमाइंडर’ आणि आरोग्यविषयक टिप्सचे नोटिफिकेशन पाठवले जावेत.

आयुष मंत्रालयाशी समन्वय: रेल्वेमध्ये योग तज्ज्ञांनी रेकॉर्ड केलेले सत्र ऑडिओ सिस्टिमद्वारे प्रसारित करावेत, ज्यामुळे प्रवाशांना ध्यानाचा (Meditation) लाभ घेता येईल.

**‘स्वस्थ रेल, समृद्ध भारत’ व्हिजन**

या प्रस्तावामुळे प्रवाशांना प्रवासात होणारा पाठदुखी, कडकपणा आणि सुस्ती यांसारख्या समस्यांपासून आराम मिळेल. भारतीय रेल्वेची प्रतिमा अधिक आधुनिक आणि प्रवासीभिमुख करण्यासाठी हा प्रयोग मैलाचा दगड ठरू शकतो, असा विश्वास नितीन सोळंके यांनी व्यक्त केला आहे.

**रेल्वे प्रशासनाची प्रतिक्रिया**

प्रशासनाने या प्रस्तावाची दखल घेतली असून,‘तुमची सूचना नोंदवण्यात आली असून त्याच्या व्यवहार्यतेची (Feasibility) तपासणी केली जाईल,’ असे टिप्पणीत नमूद केले आहे. आगामी कार्ययोजनेत या आरोग्यदायी सुविधांचा समावेश होण्याची शक्यता असल्याने प्रवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# भारतीय महाविद्यालय गुणगौरव व सत्कार समारंभ

**अमरावती/का.प्र.**

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून आयोजित ‘डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम गुणगौरव व सत्कार समारंभ २०२६’ भारतीय विद्या मंदिर संचालित भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे उत्साहात आणि अभिमानास्पद वातावरणात पार पडला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शैक्षणिक क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता. या वर्षी एकूण ८३ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांमधील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्रत्येक विषयात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. आराधना वैद्य होत्या, तर भारतीय विद्या मंदिर, अमरावतीचे उपाध्यक्ष डॉ. सतीष



कुळकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. विजय भांगे, स्टाफ कौन्सिल सचिव डॉ. सुमेध आहाटे, कला विभागाचे समन्वयक डॉ. संगिता कुळकर्णी, वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ. संग्राम रघुवंशी तसेच विज्ञान विभागाच्या समन्वयक डॉ. दीपलक्ष्मी कुळकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. विजय भांगे यांनी महाविद्यालयाने गेल्या वर्षभरात शैक्षणिक, संशोधन आणि गुणवत्ता विकास क्षेत्रात साधलेल्या प्रगतीचा सविस्तर आढावा मांडला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देत संस्थेच्या प्रगतीचा आलेख उंचावत असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमातील ‘सत्कार सोहळा’ हे मुख्य आकर्षण ठरले. गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि अभिमान हा संपूर्ण कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला.संचालन व समारोपी आभार प्रदर्शन डॉ. पल्लवी सिंग यानी केले.

# ‘ॲण्ड्रॉइड १२’ सक्ती; शिक्षक आले अडचणीत

## ॲप-आधारित जनगणना; मोबाईल खरेदीचा बोजा,शिक्षकांवर वाढला ताण

**अमरावती/का.प्र.**

आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात शिक्षकांचे प्रशिक्षण वेगाने सुरू असून, यासाठी वापरल्या जाणाऱ्या मोबाईल ॲपसाठी किमान अँड्रॉइड १२ ही अट अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक शिक्षकांचे विद्यमान मोबाईल निष्प्रभठरत असून, नव्याने मोबाईल खरेदी करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.



‘बीवायओडी’ धोरणांतर्गत शासनाकडून कोणतीही साधनसामग्री न देता शिक्षकांनी स्वतःच्या मोबाईलवरच जनगणनेचे काम करावे, अशी अपेक्षा ठेवण्यात आली आहे. यामुळे शासनाची जबाबदारी शिक्षकांवर ढकलली जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.अमरावती जिल्ह्यासह तालुक्यात सुरू असलेल्या प्रशिक्षणात जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया शिक्षकांना समजावून सांगितली जात आहे. प्रत्येक शिक्षकाला ठरावीक क्षेत्र देण्यात येणार असून, उन्हाळ्याच्या सुटीत गावोगावी घरोघरी जाऊन माहिती संकलन करावे लागणार आहे.

ही प्रक्रिया १५ मे ते १६ जूनदरम्यान राबवली जाणार आहे. कुटुंबातील सदस्यांची संख्या, वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर, निवास स्थिती यासह विविध माहिती मोबाईल ॲपमध्ये नोंदवावी लागणार आहे. तसेच प्रत्येक घराचे जीपीएस लोकेशन, घराचा प्रकार, पाणी, वीज, शौचालय यांसारख्या मूलभूत सुविधांची माहितीही ॲपवर अपलोड करावी लागणार आहे. काही ठिकाणी घरांचे फोटो अपलोड करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याची माहिती शिक्षकांनी दिली.या संपूर्ण प्रक्रियेसाठी इंटरनेट कनेक्टिव्हिटी, मोबाईलची क्षमता आणि अद्ययावत सॉफ्टवेअर आवश्यक असल्याने शिक्षकांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.

# वकील संघाच्या निवडणुकीत महिला वकीलांचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

वकील संघाच्या कार्यकारणी निवड कार्यक्रम २०२६ मध्ये कार्यवाहक अध्यक्ष अधि. सुनिल देशमुख यांच्या कार्यकारिणी महिलांकरीता, आरक्षण लागू केल्याने यंदाच्या निवडणुकीत महिला उमेदवारांची संख्या वाढली असून त्या जोमाने प्रचारात आपले नशिब आजमावत आहे. उपाध्यक्ष तसेच तीन सदस्य महिलांसाठी राखीव असल्याने महिला राखीव सदस्य पदाकरीता एकून ४ महिला वकिलांनी अर्ज भरलेले आहे. उपाध्यक्षामध्ये प्राजक्ता वरुडकर,



भावना ठाकरे तर महिला राखीव सदस्यांमध्ये रश्मी दाऊस्कर, शीतल गाहन, सुरभी कर्वे आणि ऋतुजा पाचारे या रिंगणात असून ॲड. रश्मी दाऊस्कर यांनी प्रथारात सुरवातीपासून आघाडी घेतलेली आहे व ही निवडणूक येत्या ३० एप्रिल २०२६ रोजी आहे.

# मुलीचे टक्कल करणाऱ्या आईसह सावत्र वडिलाला अटक

## वरूड ठाण्याच्या हद्दीतील घटना

**अमरावती/का.प्र.**

आई व सावत्र वडिलाने मुलीला कंबरेच्या पट्ट्याने मारहाण करून व तिचे केस कापून टक्कल केल्याची धक्कादायक घटना मंगळवार, २१ एप्रिल रोजी वरूड ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली होती. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून तिची आई व सावत्र वडिलाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली.

पीडित मुलगी ही घरी हजर असताना तिची आई व सावत्र वडील या दोघांनी तिच्याशी वाद घातला. त्यांनी तिला शिवीगाळ केली. तुझे मुलांसोबत संबंध आहे, तू त्यांच्या नावाचा रिपोर्ट पोलीस स्टेशनला दे, असे तिची आई तिला म्हणाली. त्यावर माझे असे कोणतेही संबंध नाही, असे पीडित मुलीने तिच्या आईला सांगितले. या कारणावरुन तिला तिची आई व सावत्र वडिलाने कंबरेच्या पट्ट्याने तिला मारहाण केली. त्यानंतर त्या दोघांनी इलेक्ट्रिक मशीनने तिच्या डोक्याचे केस कापून तिचे टक्कल केले. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी आई व सावत्र वडिलाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. तसेच पीडित मुलीला बाल संरक्षणगृह, अमरावती येथे पाठविण्यात आले. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पूजा माळी करीत आहेत.

# बारा ग्रामपंचायतींमध्ये आज मतदान

## २७ केंद्र निश्चित;पाच सरपंच व सात सदस्यपदांकरिता निवडणूक

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात ग्रामपंचायत पोटनिवडणुकीकरिता नामांकन व छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यातील नऊ तालुक्यांमधील १२ ग्रामपंचायतींमध्ये एकूण ५ सरपंच व ७ सदस्य पदांसाठी निवडणूक रंगणार आहे. यासाठी २८ एप्रिल रोजी २७ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे.

या निवडणुकांमध्ये अंजनगाव सुर्जी तालुक्यातील जवळा बुद्रुक, भातकुली तालुक्यातील खोलापूर व शिवनी बुद्रुक, चांदूर रेल्वे तालुक्यातील चांदूरवाडी, चिखलदरा तालुक्यातील गौरखेड बाजार, दर्यापूर तालुक्यातील डोंगरगाव, धारणी तालुक्यातील हरिसाल, खापरखेडा, भोंडीलावा, मोर्शी तालुक्यातील मनिमपूर,

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सावनेर तसेच तिवसा तालुक्यातील वनी



ममदापूर या ठिकाणी निवडणुका होत आहेत. यापैकी चांदूरवाडी, गौरखेड बाजार, सावरखेडा आणि वनी-ममदापूर येथे सरपंच पदांसाठी थेट लढत होणार आहे. तर जवळा बुद्रुक, खोलापूर, शिवनी बुद्रुक, डोंगरगाव, भोंडीलावा, मनिमपूर आणि सावनेर येथे सदस्य पदांसाठी निवडणूक होणार आहे. यापूर्वी जिल्ह्यातील ६८ ग्रामपंचायतींमध्ये ९७ सदस्य व काही सरपंच पदांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. मात्र नामांकन प्रक्रियेदरम्यान ५७ सदस्य पदांसाठी एकही अर्ज दाखल न झाल्याने ही पदे रिक्त राहिली आहेत. तसेच ३२ सदस्य अविरोध निवडून आले असून, काही सरपंच पदांवरही अविरोध निवड झाली आहे. दोन ठिकाणी सरपंच पदासाठी एकही अर्ज दाखल न झाल्याचेही समोर आले आहे. यामुळे आता प्रत्यक्ष लढत केवळ ५ सरपंच व ७ सदस्य पदांपुरती मर्यादित राहिली आहे. गावपातळीवर राजकीय समीकरणे तापली असून, स्थानिक नेत्यांनी प्रचाराला वेग दिला आहे.

## संक्षिप्त

### महावितरणचे देखभाल, दुरूस्तीचे कामे सकाळच्या सत्रात

**अमरावती-** उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले.महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे वीजराज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. नागरिकांसाठी ही गैरसोयीची वेळ टाळण्यासाठी यापुढे संबंधित दिवशी व वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहे. महावितरणच्या देखभाल दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर ‘एसएमएस’द्वारे तसेच प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

### राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत पर्वणी सोनोनेची बाजी

**अमरावती-**नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या २१ व्या ‘नृत्यसंस्कृती’ राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अमरावतीची कन्या पर्वणी शैलेश सोनोने हिने उल्लेखनीय यश संपादन करत शहराची मान उंचावली आहे. अखिल नटराजम आंतर सांस्कृतिक संघातर्फे आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत पर्वणीने ज्युनिअर गटात ‘सेमीक्लासिकल’ नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. देशभरातील विविध राज्यांतून आलेल्या गुणी स्पर्धकांमुळे स्पर्धा अत्यंत चुरशीची ठरली होती. अशा कठीण स्पर्धेत पर्वणीने आपल्या लयबद्धता, भावभावना आणि उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. तिच्या प्रभावी सादरीकरणाला दाद मिळत तिला ‘नॅशनल मेरिट सर्टिफिकेट’ देऊन गौरविण्यात आले. पर्वणीच्या या यशामागे तिची सातत्यपूर्ण परिश्रम, सराव आणि गुरुंचे मार्गदर्शन महत्वाचे ठरले आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय गुरू प्रकाश मेश्राम, तसेच आई-वडील व कुटुंबीयांच्या पाठबळाला दिले. पर्वणीच्या या यशामुळे अमरावतीत आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कला क्षेत्रात तिची ही झेप इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### स्व.गयाबाई जामठे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त कार्यक्रम



**मोर्शी-**मोर्शी पंचायत समितीच्या माजी सभापती स्वर्गीय गयाबाई गुलाबराव जामठे यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन म्हणून त्यांच्या पाचव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विशेष धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन रिद्धपूर येथे करण्यात आले होते.हरिदास जामठे व देविका जामठे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम पार पडले. यामध्ये कीर्तन, प्रवचन, भजन, सामूहिक प्रार्थना तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी अंबादास जामठे,चरणदास जामठे, हरीश जामठे, विजय जामठे, दिनेश जामठे,अंकुश जामठे, छोटु जामठे, निलेश जामठे,शुभम जामठे,ओमप्रकाश जामठे यांनी परिश्रम घेतले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अशोक कानडे,प्रा.गजानन वानरे,पी.बी.वनसकर, पांडुरंग गोंडेकर,विनोद सावळे,जगदेव सावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांचा वाढदिवस



**अमरावती-**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राज घराण्यातील १३ वे वंशज श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर इंदौर यांचा नुकताच वलगाव येथीलच्या श्री संत गाडगेबाबा वृद्धाश्रमात श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर जिल्हा नियोजन समिती तर्फे वाढदिवस साजरा करण्यात आला.याप्रसंगी वृद्धाश्रम अध्यक्ष कैलाश बोरसे, निखिल घुरडे, मनोज कचरे, प्रकाश बोबडे, शिवहरी बोकडे, शरद तालन, मंगेश डमके, अक्षय नवरे, अमित महात्मे, पूर्ण बोरसे आदी उपस्थित होते.

### सीता नवमी साजरी

**अमरावती-**अंबिका नगरातील श्रीराम मंदिरात सीता



नवमीनिमित्त अनिता कुळकर्णी यांनी प्रबोधन केले.श्री गणेश आणि राम,सीता, लक्ष्मणाच्या रेखीव मूर्ती मंदिरात भाविकांचे लक्ष वेधून घेतात. सीता नवमी निमित्त पतिव्रता सीता या विषयावर कुळकर्णी बोलत होत्या. त्यांचे स्वागत उषा मोहिदेकर आणि अंजली देशपांडे यांनी केले. तर सत्कार नंदा बापट आणि अलका कु-हेकर यांनी केला .संचालन आणि आभार प्रदर्शन प्रा.ललिता वडोदकर ढोले यांनी केले. कार्यक्रमासाठी श्याम ढोले,गणेश मंदिराचे अध्यक्ष सुनिल देशमुख , जयश्री देशमुख व कार्यकारीणीने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा लाभ सर्व स्तरातील नागरिकांनी घेतला.

**कच्च्या तेलाच्या किमतीतील अनिश्चितता आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे भारतासारख्या विकसनशील देशासमोर ऊर्जा सुरक्षेचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने आता 'फ्लेक्स फ्युएल' वाहनांचा (एफएफव्ही) अवलंब करण्याची प्रक्रिया अधिक वेगवान करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**

# 'फ्लेक्स फ्युएल'चा पर्याय कशासाठी?

**✍अभय कुलकर्णी**

पश्चिम आशियातील संघर्षाची इतिश्री कधी व्हायची तेव्हा होवो; पण या युद्धाने भारतासह जगाला इंधनावरील अवलंबित्वाबाबत खडाडून जागे केले आहे. विशेषतः आपल्या गरजेच्या ७५ टक्क्यांहून अधिक कच्च्या तेलाची आयात करणाऱ्या भारतासाठी या युद्धाने एक मोठा धडा दिला आहे. हा धडा म्हणजे आयात इंधनावरचे अवलंबित्व कमी करत पर्यायी स्रोतांचा वापर वाढवणे. वास्तविक, २०१४ मध्ये केंद्रातील सत्ता हाती घेतल्यापासूनच मोदी सरकार यादृष्टीने प्रयत्नशील राहिले आहे. सौरऊर्जेसारख्या अपारंपरिक आणि अक्षय ऊर्जेला प्राधान्य देतानाच दुसरीकडे विद्युत वाहनांचा वापर वाढवण्याला केंद्र सरकारने दिलेल्या प्राधान्यामुळेच आज आपल्या अवतीभवती इलेक्ट्रिक व्हेईकल्सची संख्या वाढलेली दिसते. त्याचवेळी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाची मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेऊन सरकारने अन्नदाता शेतकऱ्यांना ऊर्जादाता बनवण्याचा संकल्प पुढे नेला. या प्रकल्पामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना १.३ लाख कोटी रुपयांहून अधिक देयके मिळाली आहेत, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट झाली आहे. सध्या भारताची इथेनॉल उत्पादन क्षमता वार्षिक २,००० कोटी लिटरच्या वर गेली आहे.

आता मोदी सरकारने 'फ्लेक्स-फ्युएल' वाहनांना (एफएफव्ही) प्रोत्साहन देण्याचे धोरण आक्रमकपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ८५ टक्के इथेनॉल आणि १५ टक्के पेट्रोल अशा 'ई-८५' मिश्रणावर चालू शकणाऱ्या या वाहनांमुळे भारताचे परकीय इंधनावरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होण्याची चिन्हे आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी हे पर्यायी ऊर्जावापराबाबत अधिक आग्रही असून त्यांनी १०० टक्के इथेनॉलवर धावणाऱ्या गाड्या आणण्याबाबत सूतोवाच केले आहे. तसेच वाहन कंपन्यांना आगामी काळात या बदलासाठी तयार राहण्यासही सांगितले आहे. त्यापूर्वीचा टप्पा म्हणून ई- ८५ धोरणाकडे पाहावे लागेल.

दुसरे कारण म्हणजे, कोणत्याही इंधनाची कार्यक्षमता ही त्याच्या घनतेवर अवलंबून असते. इथेनॉलची ऊर्जा घनता पेट्रोलच्या तुलनेत सुमारे ३० ते ३५ टक्क्यांनी कमी असते. याचा थेट परिणाम वाहनांच्या मायलेजवर होतो. एखादे वाहन शंभर टक्के इथेनॉलवर चालवले, तर ते एका लिटरमध्ये पेट्रोलच्या तुलनेत खूपच कमी अंतर कापू शकेल. इथेनॉलचा 'ऑक्टेन रेटिंग' जास्त असल्याने इंजिनमध्ये त्याचे ज्वलन अतिशय सुरळीत होते, ही जमेची बाजू असली, तरी या फायद्याचा पूर्ण लाभ घेण्यासाठी इंजिनची रचना मुळापासून बदलावी लागते. सध्या भारतातील बहुतांश वाहने ही केवळ पेट्रोलवर चालण्यासाठी तयार केलेली आहेत. त्यामुळे शंभर टक्के इथेनॉल वापरणे सध्याच्या परिस्थितीत काहीसे कठीण ठरणारे आहे.

पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉल हे अधिक क्षरणकारक म्हणजेच धातू आणि रबर खाणारे असते. सामान्य इंजिनमध्ये शंभर टक्के इथेनॉल वापरल्यास इंधन प्रणालीमधील रबर, प्लास्टिक आणि काही विशेष धातूंचे भाग वेगाने खराब होऊ लागतात. तसेच, इथेनॉलला इंजिनमध्ये पोहोचवण्यासाठी जास्त प्रवाहाची गरज असते. यासाठी इंधन पंपाची क्षमता वाढवावी लागते. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, थंडीच्या दिवसात इंजिन सुरू करण्याची समस्या. पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचे बाष्पीभवन लवकर होत नाही. परिणामी, कडाक्याच्या थंडीत शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने सुरू करणे हे एक मोठे आव्हान ठरू शकते. 'ई ८५'मध्ये असलेल्या १५ टक्के पेट्रोलमुळे ही बाष्पीभवनाची प्रक्रिया सुलभ होते आणि इंजिन सहज सुरू होऊ शकते.

ई-८५ किंवा ई-१०० सारख्या उच्च इथेनॉल मिश्रणावर चालणारी वाहने हरित गृह वायूंचे उत्सर्जन २० ते ५० टक्क्यांपर्यंत कमी करू शकतात. विद्युत वाहनांच्या मार्गात अनेक अडथळे आहेत. चार्जिंगसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि चार्जिंगसाठी लागणारा वेळ या मोठ्या समस्या आहेत. याउलट, देशात सध्या असलेल्या ६०,००० हून अधिक पेट्रोल पंपांचे रूपांतर इथेनॉल पंपांमध्ये करणे अत्यंत स्वस्त आणि सोपे आहे. तसेच, सर्वसामान्य ग्राहकांसाठी ईव्हीची किंमत आवाक्याबाहेर आहे, तर फ्लेक्स-इंधन इंजिनसाठी येणारा अतिरिक्त खर्च तुलनेने खूपच कमी आहे. जागतिक संघर्षांमुळे तेलाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसतो. विद्युत वाहनांचा पर्याय रास्त असला, तरी त्यांच्या बॅटरीसाठी आवश्यक असलेल्या लिथियम आणि कोबाल्ट यांसारख्या दुर्मीळ खनिजांबाबत भारत आजही परावलंबी आहे. सध्या भारताकडे या खनिजांचे पुरेसे साठे उपलब्ध नसल्याने आपल्याला त्यांच्या आयातीसाठी चीन, ऑस्ट्रेलिया आणि काँगो यांसारख्या देशांवर पूर्णपणे अवलंबून राहावे लागते.

विशेषतः बॅटरी उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या शुद्धीकरणावर चीनचे जागतिक स्तरावर वर्चस्व आहे. याचा अर्थ आपण खनिजं दुसऱ्या देशातून घेतली, तरी त्यांच्या प्रक्रिया आणि पुरवठा साखळीवर एकाच देशाचे नियंत्रण आहे. ही बाब भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी भविष्यात धोकादायक ठरू शकते. याउलट इथेनॉलची निर्मिती भारतातच शेतीतून उत्पादित केली जाऊ शकते. यामुळे आपली ऊर्जा स्वायत्तता वाढण्यास मदत होईल. विद्युत वाहने आणि जैवइंधन यांचा योग्य मेळ घातल्यास भारताचे भविष्य अधिक स्वच्छ आणि सुरक्षित होईल.

आर्थिक वर्ष २०२६ च्या आकडेवारीनुसार, भारताने १०९.५ अब्ज डॉलर्स किमतीचे तेल आयात केले आहे. जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी अवघ्या १ डॉलरची वाढ भारताच्या तिजोरीवर वार्षिक १६,००० कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा टाकते. अशा परिस्थितीत घरगुती स्तरावर उत्पादित होणाऱ्या इथेनॉलचा वापर वाढवणे हाच एकमेव शाश्वत पर्याय उरतो. परिवहन क्षेत्रात होणारा पेट्रोलचा मोठा वापर पाहता या क्षेत्राला 'फ्लेक्स फ्युएल'कडे वळवणे, ही काळाची गरज बनली आहे.




# महाराष्ट्रातील सर्व शाळांना मराठीची सक्ती



**✍संध्या काटदरे**

राज्यातील इयत्ता पहिली ते दहावी या इयत्तेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकवली गेली पाहिजे असा अध्यादेश शिक्षण विभागाने काढला आहे. या नियमाची पायमल्ली झाली तर शाळेची मान्यता रद्द होऊ शकते आणि एक लाख रुपयाचा दंडही वसूल केला जाईल असे या आदेशात स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य आहे असे मानले जाते परंतु सहा दशके इतका मोठा काळ जाऊन सुद्धा मराठीची अवहेलना थांबलेली नाही असेच चित्र आहे. माता, मातृभाषा आणि मातृभूमी या तीनही गोष्टींना माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे म्हणूनच सावरकरांनी 'ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' अशी सागराला विनवणी केली. महाराष्ट्र राज्य स्थापनेला पन्नास वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने कवी कुसुमाग्रज म्हणजेच वि.वा.शिरवाडकर यांनी 'स्वातंत्र्यदेवीची विनवणी' या आपल्या दीर्घकाव्यात मराठी भाषेविषयी मार्मिकपणे कथन केले आहे.

***'परभाषेतही व्हा पारंगत ज्ञानसाधना करावया***<br>***माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपू नका।***<br>***भाषा मरता देशही मरतो, संस्कृतीचाही दिवा विझे***<br>***गुलाम भाषिक होऊनी आपल्या प्रगतीचे शिर कापू नका।***

आपल्या मनातील विचारांना आपण मातृभाषेच्या माध्यमातून सहजपणे प्रगट करू शकतो. खरे तर प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच द्यायला हवे. शिक्षण तज्ज्ञांनी अभ्यासांती काढलेला हा निष्कर्ष आहे. पण लक्षात कोण घेतो. चुकीच्या मानसिकतेच्या प्रभावामुळे आम्ही बालवाडी पासूनच मातृभाषेशी फारकत घेतो. उलट मोठ्या दिमाखाने सांगतो की माझ्या मुलाला, मुलीला मराठी लिहिता वाचता येत नाही. ही वैचारिक दिवाळखोरी नव्हे काय?

टिळक, सावरकर हे मराठी भाषेतूनच शिकले तरीही परभाषेचा अभ्यास करून 'बॅरिस्टर' ही पदवी त्यांनी सहजपणे प्राप्त केली. जशी तलवार म्याना मध्ये बंद करून ठेवली तर ती गंजून जाते बोथट होते, धार कमी होते तसेच भाषा जर उपयोगात आणली नाही तर ती समृद्ध कशी होणार. भाषाभिमान असेल तर राष्ट्राभिमान निर्माण होतो असे इतिहास सांगतो.

संस्कृतच्या खालोखाल मराठी ही सात्विक भाषा आहे. संस्कृत आणि मराठी यांची मुळाक्षरे सारखीच आहेत तिला देवनागरी लिपी असे म्हणतात. 'अमृताशी पैजा जिंकेल' अशी माझी माय मराठी आहे असे ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितले आहे, कवी सोपानदेव चौधरी मराठी भाषेचे कौतुक सांगताना म्हणतात.

**'माझी मायबोली आज आली माहेराला**<br>**नेसलीसे भागवत नाथांची पैठणी**<br>**माथा शोभे मुगुटगाथा तुकयाचा नामी ज्ञानेशाची ज्ञानेश्वरी मळवट भाळा**<br>**माझी मायबोली आज आली माहेराला.'**

कवी रवींद्र भट यांनी पुढील शब्दात मराठीचा गौरव केला आहे.

**'लाभले आम्हास भाग्य**<br>**बोलतो मराठी ऐकतो मराठी वाचतो मराठी'**

मराठी भाषेचे महत्व उपयोगिता आणि संस्कृती संवर्धनासाठी तिची अनिवार्यता लक्षात घेऊन तिच्यावर प्रेम करुया. म्हणजे मराठीशाळा ओस पडणार नाहीत.

## 'मटका किंग' साठच्या दशकातील

# मुंबई, सत्ता-पैसा आणि संघर्षाची थरारक कहाणी

**✍ॲड. लोकेश मालखेडे**

**समीक्षण**


या वेबसिरीजमध्ये यवतमाळ जिल्ह्याचा उल्लेख होत असून ६० च्या दशकामध्ये यवतमाळ कापूस उत्पादक करिता मुंबई सारख्या ठिकाणी प्रसिद्ध होता.

१७ एप्रिल रोजी पहाटे साधारण तीन वाजता अचानक झोपेतून जाग आली. सहज मोबाईलमध्ये वेळ पाहिली आणि त्याच क्षणी लक्षात आले की ज्या वेब सिरीजची मी अनेक दिवसांपासून उत्सुकतेने वाट पाहत होतो ती मटका किंग आज प्रदर्शित झाली आहे. झोपही बऱ्यापैकी झालेली वाटत होती, त्यामुळे पुन्हा झोपण्यापेक्षा मी लगेच माझे ॲमेझॉन प्राईम उघडले आणि पहाटे तीन वाजल्यापासूनच ही सिरीज पाहायला सुरुवात केली. कधी कधी एखाद्या कलाकृती बद्दल खूप अपेक्षा असतात, पण ती पाहिल्यावर निराशा होते. मात्र मटका किंग बाबतीत तसे अजिबात घडले नाही. पहिल्या भागापासूनच या सिरीजने पकड घेतली आणि एकामागून एक भाग पाहत राहावेसे वाटले.

नागराज मंजुळे यांचे नाव जिथे असतं तिथे काहीतरी वेगळे, काहीतरी वास्तव आणि काहीतरी मनाला भिडणारे असते, ही अपेक्षा असतेच. मटका किंग मध्येही त्यांनी पुन्हा एकदा आपली दिग्दर्शन शैली सिद्ध केली आहे. साठच्या दशकातील मुंबई, गिरण्यांचा काळ, कापसाच्या व्यापाराभोवती फिरणारे अर्थजगत, सामान्य माणसाची धडपड, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी, पैशासाठी चालणारा संघर्ष, समाजातील बदलती मानसिकता आणि मटका हे सगळे त्यांनी पडद्यावर इतक्या जिवंतपणे उभे केले आहे की, प्रेक्षक त्या काळात हरवून जातो. ही सिरीज केवळ जुगाराच्या खेळावरच आधारित नाही तर ही सिरीज एका अशा माणसाची कथा सांगते जो परिस्थिती समोर हरलेला नसतो. ज्याच्याकडे पैसा नसतो, ओळख नसते, पण बुद्धी असते, धाडस असते आणि स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करण्याची भूक असते. गरिबीपेक्षा अपमान मोठा असतो आणि सन्मानासाठी माणूस किती दूर जाऊ शकतो, हे या सिरीजमध्ये प्रभावीपणे दाखवले आहे. त्यामुळे ही कथा फक्त एका व्यक्तीची राहत नाही, तर समाजाची बनते.

या सिरीजचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे मटक्याची सुरुवात नेमकी कशी झाली, हे अत्यंत प्रभावी आणि बारकाईने दाखवण्यात आले आहे. सुरुवातीला कापसाच्या बाजारातील भाव, आकडे, अंदाज, व्यवहार आणि नशिबाच्या गणितातून मटक्याची कल्पना कशी जन्माला आली, हे प्रेक्षकांना सहज समजेल अशा पद्धतीने मांडण्यात आले आहे. सामान्य लोकांना जिथे मोठ्या व्यवहारात स्थान नव्हते, तिथे लहान रकमेवर मोठे स्वप्न दाखवणारा खेळ म्हणून मटका समाजात कसा शिरला, हे सिरीज उत्कृष्टरीत्या दाखवते.

या सिरीजमधील कलाकारांची निवड ही तिची सर्वात मोठी जमेची बाजू ठरते. विजय वर्मा यांनी साकारलेला बृज भट्टी उर्फ मटका किंग हा संपूर्ण कथानकाचा केंद्रबिंदू आहे. सामान्य परिस्थितीतून वर येण्याची धडपड, बुद्धीच्या जोरावर उभे केलेले साम्राज्य, वाढती महत्त्वाकांक्षा आणि त्या बदल्यात मोजावी लागणारी किंमत या सर्व छटा त्यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारल्या आहेत. त्यांच्या अभिनयात आत्मविश्वास, अस्वस्थता, धाडस आणि अंतर्गत संघर्ष एकाच वेळी दिसतो. सई ताम्हणकर यांनी साकारलेली बरखा ही भूमिका भावनिकदृष्ट्या मजबूत आहे. त्या केवळ नायकाची पत्नी म्हणून राहत नाहीत, तर घर, नाते, स्वाभिमान आणि स्त्रीची स्वतःची ओळख यांचे प्रतिनिधित्व करतात. कृतिका कामरा यांची गुलरुख ही व्यक्तिरेखा आकर्षक, बुद्धिमान आणि प्रभावी आहे, जी कथेला वेगळं वळण देते. गुलशन ग्रोव्हर यांनी साकारलेला लालजीभाई हा जुनी सत्ता, अनुभव आणि आर्थिक ताकदीचे प्रतीक वाटतो. भूपेंद्र जडावत यांचा लक्ष्मण उर्फ लच्छू हा महत्त्वाकांक्षा, नात्यांतील ताण आणि बदलत्या निष्ठांचा चेहरा आहे. सिद्धार्थ जाधव यांचा दगडू विचारे हा व्यक्तिरेखेला मानवी स्पर्श देणारा, निष्ठा आणि भावना जपणारा महत्त्वाचा दुवा आहे. जेमी लीव्हर यांनी साकारलेली सुलभा ही भूमिका कथेला वेगळी उब देते. भारत जाधव यांनी साकारलेला सब इन्स्पेक्टर एकनाथ तुम्बाडे हा कायदा, व्यवस्था आणि अंतर्गत द्वंद्व यांचे प्रतिनिधित्व करतो. गिरीश कुलकर्णी यांचा 'टी. पी. डी'सूझा हा शोधक वृत्तीचा आणि सत्य बाहेर आणण्याचा प्रयत्न करणारा प्रभावी पत्रकार चेहरा आहे. किशोर कदम यांनी साकारलेला प्रशांत बापट हा राजकारण, सत्ता आणि व्यवस्थेतील गणित दाखवणारा महत्त्वाचा घटक ठरतो. या सर्व कलाकारांनी आपल्या भूमिकांना केवळ न्याय दिला नाही, तर सिरीजला वास्तव, खोली आणि प्रभावही दिला आहे.







### यवतमाळच्या कापसाचा ऐतिहासिक उल्लेख..!

मला वैयक्तिकरित्या सर्वात जास्त भावलेला क्षण म्हणजे दुसरा भाग पाहताना आलेला एक छोटासा पण महत्त्वाचा संदर्भ. कॉटन मार्केटच्या एका दृश्यात फलकावर यवतमाळच्या कापसाचे भाव असा उल्लेख दिसतो. मी स्वतः यवतमाळचा असल्यामुळे तो क्षण पाहताना मनात अभिमानाची भावना निर्माण झाली. साठच्या दशकात यवतमाळ हा किती समृद्ध आणि कापसासाठी प्रसिद्ध जिल्हा होता, याची आठवण त्या छोट्याशा तपशीलातून झाली. इतक्या बारकाईने केलेले संशोधन पाहून दिग्दर्शकांना दाद द्यावी लागते.

या सिरीजमध्ये एकूण आठ भाग आहेत आणि प्रत्येक भाग कथा पुढे नेतो. पहिला भाग 'तकदीर, तदबीर, तरकीब!' हा मुख्य पात्राची परिस्थिती, त्याची घुसमट आणि बदलाची सुरुवात दाखवतो. सुरुवातीलाच कथा पकड घेते. दुसरा भाग 'उम्मीद का कारखाना' नावाप्रमाणे आशा, नवी वाट आणि वाढत्या प्रभावाची चाहूल देतो. तिसरा भाग 'इज्जत हाफ, संगम फुल' प्रतिष्ठा, मोठ्या वर्तुळात प्रवेश आणि समाजातील स्थान मिळवण्याची धडपड दाखवतो. चौथा भाग 'तेरा प्यार ट्रिपल पाना, मेरा प्यार कबूतर दाना' हा नात्यांतील गुंतागुंत, भावनिक संघर्ष आणि बदलत्या समीकरणांनी भरलेला आहे. पाचवा भाग 'सफेद कपड़े, काले दिल' हा बाहेरून स्वच्छ दिसणाऱ्या पण आतून काळोख्या जगाचा आरसा आहे. यात स्वार्थ, राजकीय खेळी आणि मुखवटे दिसतात. सहावा भाग 'लाइट्स, कैमरा, जोड़ी' प्रसिद्धी, प्रतिमा आणि यशाची किंमत दाखवतो. सातवा भाग 'दो इक्के, एक गुलाम' हा तणावपूर्ण आणि संघर्षमय आहे, जिथे नाती आणि स्वार्थ समोरासमोर उभे राहतात. आठवा आणि अंतिम भाग 'ओपन और क्लोज' संपूर्ण प्रवासाला योग्य असा शेवट देतो. कोणताही स्पॉइलर न देता एवढंच म्हणेन की शेवट पाहिल्यावर मनात अनेक प्रश्न निर्माण होतात.

या सिरीजची सर्वात महत्वाही बाजू म्हणजे तिचे लेखन. कथा कुठेही घाईघाईत धावत नाही आणि कुठेही अनावश्यकपणे थांबत नाही. प्रत्येक पात्राला स्वतःचे वजन आहे. प्रत्येक व्यक्ती फक्त नायका भोवती फिरत नाही, तर स्वतःच्या विचारांसह उभी राहते. म्हणूनच कथा अधिक वास्तववादी वाटते. छायांकनही अप्रतिम आहे. जुन्या मुंबईचा रंग, बाजारपेठेतील गोंधळ, बंद खोलीतील तणाव, गर्दीतील अस्वस्थता आणि काही शांत प्रसंगातील भावनिकता अत्यंत सुंदर टिपली आहे. प्रकाशयोजना आणि रंगसंगती काळाशी सुसंगत आहे. पार्श्वसंगीतही कथेला उत्तम साथ देते. काही ठिकाणी शांतता जास्त बोलते, तर काही प्रसंगात संगीत दृश्याला वेगळी उंची देते.

डायलॉग्सही जबरदस्त आहेत. अनेक संवाद थेट मनात बसतात. काही संवाद सत्तेबद्दल आहेत, काही पैशाबद्दल, काही नात्यांबद्दल तर काही आयुष्याच्या वास्तवाबद्दल. म्हणूनच सिरीज संपल्यानंतरही ते संवाद आठवत राहतात. विशेष म्हणजे ही सिरीज प्रेक्षकाला हुशार समजते. प्रत्येक गोष्ट उगाच समजावून सांगितली जात नाही. काही गोष्टी नजरेतून समजतात, काही शांततेतून, काही प्रसंगांच्या परिणामातून. त्यामुळे ही सिरीज लक्ष देऊन पाहावी लागते. मोबाईल हातात घेऊन वरवर पाहण्यासारखी ही सिरीज नाही.

आजच्या काळात अनेक वेब सिरीज फक्त धक्कादायक दृश्यं, शिव्या किंवा उगाच हिंसा यावर चालतात. पण मटका किंग वेगळी आहे. यात कथा आहे, भावना आहेत, संघर्ष आहे, महत्त्वाकांक्षा आहे, सत्ता आहे, पैसा आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवी स्वभावाचे वास्तव आहे. ही सिरीज फक्त मनोरंजन करत नाही, तर विचार करायलाही भाग पाडते. पाहून झाल्यानंतर काही पात्र मनात राहतात, काही प्रसंग आठवत राहतात आणि काही प्रश्न सतत डोक्यात फिरत राहतात. हीच एका उत्तम सिरीजची खूण असते.

जर तुम्हाला अशी वेब सिरीज पाहायची असेल जी पहिल्या भागापासून पकड घेईल, जी तुम्हाला एका वेगळ्या काळात घेऊन जाईल, जी उत्कृष्ट अभिनय, दमदार लेखन आणि दर्जेदार दिग्दर्शनाचा अनुभव देईल, तर मटका किंग नक्की पाहा. एकदा सुरू केली की पुढचा भाग न पाहता थांबणे कठीण जाईल. ही सिरीज फक्त पाहण्याची नाही, तर अनुभवण्याची आहे. या सिरीजचा पहिला सीझन प्रेक्षकांच्या मनात मोठी उत्सुकता निर्माण करतो. त्यामुळे 'मटका किंग सीझन २' ची अपेक्षा वाढली आहे. अधिकृत घोषणा नसली तरी कथानकाचा विस्तार आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहता दुसरा सीझन येण्याची शक्यता मजबूत वाटते. आता सर्वजण फक्त एका घोषणेची वाट पाहत आहेत.


मो.९२८४२२४९८१
(लेखक जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथे प्रॅक्टिस करतात.)

# सरपंच संघटनेच्या उपोषणाला खा.अमर काळे यांची भेट

## प्रशासनावर 'राजकीय दबाव'चा आरोप

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामपंचायतींच्या प्रशासक नियुक्तीच्या प्रश्नावरून जिल्हा परिषदेसमोर सुरू असलेल्या सरपंच संघटनेच्या आमरण उपोषणाला अमर काळे यांनी भेट देत आंदोलनकर्त्यांची बाजू ऐकून घेतली. यावेळी त्यांनी प्रशासनाशी थेट संवाद साधत प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली.

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंचांनाच नेमणूक करावी, अशी सरपंच संघटनेची मागणी आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयाचा निर्णय आणि शासनाची अधिसूचना स्पष्ट असतानाही जिल्हा परिषद प्रशासनाकडून अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. यामुळे सरपंच संघटनेने आमरण उपोषण सुरू केले आहे.उपोषणस्थळी संजय ढुमणे, कीर्तीध्वज सवाई, राजेश सावरकर, संतोष सेलूकर, अरुण सायंकार, मुरलीधर चौधरी आदी सरपंचांशी चर्चा करून खा. काळे यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत प्रशासनाची भूमिका समजून घेतली. तसेच उपोषणकर्त्यांचे वकील ॲड. कारंजकर यांच्याशीही चर्चा केली.पुण्यातील काही याचिकांशी वर्धा जिल्ह्याचा संबंध नसतानाही प्रशासन मुद्दाम हे प्रकरण जोडत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. उच्च न्यायालयाचा निर्णय आणि शासनाच्या राजपत्रानुसार सरपंचांना प्रशासक म्हणून नेमण्यास कोणतीही अडचण नसताना आदेश काढण्यास विलंब होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या विलंबामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा संशय व्यक्त करत, काहींना अधिकाऱ्यांमार्फत ग्रामपंचायतींवर नियंत्रण ठेवणे सोयीचे वाटत असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली. प्रशासनाने लोकशाही पद्धतीने आणि संविधानाच्या चौकटीत काम करावे, असे स्पष्ट मत खा. काळे यांनी व्यक्त केले.आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत त्यांनी हा लढा योग्य दिशेने असल्याचे सांगितले. तसेच आंदोलनकर्त्यांनी तब्येतीची काळजी घ्यावी, असे आवाहनही केले. खासदारांच्या भेटीनंतर आंदोलनकर्त्यांनी समाधान व्यक्त करत त्यांच्या पाठिंब्याबद्दल आभार मानले.



दरम्यान, या प्रकरणामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

# अल्लीपूरमध्ये पहिला आंतरधर्मीय सत्यशोधकी विवाह

## कर्मकांडांना फाटा, विचारांचा विजय

**अल्लीपूर/जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील अल्लीपूर येथे पारंपरिक धार्मिक विधी, कर्मकांड, यज्ञ-याग, सप्तपदी आणि अक्षता यांना फाटा देत आंतरधर्मीय सत्यशोधकी विवाह झाला. सामाजिक समतेचा आणि विवेकवादी विचारांचा संदेश देणारा हा विवाह गावात प्रथमच पार पडल्याने नागरिकांमध्ये उत्सुकता आणि चर्चेचा विषय ठरला.



विशाल रामदास सुरकार आणि पल्लवी सिताराम दबडे या तरुण-तरुणींचा विवाह शुक्रवारी रात्री फुलांच्या वर्षावात साधेपणाने पार पडला. विशाल हे शिक्षक असून पल्लवी शासकीय सेवेत कार्यरत आहेत. परस्पर ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले; मात्र वेगवेगळ्या जाती-धर्माच्या पार्श्वभूमीमुळे कुटुंबीयांची संमती मिळवण्यासाठी प्रयत्न करावे लागले. अखेर संवादातून दोन्ही कुटुंबांची तयारी झाली आणि सत्यशोधकी पद्धतीने विवाह करण्याचा निर्णय घेण्यात आला.या विवाहासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुढाकाराने सोपस्कार पार पडले. समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी पुढाकार घेत दोन्ही कुटुंबांमध्ये समन्वय साधला. हिंगणघाट शाखा आणि वर्धा जिल्हा शाखेच्या सहकार्याने हा ७८वा सत्यशोधकी विवाह झाला.

विवाह सोहळ्याची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले यांनी रचलेल्या अखंड पठणाने करण्यात आली. यानंतर वधू-वरांनी समता, परस्पर आदर आणि सहजीवनाच्या मूल्यांवर आधारित शपथा घेतल्या. पारंपरिक मंत्रोच्चाराऐवजी विचार प्रधान शपथविधीने विवाहाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमात दोन्ही कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उपाध्यक्ष व माजी सिव्हिल सर्जन डॉ. जयंत दुधे यांच्या हस्ते शाल देऊन पालकांचा गौरव करण्यात आला. तसेच वधू-वरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधुरी झाडे यांनी केले. शपथविधी सारिका डेहनकर यांनी घेतला, तर ॲड. कविता राठोड आणि सुजाता जिवलकर यांनी विवाह सोहळा पूर्ण केला. सूत्रसंचालन सुनिल ढाले यांनी केले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंजि. महिपाल रामटेके, अजय जवादे, रजनी सुरकार, गंगादास मून, विनोद कांबळे, अक्षय सुरकार आणि वैभव सुरकार यांनी परिश्रम घेतले.परंपरेपेक्षा विचारांना प्राधान्य देणारा हा विवाह अल्लीपूरमध्ये सामाजिक परिवर्तनाचा नवा अध्याय ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# एव्हीबीआरएचमध्ये गुंतागुंतीच्या प्रसूतीवर मात; आई-बाळ सुरक्षित

**वर्धा/जनमाध्यम**

अत्यंत गुंतागुंतीच्या 'प्लासेंटा इन्क्रेटा' आणि 'पूर्ण प्लासेंटा प्रीव्हिया' या अवस्थेवर वर्ध्यातील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय (एव्हीबीआरएच) येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. बहुविभागीय तज्ज्ञांच्या समन्वयातून करण्यात आलेल्या या उपचारामुळे आई आणि नवजात बाळाचे प्राण वाचवण्यात डॉक्टरांना यश आले.



३०.५ आठवड्यांची गर्भवती असलेल्या रुग्णेची पूर्वी 'एलएससीएस' शस्त्रक्रिया झाली होती. यावेळी तपासणीत 'प्लासेंटा इन्क्रेटा'सह 'पूर्ण प्लासेंटा प्रीव्हिया' निदान झाले. 'डॉप्लर' तपासणीत आढळलेल्या बदलांमुळे प्रसूतीदरम्यान तीव्र रक्तस्रावाचा धोका निर्माण झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नियोजनपूर्वक 'सिझेरियन' शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रिये दरम्यान मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. औषधोपचारांनी रक्तस्राव नियंत्रणात न आल्याने रुग्णेचे प्राण वाचवण्यासाठी 'इमर्जन्सी ऑब्स्टेट्रिक हिस्टरेक्टॉमी' करण्यात आली. या प्रक्रियेपूर्वी रुग्ण व नातेवाईकांना संभाव्य धोके तसेच भविष्यातील परिणामांविषयी माहिती देण्यात आली होती.

दरम्यान, ९७५ ग्रॅम वजनाच्या मुलीचा सुरक्षित जन्म झाला. नवजात बाळाची प्रकृती स्थिर असून 'निओनॅटोलॉजी विभागा'त तिची काळजी घेतली जात आहे. रुग्ण शस्त्रक्रियेनंतर १५ दिवसांनी स्थिर असून ती बाळाला स्तनपान देत आहे. लवकरच तिला रुग्णालयातून सुटी देण्यात येणार आहे.

या शस्त्रक्रियेसाठी डॉ. मंजुषा अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली डॉ. श्रुतिका खापरे व डॉ. मेघा कर्णिक यांनी काम पाहिले. त्यांना ओबीजीवाय विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी, नर्सिंग कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. 'ॲनेस्थेशिया विभागा'चे डॉ.विवेक चकोले, डॉ.पी. बानोडे तसेच 'इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी टीम' यांचेही महत्त्वपूर्ण योगदान राहिले. 'हाय-रिस्क प्रेग्नन्सी युनिट'च्या प्रमुख डॉ. नीमा आचार्य यांचे मार्गदर्शन या उपचारात उपयोगी ठरले. अशा प्रकारच्या उच्च-जोखमीच्या प्रसूतींचे व्यवस्थापन करण्यासाठी एव्हीबीआरएचमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले.

# तापमानाचा कहर वाढला

- **दुपारी घराबाहेर पडणे धोकादायक**
- **नागरिकांनी घ्यावी विशेष काळजी**

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा चढत असून दुपारच्या सत्रात उन्हाचा तडाखा अक्षरशः असह्य होत आहे. रस्ते ओस पडत आहेत, तर नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे.

वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात, चक्कर येणे, डोकेदुखी यांसारख्या त्रासांमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेत शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होत असल्याने योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्या मजुरांनी अधिक खबरदारी घेणे गरजेचे आहे.

**काय करावे? (तज्ज्ञांचा सल्ला)**

तहान लागली नसली तरी दर अर्ध्या तासाने पाणी प्यावे, घराबाहेर पडताना टोपी, छत्री किंवा अंगावर ओला कापड वापरावे, दुपारी १२ ते ३ या वेळेत बाहेर जाणे शक्यतो टाळावे, हलकी, सच्छिद्र सुती कपडे वापरावेत, प्रवासात पाण्याची बाटली सोबत ठेवावी, धेंए, लिंबूपाणी, ताक, कैरीचे पन्हे, लस्सी यांचा आहारात समावेश करावा, घर थंड ठेवण्यासाठी पडदे, झडपा, सनशेड वापरावे, वेळोवेळी थंड पाण्याने अंघोळ करावी, बाहेर काम करताना विश्रांती घ्यावी व सावलीत थांबावे, काय करू नये? (धोकादायक सवयी टाळा), कडक उन्हात अति श्रमाची कामे करू नयेत, दारू, चहा, कॉफी व कार्बोनेटेड पेये टाळावीत, जड, घट्ट व गडद रंगाचे कपडे घालणे टाळावे, शिळे व उच्च प्राथिनयुक्त अन्न खाऊ नये, लहान मुलांना बंद वाहनात ठेवू नये, अत्याधिक तापमानात शारीरिक श्रम टाळावेत.

**उष्माघाताची लक्षणे ओळखा**

अचानक चक्कर येणे, अशक्तपणा, डोकेदुखी, सतत घाम येणे, मळमळ ही उष्माघाताची प्राथमिक चिन्हे आहेत. अशी लक्षणे दिसल्यास त्वरित सावलीत जाऊन विश्रांती घ्यावी व डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# साखर दाखवून तिखटाचा मारा

## लालपरीची लूट; प्रवाशांचा संताप उसळला

**समुद्रपूर/जनमाध्यम**

जनतेच्या भल्याच्या नावाखाली योजना, आणि त्याच जनतेच्या खिशावर डाका अशा तीव्र शब्दांत प्रवाशांनी एसटी महामंडळाच्या नव्या निर्णयांवर संताप व्यक्त केला आहे. १४ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून लागू झालेल्या भाडेवाढीमुळे 'लालपरी'चा प्रवास अक्षरशः महागला असून, सामान्य प्रवासी हैराण झाला आहे.



उन्हाळी सुट्टीच्या काळात १० टक्के हंगामी भाडेवाढ लागू करण्यात आली आहे. ही वाढ १५ जूनपर्यंत कायम राहणार असल्याने गावी जाणाऱ्या हजारो प्रवाशांच्या खिशाला जबर फटका बसत आहे. त्यातच प्रत्येक तिकिटामागे दोन रुपयांचा 'स्वच्छता अधिभार' कायमस्वरूपी लादल्याने प्रवाशांमध्ये संतापाचा स्फोट झाला आहे.बसगाड्या, स्थानके, विश्रांतीगृहे, शौचालये यांची स्वच्छता राखण्यासाठी हा अधिभार वसूल केला जाणार असल्याचे सांगितले जात असले, तरी स्वच्छतेच्या नावाखाली जनतेची लूट असा आरोप प्रवाशांकडून होत आहे. एकीकडे सवलतींचा गाजावाजा आणि दुसरीकडे टप्प्याटप्प्याने भाडेवाढ या दुहेरी भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्ध्या तिकिटाची योजना लागू करून एसटीने मोठा प्रतिसाद मिळवला. पण आता त्याच प्रवाशांना भाडेवाढीच्या माध्यमातून 'परतफेड' करावी लागत असल्याची भावना तीव्र होत आहे.

अगोदर तोंडात साखरेचा कण टाकायचा आणि मग तिखटाचा भडिमार करायचा अशी उपमा देत संतप्त नागरिकांनी प्रशासनावर सडकून टीका केली आहे.दरम्यान, एसटीला दिल्या जाणाऱ्या सवलतींचा आर्थिक भार शासन उचलते, असे अधिकृतपणे सांगितले जाते. मात्र, मग ही सततची भाडेवाढ कोणाच्या आदेशाने होते? असा सवालही आता उपस्थित केला जात आहे. महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या सर्वसामान्य माणसासाठी हा आणखी एक आर्थिक फटका ठरत आहे.

एकीकडे सरकार सवलती देऊन जनतेला दिलासा देण्याचा दावा करते, तर दुसरीकडे त्याच सवलतींची वसुली विविध मार्गांनी केली जाते, असा आरोप करत प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. परिणामी, 'लालपरी'चा प्रवास आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याची भीती व्यक्त होत आहे.

# आयपीएल सट्ट्यावर एलसीबीची कारवाई

## दोन बुकी जाळ्यात, १.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा/जनमाध्यम**

शहरात IPL सामन्यांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या सट्टेबाजीवर स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) मोठी कारवाई करत दोन बुकींना रंगेहात पकडले. या धाडीत एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सट्टेबाजांच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक २५ एप्रिल रोजी शहरात गस्त घालत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, पूलफैल परिसरातील अविनाश मतेलकर हा आपल्या साथीदारासह छत्र मधील राजस्थान रॉयल्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद या सामन्यावर सट्टा चालवत आहे. माहितीची खात्री करून पोलिसांनी तत्काळ त्याच्या राहत्या घरी छापा टाकला.छाप्यात आरोपी हे लोकांकडून पैसे घेऊन चालू सामन्यावर हार-जीतचा जुगार खेळवत असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून



५ हजार रुपये रोख रक्कम, दोन मोबाईल (किंमत अंदाजे १.३५ लाख रुपये) व इतर साहित्य असा एकूण १.४० लाखांचा मुद्देमाल जप्त केला.या प्रकरणी अविनाश संजय मतेलकर (३७, सुदर्शन नगर) संदीप जगजीत नैन (३१, सिंदी मेघे) यांच्याविरुद्ध वर्धा शहर पोलीस ठाण्यात जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू तसेच पथकातील अंमलदारांनी ही कारवाई केली.शहरात IPLच्या पार्श्वभूमीवर सट्टेबाजीचे प्रमाण वाढत असल्याने पोलिसांनी अशा अवैध प्रकारांवर कडक नजर ठेवली असून पुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# संक्षिप्त

## युवकास बेदम मारहाण

**आर्वी -** घरासमोर आरडाओरड करणाऱ्यांना हटकल्याच्या कारणावरून एका युवकाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना आर्वी शहरात घडली. अब्दुल अस्लम अब्दुल जब्बार (२८, रा. आंबेडकरनगर) असे जखमी युवकाचे नाव आहे. परिसरात रात्री उशिरा आदित्य चौधरी आणि शंतनू लिल्लोरे हे मोठ्या आवाजात आरडाओरड करीत होते. यामुळे त्रस्त झालेल्या अब्दुल अस्लम यांनी त्यांना शांत राहण्यास सांगितले. याच कारणावरून दोघांनी त्याच्याशी वाद घालत शिवीगाळ केली आणि त्यानंतर बेदम मारहाण केली. या मारहाणीत तो जखमी झाला. घटनेनंतर स्थानिकांनी त्याला उपचारासाठी हलविले. या प्रकरणी तक्रार दाखल होताच पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरात या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## ४० कट्टे चण्याची चोरी

**तळेगाव (शा. पंत) -** शेतातील बंड्यात साठवून ठेवलेले चण्याचे कट्टे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना जळगाव शेतशिवारात उघडकीस आली. विजय धार्मिक (५३, रा. जळगाव) यांनी त्यांच्या शेतातील बंड्यात ५४ कट्टे चण्याचे भरून ठेवले होते. काही दिवसांनी पाहणी केली असता त्यातील ४० कट्टे गायब असल्याचे निदर्शनास आले. या चोरीत सुमारे ५२ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. शेतमाल चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारीवरून तळेगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरात रात्रीच्या वेळी गस्त वाढविण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## भोंदू बाबांकडून पावणेदोन लाखांची फसवणूक

**सेलू -** आजार बरा करण्याच्या आमिषाने भोंदू बाबांनी एका व्यक्तीची पावणेदोन लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. प्रेमदास अवचट (५०, रा. सेलू) यांनी आपल्या आजाराबाबत भावाला माहिती दिली होती. त्यानंतर अमरदीप शास्त्री (रा. वाशिम) आणि अरुण जोशी (रा. कारंजा) हे दोघे घरी आले. त्यांनी उपचारासाठी पत्नीच्या अंगावरील दागिने व रोख रक्कम आवश्यक असल्याचे सांगितले. विश्वास ठेवून अवचट यांनी दागिने आणि ३० हजार रुपये रोख असा एकूण १ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज दिला. त्यानंतर दोघेही पसार झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सेलू पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## दुचाकी अपघातात युवक ठार

**देवळी -** भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटून झाडावर आदळल्याने युवकाचा मृत्यू झाल्याची घटना देवळी तालुक्यात घडली. शुभम पिंपळकर (२३, रा. रत्नापूर) असे मृत युवकाचे नाव आहे. तो दुचाकीने गावाकडे येत असताना व्यायामशाळेजवळ त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. दुचाकी थेट झाडावर आदळल्याने तो गंभीर जखमी झाला. स्थानिकांनी तातडीने मदत करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. देवळी पोलिसांनी अपघाताची नोंद करून पुढील तपास सुरू केला असून, नागरिकांनी वाहन चालविताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## जिल्हा दक्षता समितीवर श्रेया देशमुख यांची वर्णी

**वर्धा-** जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या भाजपा महिला मोर्चाच्या सरचिटणीस तथा नगरपरिषदेच्या माजी शिक्षण सभापती श्रेया देशमुख यांची अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत कार्यरत जिल्हा दक्षता समितीवर निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे महिला नेतृत्वाला नवी ताकद मिळाल्याची चर्चा जिल्हाभर रंगू लागली आहे.पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते ही नियुक्ती करण्यात आली असून, समितीच्या अध्यक्षपदी स्वतः पालकमंत्री, तर उपाध्यक्षपदी जिल्हाधिकारी कार्यरत असतात. या समितीवर नियुक्ती होणे म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर थेट देखरेख ठेवण्याची जबाबदारी स्वीकारण्यासारखे मानले जाते.श्रेया देशमुख या गेल्या काही वर्षांत विविध सामाजिक उपक्रमांमधून ठसा उमटवत आहेत. विशेषतः महिलांच्या प्रश्नांवर त्या तातडीने धावून जातात, त्यामुळे त्यांना स्थानिक पातळीवर मोठा प्रतिसाद लाभला आहे. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील शिधापत्रिका धारक, सर्वसामान्य नागरिक आणि महिलांच्या समस्यांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नियुक्तीबद्दल बोलताना श्रेया देशमुख यांनी पालकमंत्री डॉ. भोयर यांचे आभार मानले. ही जबाबदारी केवळ पदाची नसून जनतेच्या हक्काच्या अन्नधान्याच्या पारदर्शक वितरणाची आहे, असे त्या म्हणाल्या.दरम्यान, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून वितरित होणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंवर नियंत्रण ठेवणे, अनियमितता रोखणे आणि नागरिकांना न्याय मिळवून देणे हे या समितीचे प्रमुख कार्य असते.

## निर्भय, सुजाण नागरिक घडविण्याचा प्रहारचा ध्यास

**वर्धा-** युवाशक्तीला विधायक दिशा देत निर्भय, शिस्तबद्ध व जागरूक नागरिक घडविण्याचा संदेश देत प्रहार संस्थेच्या १८० व्या शौर्य व व्यक्तिमत्व विकास शिबिराचा समारोप उत्साहात झाला. निसर्ग सेवा समितीच्या 'ऑक्सिजन पार्क' परिसरात झालेल्या या कार्यक्रमात विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही यांनी मार्गदर्शन करताना, 'देशाला आज सुजाण नागरिकांची गरज असून शालेय जीवनापासूनच सैनिकी प्रशिक्षणाची जोड मिळणे आवश्यक आहे,' असे सांगितले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - १५१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती- ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल- atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# 'दलित वस्ती निधीचा गैरवापर?
## -जनतेतमध्ये संतापाचा उद्रेक!'

**अचलपूर/प्रतिनिधीः-** तब्बल २० ते २५ वर्षांपासून दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत मिळणारा निधी नियमानुसार खर्च न होता त्याचा सर्रास गैरवापर होत असल्याचा गंभीर आरोप रिपाइं अचलपूर शहराध्यक्ष किशोर मोहोड यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करत प्रशासनाला थेट जाब विचारला आहे. या प्रकरणामुळे शहरातील दलित वस्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या जी.आर.नुसार दलित वस्ती सुधार योजनेचा १०० टक्के निधी हा केवळ दलित वस्त्यांमध्येच खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात हा निधी नियमांना हरताळ फासत इतर भागांकडे वळविला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी, ज्या दलित वस्त्यांसाठी हा निधी मंजूर होतो, त्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधांचा प्रचंड अभाव कायम आहे. रस्ते, गटार, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था यांसारख्या प्राथमिक गरजांकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र होत आहे.

काही ठिकाणी तर मंजूर कामे दलित वस्त्यांऐवजी इतर भागातच पूर्ण करण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव पुढे आले आहे. त्यामुळे 'निधी कुठे जातोय?' हा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या सर्व प्रकाराची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपाइंच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन निधीचा वापर शासन नियमांनुसार पारदर्शकपणे करावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे

# नगर परिषद कार्यालय, पांढरकवडा, जि.यवतमाळ
## स्वच्छता विभाग (सन २०२६-२७)
## निविदा सुचना जाहीरात

जा.क्र.१३९/२०२६ — दिनांक २७.०४.२०२६

नगर परिषद पांढरकवडा यांचे वतीने न.प.निधीतून स्वच्छता विभाग अतर्गत सन २०२६-२७ करीता खालील काम करण्याकरीता द्विलिफाफा पध्दतीने सिलबंद लिफाफ्यात कमी दराची निविदा नोंदणीकृत संस्था/फर्म मार्फत मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अनामत रक्कम | निविदा फॉर्म शुल्क | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | गणपती, हाडपक्या गणपती, दुर्गादेवी, पोळा इत्यादी साठी जिवरक्षक सुरक्षा दल (भोई) पुरवठा करणे (प्रति दिवस प्रती व्यक्ती दर देणे) | २०००/- | २००/- | आदेशानुसार |
| २. | गणपती, हाडपक्या गणपती, दुर्गादेवी, मस्जीद रोड, महादेव घाट, ईमाम डोह घाट ठिकाणी आवश्यकतेनुसार वेळोवेळी विद्युत व्यवस्थाचे काम करणे (प्रति लाईट प्रति दिवस दर देणे) | १५००/- | २००/- | आदेशानुसार |
| ३. | गणपती, हाडपक्या गणपती, दुर्गादेवी, बंदोबस्त साठी सुरक्षा कठडे लावणे कामे करणे (प्रति कठडे प्रति दिन लावण्याचे दर देणे) | १५००/- | २००/- | आदेशानुसार |
| ४. | वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत शहरात वृक्षरोपणासाठी खड्डे करणे, माती व खत भरणे, नवीन वृक्ष खरेदी करुन त्याचे वर्षभर संगोपन करणे निगा राखणे, ट्री-गार्ड लावणे, झाडाची छटाई व ईतर ठिकाणीचे झाडे- झुडपे तोडणे इ. कामाकरीता प्रति रोप/झाड चा एकत्रित वार्षिक दर देणे (नवीन लावायचे झाड व लावलेले झाड यांचे वेगवेगळे दर देणे) | ९९००/- | २००/- | आदेशानुसार |
| ५. | शहरातील घातक वृक्ष तोड करणे, फांद्या तोडणे व त्याची संपूर्ण विल्हेवाट साहित्य मनुष्यबळासह कामे करणे (प्रति वृक्ष व फांद्या तोडणेचे दर देणे) | ३०००/- | २००/- | आदेशानुसार |
| ६. | शहरातील ५ मोठे नाल्यांची जे.सी.बी. ट्रॅक्टर व इतर साहित्य द्वारे मानवी मनुष्यबळासह संपूर्ण सफाई करणे, उचल करणे, विल्हेवाट लावणे आवश्यक साहित्यासह (एकत्रित दर देणे) | २०००/- | २००/- | आदेशानुसार |
| ७. | स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान व ईतर अभियान अंतर्गत वेळोवेळी आवश्यकतेनुसार बॅनर, पोस्टर तयार करुन घेणे चे कामे | २५००/- | २००/- | आदेशानुसार |
| ८. | न.प.चे सर्व वाहने दुरुस्ती व त्यासंबंधी साहित्य खरेदी/टायर ट्युबचे पुरवठा करणेचे कामे (यादीनुसार दर देणे) | ५०००/- | २००/- | आदेशानुसार |
| ९. | आरोग्य विभागाकरीता सिंधी झाडू, बुरडी झाडू, शेनोड्या, लोखंडी मोठे फावडे, साधे फावडे, प्लास्टीक टोपले, चेंबर हुक, फावडे दांडे व टिकास दांडे, गमबुट हातमोजे पुरवठा करणे (प्रति नग दर देणे) | ३०००/- | २००/- | आदेशानुसार |
| १०. | मैला वाहून नेणाऱ्या नविन हातगाड्यांची पुरवठा करणे (प्रति गाडी दर देणे) | २०००/- | २००/- | आदेशानुसार |
| ११. | झाडे-झुडपे, कटींग मशिन, स्प्रेपंप खरेदी, फॉगींग मशीन खरेदी करुन पुरवठा करणे (प्रति यंत्र दर देणे) | २५००/- | २००/- | आदेशानुसार |
| १२. | आवश्यकतेनुसार वेळोवेळी डास प्रतिबंधक औषधी, जंतुनाशक औषधी, तणनाशक औषधी स्प्रे व धुर फवारणीचे कामे करणे (संपूर्ण यंत्र साहित्य इंधन औषधी मजूर सह प्रति प्रभाग १ वेळ एकत्रित दर देणे) | ९९००/- | २००/- | आदेशानुसार |
| १३. | नैसर्गिक आपत्ती व पूर परिस्थिती व ईतर वेळी आवश्यकतेनुसार जेसीबी वनटेन द्वारे भाडेतत्त्वावर कामे करुन देणे (प्रति तास वेगवेगळे दर देणे) | ३०००/- | २००/- | आदेशानुसार |

**शर्ती व अटी -**

१. कोरी निविदा प्रपत्र मिळण्याचा दिनांक २८.०४.२०२६ ते दिनांक ०७.०५.२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होऊ शकेल.
२. मोहरबंद निविदा (अनामत रकमेसह) दिनांक ०८.०५.२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, न.प.पांढरकवडा यांचेकडे स्विकारण्यात येईल व शक्य असल्यास त्याच दिवशी दुपारी ४.०० नंतर सिलबंद निविदा उघडण्यात येईल, शक्य नसल्यास दि.११.०५.२०२६ ला सिलबंद निविदा उघडण्यात येईल.
३. काम करावयाच्या इतर शर्ती व अटी तसेच सविस्तर माहिती कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स्वच्छता विभागात पहावयास मिळतील.
४. सदर निविदा रद्द किंवा मंजूर करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**(आतीप ल.बोरेले)** नगराध्यक्ष, नगर परिषद पांढरकवडा
**(आतीप ता.चव्हाण)** उपनगराध्यक्ष, नगर परिषद पांढरकवडा
**(गणेश धुर्वे)** आरोग्य सभापती, नगर परिषद पांढरकवडा
**(पंकज गावंडे)** मुख्याधिकारी, नगर परिषद पांढरकवडा

# जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ३२४/२०२६ — ने.ता.१८.०६.२०२६

**अर्जदार -**
१. सौ.नंदा गजपाल सिरसाम, वय ३९ वर्षे, धंदा - घरकाम
२. सौ.दिपाली रामेश्वर टेकाम, वय ३२ वर्षे, धंदा - घरकाम
दोघीही रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.गीता संजयराव सिरसाम, वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.एकलविहीर, पो.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार चे वडील **नामे किसनराव डोमाजी मरसकोल्हे** हे दि.**०३.०६.२०२५** रोजी **पोरगव्हाण**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत तसेच अर्जदाराची आई **नामे शालू किसनराव मरसकोल्हे** ही दि.**१५.०६.२०१५** रोजी टी.बी.हॉस्पीटल, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २४.०४.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.७६७/२०२६
**श्रीमती नंदा अधिक सहा -वि- निरंक**
पुढील ता.०७.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. श्रीमती नंदा जयनारायण कठारे, वय ६५ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.आसेगांव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. आकाश जयनारायण कठारे, वय ३० वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
३. सविता लाला पट्ठे, वय ३८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
अर्जदार नं.२ व ३ रा.सबनिस प्लॉट, कल्याण नगर, रुक्मिणीनगर,अमरावती
४. सुनिता बबन राठी, वय ४५ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
५. आशा मदन राठी, वय ४२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
अर्जदार नं.४ व ५ रा.रोहिदास नगर, देवपेठ, वाशिम ता.जि.वाशिम
६. ममता संतोष पहारे, वय ४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.सह्याद्री पार्क भोकरदन रोड, जाफराबाद, ता.जाफराबाद जि.जालना
७. रिना सचिन आकोटे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.औरंगपुरा, एचव्हीपीएम जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत जयनारायण पंचम कठारे** यांचे दिनांक **२१.०९.२०१८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार नंदा अधिक सहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नंदा अधिक सहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

प्रो.नं.४४००/२०२५
दि.१८.११.२०२५

**दर्यापूर जि.अमरावती येथील दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांच्या न्यायालयातील कारण दाखवा नोटीस**

आर.एम.जे.सी. क्र./३७६/२०२५ — दिनांक ०८.०६.२०२६

(सर्वसाधारण नमुना) (नमुना-४ अनुसूची-१ परिशिष्ट-एच)

**अर्जदार -** निर्मला रमेशराव भानगे
**--- विरुध्द ---**
**गैरअर्जदार**- गोपाल रमेशराव भानगे व ईतर

**बनाम -**
१. गोपाल रमेशराव भानगे, वय ४३ वर्षे, धंदा - मजुरी
२. दिनेश रमेशराव भानगे, वय ३८ वर्षे, धंदा - मजुरी
१ व २ असदपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती
३. वर्षा निलेशराव बोरवार, वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.निंभोरा, ता.जि.अमरावती
४. मिनल उमेश नांदणे, वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.बेलोरा बु., पो.देवडी, ता.आष्टी, जि.वर्धा
५. ज्योती शेषराव अमझरे, वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.काळेगांव रोड, गणपती मंदिरासमोर, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे

ज्याअर्थी उपरिनामित अर्जदार यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे. त्याअर्थी सोबतच्या नकलेप्रमाणे दिनांक २६.११.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सूनावणी होवून निकाल दिला जाईल. तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांक किंवा त्यापुर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यास कसून केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दिनांक १८ माहे ११ सन २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# रानडुक्कर आडवे आल्याने अपघात, एकाचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती–नागपूर महामार्गावर रानडुकराला चुकवण्याच्या प्रयत्नात दुचाकी घसरून झालेल्या अपघातात गंभीर जखमी ५६ वर्षीय व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना सावर्डी गावाजवळ घडली. मृताची ओळख राजेंद्र गोविंदराव नसरे (वय ५६, रा. वडोना, ता. आर्वी, जि. वर्धा) अशी पटली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र नसरे हे त्यांच्या पत्नीसह नांदगाव पेठ येथील बिझीलँड मार्केटमध्ये कपडे खरेदी करून एमएच ३२ / एम ४४४३ क्रमांकाच्या दुचाकीने घरी परतत होते. सावर्डी गावाजवळील महामार्गावर पोहोचताच रस्त्याच्या मधोमध अचानक एक रानडुक्कर आले. त्याला चुकवण्याच्या प्रयत्नात दुचाकी घसरल्याने राजेंद्र नसरे गंभीर जखमी झाले.

## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.- बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७३५/२०२६
**रिनल अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rinal Amol Mavade, Age 31 Yrs. Occu.: Service
R/o Behind Shitala Mata Mandir, Mahajanpura, Bhatkuli Road, Amravati
2. Vanita Ramdas Kadu, Age 55 Yrs. Occu.: Household
3. Rushikesh Ramdas Kadu, Age 28 Yrs. Occu.: Business
No.2 & 3 R/o Malipura, Kholapuri Gate, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramdas Shankarrao Kadu हे दिनांक 12.11.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rinal Amol Mavade + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rinal Amol Mavade + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२०६/२०२६ — ने.ता.२०.०६.२०२६

**अर्जदार :**
१. जाकेरा बानो लुकमान अली, वय ७८ धंदा - घरकाम
२. सलमान अली लुकमान अली, वय ३२ धंदा - मजुरी
दोन्ही रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत लुकमान अली अजीज अली** यांचा मृत्यू दिनांक **२४.१०.२००८** रोजी ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२०६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

# सार्वजनिक सुचना

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **वकार अहेमद अब्दुल सत्तार कुरेशी** रा,कहेकाशा कॉलनी, वलगांव रोड, अमरावती यांचे मौजे गंभीरपूर, प्र.बडनेरा, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे क्र.२१/१ मधील प्रस्तावित लेआऊटमधील प्लॉट क्र.४५,४६,६१,६२,६५,६६,६७ व ६८ (एकुण क्षेत्रफळ ४८४० चौ.फुट) बाबत पुर्वी झालेले सर्व करार रद्द झालेले आहेत.

**अमजद खान अजीज खान** यांनी वरील प्लॉट्स संदर्भात केलेल्या करारानुसार संपूर्ण मोबदला न भरल्यामुळे दिनांक २२.१२.२०२५ पासून सर्व करार रद्द झाले आहेत व सदर प्लॉट्सचा ताबा पूर्णपणे माझ्या पक्षकाराकडे आहे.

तथापित, अमजद खान तसेच त्यांचे सहकारी डॉ.अजीम खान अजीज खान, रहीम खान बाबा खान व मोहम्मद मोहसीन खालीद कुरेशी हे वरील प्लॉट्सबाबत बेकायदेशीर व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

म्हणून सर्वसामान्य जनतेस सुचित करण्यात येते की, वरील नमुद प्लॉट्सबाबत कोणताही खरेदी-विक्री किंवा इतर व्यवहार करु नये. अन्यथा अशा व्यवहारास माझे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत व संबंधित व्यक्तिंवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. ही सूचना सर्वांनी गांभीर्याने घ्यावी.

ठिकाण - अमरावती
**दिनांक २७.०४.२०२६**

(ॲड.राजा एस.झेड.अली)
खरे लेआऊट, कॅम्प अमरावती
ता.जि.अमरावती
मो.९८९०९०२८०६

# जाहीर नोटीस

माझे पक्षकार नामे **प्रभाकर सदाशिव क्षीरसागर** यांनी तसेच त्यांचे इतर भाऊ नामे **नारायण सदाशिव क्षीरसागर, रामकृष्ण सदाशिव क्षीरसागर तसेच रविंद्र श्रीकृष्ण क्षीरसागर** यांनी दिलेल्या माहिती अधिकारावरुन व पुरविलेल्या कागदपत्रांच्या आधारे सर्व नागरिकांना जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, मौजा नवबाग, ग्रा.पं.कक्षा भिलोना, ता.अकालपूर येथील मिळकत शेत सर्व्हे नं.०३, एकुण क्षेत्र ०१ हे.२४ आर, वार्षिक आकार ८ रु.५० पैसे, याची चतुःसिमा--

पुर्वेस - लोकवस्ती
पश्चिमेस - प्रदीप पाटील यांचे शेत व रस्ता
उत्तरेस -
दक्षिणेस - रस्ता

अशा वर्णनाची मिळकत माझे पक्षकार यांची वडिलोपार्जित मालकी ताब्याची असून सदर मिळकतीच्या वाटणी व स्वातंत्र्य ताब्यास घेवून मे.दिवाणी न्यायाधीश, अचलपूर यांचे समक्ष नि.दि.मु.११५/२०२४ वाटणी करुन स्वातंत्र ताबा करीता दावा न्यायप्रविष्ट आहे. तसेच सदर मिळतकतीच्या ७/१२ उतारा व इतर कागदपत्रावर श्रीधर सदाशिव क्षीरसागर याने त्याच्या नावाने बेकायदेशीर खोट्या नोंदी केलेल्या असल्याने सदर मिळकतीवरील श्रीधर सदाशिव क्षीरसागर यांच्या नावाची नोंद रद्द करण्याकरीता मे.आयुक्त, अमरावती यांचे समक्ष महसूल अपिल न्यायप्रविष्ट आहे. सदर मिळकत ही वादग्रस्त असतांना श्रीधर सदाशिव क्षीरसागर हा सदर मिळकतीबाबत खोटी कागदपत्रे तयार करुन सदर मिळकतीची परस्पर विकी करुन विल्हेवाद लावण्याच्या प्रयत्नात आहे. सदर मिळकत वादग्रस्त आहे. तरी सदर मिळकतीची खरेदी विकी बाबतला तसेच इतर कुठलेही हस्तांतरणाबाबत दस्त माझ्या पक्षकाराच्या संमतीशिवाय नोंदणी करणे किंवा कुठाही व्यवहार करु नये. करीता माझ्या पक्षकाराला गैरहजेरीत न्यायालयाच्या संमतीशिवाय सदर मिळकतीबाबतचा कुठलाही व्यवहार माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. याकरीता होणाऱ्या नुकसानीत आपण स्वतः जबाबदार राहाल. करीता जाहीर नोटीस दिली.

**दिनांक २७.०४.२०२६**
**अचलपूर**

**तर्फे**
**ॲड.यू.आर.चारपेटे**
**मोबा.नं.८७९३५३४९८३**

सही,
प्रभाकर सा.क्षीरसागर

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७३७/२०२६
**श्रीमती आशिया अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Asiya Khan Firoz Khan, Age 43 Yrs. Occu.: Housewife
2. Farhan Khan Firoz Khan, Age 20 Yrs. Occu.: Education
3. Anabiya Huda Firoz Khan, Age 17 Yrs. Occu.: Education
(Appli.No.3 being a Minor applying through her natural guardian i.e.Appli.No.1)
4. Rahim Khan Dule Khan, Age 78 Yrs. Occu.:
All R/o Pathan Pura, Amravati, Tq. Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **फिरोज खान रहीम खान** हे दिनांक 05.03.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशिया** + 3 **विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशिया** + 3 **विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

# जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **रोहित राजकुमार यादव,** वय ३२ वर्षे, धंदा - व्यापार, रा.लाईन नं.१, विलास नगर, अमरावती यांच्या मालकीची व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्ता (खुला प्लॉट) विकत घेण्याचा करार केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन--

**स्थावर मालमत्तेचे वर्णन** - नोंदणी पोटतुकडी अमरावती शहर विद्यमान कचेरीचे कक्षेतील अमरावती मनपा हद्दीतील मौजे-महाजनपुरा, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.२/१ मधील जमिनीतील विद्यमान जिल्हाधिकारी साहेब, अमरावती यांचे फाईलवरील रा.मा.क्र. एन.ए.पी.३४/महाजनपुरा १०/१९९०-९१, नि.ता.२८.०८.१९९० नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील प्लॉट क्र.१७ याची साईज १० मिटर X २० मिटर असून याचे एकुण क्षेत्रफळ २०० चौ.मी.(२१५२ चौ.फुट) आहे. याची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

पुर्वेस - रोड
पश्चिमेस - प्लॉट नं.११
उत्तरेस - प्लॉट नं.१८
दक्षिणेस - प्लॉट नं.१६

येणेप्रमाणे वरील वर्णन केलेली मालमत्ता (खुला प्लॉट) विकत घेण्याचा करार माझे पक्षकार यांनी केलेला आहे व लवकरच सदर मालमत्तेची खरेदी करुन घेणार आहेत. सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्तेवर कोणाचे कोणतेही हितसंबंध, सरकारी वा निमसरकारी, राष्ट्रीयकृत, वित्त संस्थेचे, सावकारी कर्ज, गहाण, बोजा, वारसा हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क, दान, खरेदी, लिज, अटॅचमेंट, रिझर्वेशन, एक्विझिशन, कुळ वहीवाट, चोळी-बांगडी वगैरे कोणत्याही प्रकारचा बोजा अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बॅंक, सहकारी संस्था, निमसरकारी व खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सूचना प्रेषित झाल्यापासून ४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणतीही कसल्याही प्रकारची हरकत/आक्षेप आला नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीची खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचेही कसलीही हरकत, आक्षेप, वाद ऐकला जाणार नाही. त्याचप्रमाणे नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणार नाही.

त्याकरीता ही जाहीर सूचना.

**दिनांक २७.०४.२०२६**
**अमरावती**

(ॲड.राजेश एन.पट्टलवार)
प्रभात कॉलनी, दसरा मैदान रोड
अमरावती, ता.जि.अमरावती
मो.९९७०४४७७०७

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१०९/२०२६ — ने.ता.१०.०६.२०२६

**अर्जदार :**
१. चंद्रकला सूर्यभान बांडाबुचे
२. निता सुभाष बांडाबुचे
३. प्रफुल सुभाष बांडाबुचे
४. दर्शन सुभाष बांडाबुचे
सर्व रा.वार्ड नं.४, मंगरुळ चव्हाळा,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **सुभाष सूर्यभान बांडाबुचे** यांचा मृत्यू दि.**०३.१०.२०२४** रोजी मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला . मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

# पाणीटंचाई पाठोपाठ ११३ गावांना दूषित पाणीपुरवठ्याचे संकट

**अमरावती/का.प्र.**
ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा सोसणाऱ्या अमरावतीकरांसमोर आता दूषित पाण्याचे मोठे संकट उभे ठाकले जिल्ह्यातील तब्बल ११३गावांमध्ये नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे वास्तव पाणीपुरवठा नमुन्यांच्या तपासणीतून समोर आले आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने मार्च महिन्यामध्ये जिल्ह्यातील १ हजार ५३२ गावांमधील पाण्याचे नमुने तपासले. यात गावातील मुख्य जलस्त्रोतांसह सार्वजनिक विहिरी, हातपंप, शाळा आणि अंगणवाड्यांमधून एकूण १५ हजार ८६१ नमुने गोळा करण्यात आले होते. या विस्तृत तपासणीअंती जिल्ह्यातील ११३ गावांतील १८५ नमुने दुषित असल्याचा निष्कर्ष निघाला आहे. अमरावती जिल्ह्यात एकूण १ हजार ५८८ गावे असून, दूषित पाण्याचे हे प्रमाण प्रशासनाची चिंता वाढवणारे आहे.ही गंभीर परिस्थिती समोर येताच पाणी व स्वच्छता विभागाने तातडीने काही उपाययोजना हाती घेतल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले, त्यानंतर करण्यात आलेल्या फेरतपासणीत ९२ गावांमधील १४२ नमुने पिण्यायोग्य आढळले आहेत. मात्र, उर्वरित २१ गावांतील पाण्याची स्थिती अद्यापही साशंक असल्याने तिथले नमुने पुन्हा तपासणीसाठी




प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या २१ गावांमध्ये चिखलदरा तालुक्यातील सर्वाधिक आठ, दर्यापूरमधील सहा, अचलपूर व तिवसा येथील प्रत्येकी दोन आणि चांदूरबाजार, धारणी व नांदगाव खंडेश्वर येथील प्रत्येकी एका गावाचा समावेश आहे.सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून अनेक ठिकाणी जलस्त्रोत आटले आहेत. परिणामी, टँकरसारख्या कृत्रिम साधनांनी पाणीपुरवठा करावा लागत आहे.पाणी दूषित आहे की पिण्यायोग्य, हे ठरवण्यासाठी प्रशासनाकडून सात मुख्य निकषांची पडताळणी केली जाते. यामध्ये ग्रामपंचायतीकडे शुद्धीकरणासाठी टीसीएल पावडर, द्रव क्लोरीन, क्लोरीन गोळ्या यांसारख्या सामग्रीचा मुबलक पुरवठा, उपलब्ध असलेल्या शुद्धीकरण सामग्रीचा साठा प्रमाणित असल्याची ग्रामपंचायतीने केलेली खातरजमा, पाणी शुद्धीकरणाच्या प्रक्रियेसाठी ग्रामपंचायतीने स्वतंत्र व जबाबदार कर्मचाऱ्याची नियुक्ती, नळ पाणीपुरवठा योजनेच्या ठिकाणी शुद्धीकरणाची योग्य आणि सुरक्षित यंत्रणा, नळ जोडणीत कुठेही गळती असल्यास तिची वेळेत दुरुस्ती, हे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या आणि पिण्यायोग्य पाणी असलेल्या गावाला प्रशासनाकडून 'ग्रीन कार्ड' दिले जाते. याउलट, वरीलपैकी त्रुटी आढळल्यास आणि पाणी दूषित असल्यास 'रेड कार्ड' दिले जाते.

### तालुकानिहाय दूषित पाण्याची स्थिती

| | |
|---|---|
| भातकुली | २० |
| मोर्शी | १४ |
| अमरावती | १३ |
| अचलपूर | ११ |
| तिवसा | १० |
| वरूड | ९ |
| चिखलदरा | ८ |
| चांदूरबाजार | ६ |
| दर्यापूर | ६ |
| चांदूर रेल्वे | ५ |
| धारणी | ५ |
| नांदगाव खंडेश्वर | ४ |
| धामणगाव रेल्वे | २ |

## संक्षिप्त

### तीन दिवसीय बुद्ध महोत्सवाचे आयोजन



**शिराळा-** येथील बुद्ध मुर्ती जवळ बुद्ध जयंती महोत्सवाचे आयोजन २९, ३० एप्रिल व १ मे ला करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी २९ एप्रिल ला लहान मुलां मुलीचा संध्याकाळी सहा वाजता सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येईल. तर दुसऱ्या दिवशी ३० एप्रिला ला रात्री ७ वाजता व्याख्यानमाला विषय आहे बुध्दाच्या विचाराचा प्रभाव व्याख्यानकर्ते ॲड महेंद्र श्रीरामजी तायडे शिराळा, मंगेश नाईक पुसदा, नंदकुमार चिंचखेडे शिराळा, विशाल तायडे तसेच प्रज्ञा शिल मंडळाच्या उपासिका उपस्थित राहतील. सकाळी ९.३० वाजता सत्कार समारंभ सत्कारमूर्ती माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती मिंलिद तायडे व माजी अमरावती पंचायत समिती सभापती संगिता मिलिंद तायडे यांचा सत्कार प्रज्ञा शिल करुणा मंडल शिराळा करतील. सकाळी १० वाजता शिराळा येथील भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याचा सौंदर्यीकरणाचा लोकार्पण सोहळा करण्यात येईल. कार्यक्रमाचे आयोजक प्रज्ञा शिल करुणा महिला मंडळ शिराळा व युवक प्रज्ञा शिल करुणा मंडल शिराळा तरी सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची विनंती केली.



### नैसर्गिक शेती कार्यशाळा

**शिराळा-** महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत विभागस्तरीय कार्यशाळाडॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला येथे आयोजित करण्यात आली होता.या कार्यशाळेचे उद्घाटन संचालक सुनील बोरकर यांच्या हस्ते झाले असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. शरद गडाख उपस्थित होते. तसेच विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली कार्यशाळेत नैसर्गिक शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती पद्धती, उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय तसेच शाश्वत शेतीसंदर्भात सखोल मार्गदर्शन करण्यात आले.त्याचप्रमाणे नैसर्गिक शेतीशाळा राबविण्या करीता शेतीशाळा मोड्यूल देवून माहिती देण्यात आली.या कार्यशाळेला शिराळा येथील सहाय्यक कृषि अधिकारी मारोती जाधव यांच्या सोबत 'पगलानंद महाराज शेतकरी बचत गटाचे' अध्यक्ष मंगेश पाटील काळमेघ तथा संचालक मंडळाने भेट देत सक्रिय सहभाग नोंदविला. उपस्थितांनी मार्गदर्शनाचा लाभ घेत आधुनिक व पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### कौंडण्यपूर ते पंढरपूर बस सुरु करण्याची मागणी

**कुऱ्हा-** विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे जन्मस्थान असलेल्या पुरातन प्राचीन तिर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर श्री विठ्ठल रूख्मीणी मंदिर असून येत्या १७ मे २०२६ ते १७ जून २०२६ अधिक मास महिना सुरु होत असून वारकरी भाविक भक्तांना दर्शना करिता आर्वी आगाराने श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर ते श्री तिर्थक्षेत्र पंढरपूर अशी बस सेवा सुरु केली तर या भागातील तसेच परिसरातील वारकरी भाविक भक्त यांना जाण्याकरिता सोईचे होईल. तसे तर नियमित कौंडण्यपूर ते पंढरपूर ही एस टी बस सेवा पाहीजे कारण महिन्यातून दोन वेळा एकादशी (पंधरवाडी) येतात त्यामुळे वारकरी भाविक भक्त सुध्दा पंढरपूरला जातात.तेव्हा आर्वी आगाराने येणाऱ्या अधिक मास महिन्यात एस टी बस सेवा सुरु करावी अशी या भागातील व परिसरातील सर्व भाविक भक्त वारकरी प्रवाशी जनतेची मागणी आहे. त्वरीत संबंधित एस टी बस वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन बसची व्यवस्था करावी.

## डॉ. अलिशा लोखंडे एमबीबीएसमध्ये प्रथम

**शिरजगाव कसबा -** चांदूरबाजार तालुक्यातील पेठे, करजगाव येथील ख्यातनाम रुग्णसेवेसाठी सदैव तत्पर असणारे मती डॉ. प्रदीप लोखंडे आणि डॉ. कविता प्रदीप लोखंडे यांची सुकन्या डॉ. अलिशा प्रदीप लोखंडे हिने आपले वैद्यकीय शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून एम.बी.बी.एस.ही पदवी संपादन केली आहे. तिच्या या यशामुळे करजगावसह संपूर्ण परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. आई-वडिलांचा रुग्णसेवेचा वसा जवळून पाहिल्यामुळे तिलाही याच क्षेत्रात आपली ओळख निर्माण करण्याची ओढ होती. आज एम.बी.बी.एस. पदवी मिळवून तिने वैद्यकीय क्षेत्रात आपला स्वतः चा ठसा उमटविला असून, आई वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत समाजसेवेचा संकल्प पूर्ण केला आहे. दिग्गजांच्या हस्ते पदवी प्रदान नुकताच पार पडलेल्या पदवीदान समारंभात 'डॉ. अलिशा हिला ही पदवी प्रदान करण्यात आली. प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. विकास महात्मे (नागपूर) आणि डॉ. कांबळे (चंद्रपूर) यांच्या हस्ते तिला ही पदवी देऊन गौरविण्यात आले. परिसरातील पहिली महिला डॉक्टर डॉ. अलिशा हिचे हे यश विशेष ऐतिहासिक मानले जात आहे, कारण करजगावमधील आजूबाजूच्या /०४/परिसरातील मुर्लीपकी आतापर्यंतची ती पहिल महिला डॉक्टर ठरली आहे. एका ग्रामीण भागातून येऊन वैद्यकीय क्षेत्रात हे उत्तुंग यश मिळवून तिने परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. डॉ. अलिशा हिचा शैक्षणिक प्रवास अत्यंत कौतुकास्पद राहिला आहे. पहिली पासून ते आज पदवी मिळेपर्यंत ती सदैव प्रथम क्रमांकावरच राहिली आहे.

## हनुमान गढी पर्यटन स्थळाला गती

### ३ वर्षांत रूप पालटणार; ११७ कोटी मंजूर

**अमरावती/का.प्र.**
जिल्ह्यातील हनुमान गढी परिसराला एक प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी सरकारने मोठी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने जारी केलेल्या सरकारी आदेशानुसार, या प्रकल्पासाठी ११७ कोटी २५ लाख ४९ हजार ८६४ चा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या भागातील पर्यटन सुविधांचा विस्तार करून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे आणि स्थानिक रहिवाशांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे, हा सरकारचा मुख्य उद्देश आहे. हा प्रकल्प अमरावती जिल्ह्यातील मौजा मालेगाव येथील हनुमान गढी संकुलात सुरू आहे. येथे हनुमानजींची एक भव्य मूर्ती उभारण्यात आली आहे. पर्यटन विकासासाठी ११७ कोटी २५ लाख निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीच्या वितरणाबाबतचा सरकारी निर्णय स्वतंत्रपणे जारी केला जाईल. या प्रकल्पामध्ये आधुनिक सुविधा आणि धार्मिक पर्यटन यांचा संगम असेल. हनुमानाच्या जीवनावर आधारित एक भव्य गॅलरी बांधली जाईल. तांत्रिक रचनेसाठी तज्ज्ञांच्या मदतीने हनुमानाच्या मूर्तीवर एक विशेष लेझर शो आयोजित केला जाईल. एक मॉल, हस्तकला केंद्र आणि बहुउद्देशीय सभागृह बांधले जाईल. महाराष्ट्राच्या परंपरा जपण्यासाठी या संकुलात एक कुस्तीचा आखाडा बांधला जाईल, ज्याची रचना क्रीडा विभागाच्या मानकांनुसार केली जाईल. संपूर्ण परिसरात २५० किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प, पर्जन्यजल संचयन, सीसीटीव्ही निगराणी आणि अग्निशमन यंत्रणा बसवण्यात येईल. या प्रकल्पाच्या बांधकामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे सोपवण्यात आली आहे. पुढील तीन वर्षांत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर, हनुमान चालिसा ट्रस्ट या स्थळाच्या देखभालीची आणि दुरुस्तीची जबाबदारी घेईल. सुरुवातीला जिल्हाधिकाऱ्यांकडून २५८.८८ कोटी रुपयांचा प्रस्ताव देण्यात आला होता.

## आजपासून जिल्ह्यात विधीमंडळ अंदाज समितीचा मुक्काम

### समिती प्रमुख आ.खोतकरांसह २९ आमदारांचा समावेश;३० एप्रिलपर्यंत प्रशासन सतर्क

**अमरावती/का.प्र.**
विधीमंडळाची अंदाज समिती २८ ते ३० एप्रिलदरम्यान जिल्हा दौऱ्यावर असून, जिल्हाभरातील विविध विभागांतर्गत झालेली विकासकामे व त्यावरील खर्चाच्या दृष्टीने ही समिती प्रशासनाची झाडाझडती घेणार आहे. दरम्यान, विधीमंडळाच्या अशा समित्यांना अधिकाऱ्यांना जागीच निलंबित करण्याचे अधिकार असल्याने सध्या जिल्हा प्रशासनासह जिल्हापरिषद, महापालिका, नगरपालिका, साबांवि, पोलिस व इतरही सर्वच विभागांतील अधिकाऱ्यांमध्ये धास्ती भरली असल्याचे चित्र आहे

आ. अर्जुन खोतकर हे या समितीचे प्रमुख असून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्यासह एकूण २९ आमदारांचा या समितीत समावेश आहे. जवळपास ४९ सरकारी विभागांतर्गत झालेल्या विकासकामांवरील खर्चाचा आढावा ही समिती घेणार आहे. त्यादृष्टीने संबंधित सर्व लेखाजोखा दोन दिवसांपूर्वीच समितीला पाठविण्यात आला आहे.१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत पोलिस विभागातील विकासकामे, पोलिस ठाण्यांचे डिजीटलायझेशन, पोलिस वसाहतींमधील सुविधा, राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत दारू विक्री, भरारी पथकांची कामगिरी, परिवहन विभागांतर्गत जमा झालेला महसूल, रिक्त व भरलेली पदे, महसूल विभागांर्तत विविध शुल्कापोटी येणारा कर, अवैध गौणखनिजांच्या प्रकरणातून जमा केलेल्या दंडाची रक्कम, ग्रामविकास विभागांतर्गत मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत झालेले रस्ते, नगरविकास विभागांतर्गत महापालिका व नगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, अग्निशमन, आरोग्यविषयक योजना, रिक्त व भरलेली पदे आदी मुद्यांच्या आधारे हा आढावा घेतला जाणार आहे.याशिवाय सहकार व पणन विभाग, ऊर्जा व खनिकर्म विभाग,उद्योग व कामगार विभाग, आदिवासी विभाग, पर्यावरण, पाणीपुरवठा, कृषी व पशुसंवर्धन, उच्च व तंत्र शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, शालेय शिक्षण व क्रीडा आदी सर्वच विभागांतील विकासकामे व विविध योजनांवरील खर्चाचा आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे सध्या संबंधित सर्वच विभागांतील अधिकारी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात व समितीच्या खातिरदारीच्या तयारीत गुंतले आहे. दरम्यान, शासकीय विश्रामगृहातही दुरूस्तीची कामेही युद्धस्तरावर केल्या जात असून, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी यांनी शनिवारी स्वतः या कामाची पाहणी केली.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमानावरुन बागेश्वर बाबांविरोधात काँग्रेसची निदर्शने

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**
छत्रपती शिवाजी महाराजांविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ अमरावती शहर काँग्रेसच्या वतीने राजकमल चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना महाराष्ट्रात येण्यास कायमस्वरूपी बंदी घालावी, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज हे आपले आराध्य दैवत आहेत. आपल्या आराध्य दैवताचा अपमान कोणताही शिवप्रेमी सहन करू शकत नाही. धिरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी एका कार्यक्रमात इतिहासाची मोडतोड करून आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासंदर्भात अत्यंत चुकीचे वक्तव्य करून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केलेला आहे. ही बाब अत्यंत निंदनीय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा 'छत्रपती शिवाजी महाराजाचा अपमान होत असताना त्याचा विरोध न करता केवळ बघ्याची भूमिका काही



नेत्यांनी घेतली. असा आरोप आंदोलनकर्त्यांनी यावेळी केला. प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केल्याबद्दल अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने धिरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा तसेच भाजपा व रा. स्व. संघाच्या विरोधात २६ एप्रिल रोजी राजकमल चौक येथे तिव्र निदर्शने करून निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केल्याबद्दल धिरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात यावा व त्यांना महाराष्ट्रात येण्यास कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली. या आंदोलनात माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहराध्यक्ष बबलु शेखावत, मनपा विरोधीपक्षनेते विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, नितीन काळे, निलेश गुहे, संकेत कुलट, विनोद मोदी, हाजी नजीर खान बी. के., नगरसेवक विक्की वानखडे, नगरसेविका अर्चना आत्राम, नगरसेविका सुनीता भेले, नगरसेविका राजश्री जढाळे, मैथिली पाटील, वंदना निरगुडे, किरण चांदवडकर, गुड्डू हमीद, सलीमभाई मिरावाले, अभिनंदन पेंढारी, भैय्यासाहेब निचळ, प्रदीप अरबट, दीपक हुंडीकर, विजय बर्वे, संजय शिरभाते, मनोज भेले, प्रभाकर वळसे, सुरेश रतावा, विजय वानखडे, संजय बोबडे, संदेश सिंघई, जितेंद्र वाघ, अनिल तायडे, गजानन रडके आदी सहभागी झाले होते.

## सरस्वता पवार यांचे निधन



**कुऱ्हा-** वऱ्हा येथील प्रा.अर्जुनराव गांजरे यांच्या सासुबाई ग.भा.सरस्वताबाई शंकरराव पवार (रा.जावरा बग्गी) याचे वयाच्या ९६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या पश्चात सात मुलं, तीन मुली जावाई स्नुषा नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व.सरस्वाबाई पवार यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

## राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथे करिअर कट्टा उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**चांदुर रेल्वे-** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सुरू असणारा करिअर कट्टा या उपक्रमातील युवक हा केंद्रबिंदू असून त्यानुरूप महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या उपक्रमाची सुरुवात ग्रंथालयाच्या सहकार्याने संविधानाच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली आणि वाचनातून प्रत्येकांनी एक विचार फलकावर चिटकविले.यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना अर्पित करण्याकरिता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.वडनेरकर यांनी उत्स्फूर्त शब्दांमध्ये विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनाचा अनुग्रह करून आपल्या भविष्याची आखणी करावी असे आवाहन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती ÿ समन्वयक प्रा. एस.ए.वाणी यांची लाभली होती.सोबतच गणित विभाग प्रमुख डॉ.रेखा कोरपे या सुद्धा उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थिनी प्रतीक्षा पाटणे हिने तर आभार करिअर कट्टा समन्वयक प्रा.ममता पळसपगार यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ.पी.आर. वडनेरकर, प्राध्यापकवर्ग आणि कर्मचारी वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले. सोबतच अतुल विद्या मंदिर संस्थेतील सर्व शिक्षक यांनी सुद्धा यामध्ये उत्साहात सहभाग नोंदविला. करिअर कट्टा समन्वयक प्रा.ममता पळसपगार,ग्रंथपाल डॉ.एम.पी. वाघमारे आणि करिअर संसदेचे पदाधिकारी आणि विद्यार्थी यांच्या विशेष आखणीतून आणि समयसूचकतेतून हा कार्यक्रम नियोजित वेळेत उत्साहित वातावरणात पार पडला.

## शुक्रवार पासून पीपल्स कला मंचचे शिबिर

**चांदूर रेल्वे -** विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाव्यतिरिक्त नवनवीन शिकण्यासाठी पीपल्स कला मंचचे नाट्य व छंद शिबिर अमरावती येथे १ मेपासून, तर चांदूर रेल्वे येथे शिबिर ५ मेपासून सुरू होत आहे. नाट्य अभिनय, नृत्य, संगीत याशिवाय निसर्ग ओळख, चित्रकला, मातीकाम, स्टेज डेअरिंग, भाषण कला, पक्षी ओळख, आत्मरक्षण, सायबर क्राईम यावर मार्गदर्शन तसेच एकांकिका स्पर्धा, बालनाट्य स्पर्धा, शॉर्टफिल्म मध्ये काम करण्याची संधी या शिबिरातून दिली जाते. शिबिराला विविध नामवंत कलाकार, तज्ज्ञ मार्गदर्शक भेट देणार आहेत. दहा दिवसीय हे शिबिर अमरावती येथील जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल, तर चांदूर रेल्वे येथील गटसाधन केंद्र येथे होणार आहे. इयत्ता पहिली ते नववीचे सर्व विद्यार्थी भाग घेऊ शकतात, असे शिबिर संयोजक विवेक राऊत, मनीष हटवार, विशाल तराळ, मंगेश उल्हे, उज्ज्वल पंडेकर, अमर इमले, अमर घटारे, तेजस लहाने, रितेश मुंदडा, प्रेरणा वानखडे यांनी कळविले.





## हिवताप व हत्तीरोग विभागाकडून 'जनजागृती'

**नेरपिंगळाई-** २०२६ चे घोषवाक्य 'हिवताप दुरीकरणा साठी कटिबद्ध : आता हे शक्य आहे, आता केलेच पाहिजे,' यानुसार डॉ. विनोद पवार जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती, डॉ. प्रवीण पारिसे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. शरद जोगी जिल्हा हिवताप अधिकारी, डॉ. जुनेद फैसल हत्तीरोग अधिकारी, डॉ. महेश जयस्वाल तालुका आरोग्य अधिकारी मोर्शी, डॉ. स्मिता जयसिंगकर, प्रभारी वैद्यकीय अधिकारी नेरपिंगळाई यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.जागतिक हिवताप दिनाचे औचित्य साधून प्रा. आ. केंद्र नेरपिंगळाई येथे गप्पीमासे पैदास केंद्राची पाहणी करून गप्पी मासे टाकण्यात आले. गावातील डास उत्पत्ती स्थानामध्ये गप्पी मासे सोडण्यात आले. कीटकजन्य आजाराविषयी जनजागृती करण्यात आली. हिवताप आजार पलास्मोडियन परजीवीमुळे होतो, तर अनफिलिस डासाच्या मादीपासून हिवतापाचा प्रसार होतो. कीटकजन्य आजार होऊ नये म्हणून करावयाच्या उपाययोजना नागरिकांना समजावून सांगितल्या. आरोग्य कीटकजन्य आजारविषयक म्हणीच्या घोषणा देण्यात आल्या. प्रतिबंधात्मक याप्रसंगी बी. पी. गवई अमरावती आरोग्य निरीक्षक, किशोर धानोरकर आरोग्य निरीक्षक, रामेश्वर नागपूरकर, प्रफुल्ल दिवे, संदीप भोजने, प्रफुल्ल भालेराव आरोग्यसेवक, विकास कुऱ्हाडे, निवृत्ती होंवळकर, सुखदेव कांबळे, मयूर सवळे, भगवान भोपळे, संजय कोडळकर नियमित क्षेत्र कर्मचारी तसेच डॉ. पूजा वानखडे समुदाय आरोग्य अधिकारी, निलेश भोसले, प्रीती वावरे, मीनल खवले प्रा. आ. केंद्र नेरपिंगळाई येथील कर्मचारी उपस्थित होते.

# गाजीपूर - रुदाळी परिसरातील आदिवासींचे भवितव्य धोक्यात?

**आदिवासींच्या जमिनींवर गैर आदिवासी उद्योगांचे साम्राज्य**

## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ३६ (अ) चे सर्रास उल्लंघन



**अ‍ॅड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी, नरनाळा अभयारण्यालगत असलेल्या गाजीपूर व रुदाळी परिसरात आदिवासींच्या जमिनींवर उघडपणे सुरू असलेल्या गैरप्रकारांनी प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ३६ (अ) ला सर्रास पायदळी तुडवत गैर आदिवासींकडून आदिवासींच्या जमिनींवर बेकायदेशीर ताबे घेत, कोट्यवधींचे उद्योग उभे राहत असताना शासन मात्र मुकाट्याने पाहत असल्याचे चित्र आहे.

नैसर्गिक संपत्तीने समृद्ध आणि पोपटखेड धरणाच्या कुशीत वसलेला हा आदिवासी बहुल परिसर आज खनिज माफियांच्या विळख्यात सापडला आहे. स्थानिक आदिवासींच्या शेतजमिनींचे काही भाग पोटखराब दाखवून त्यांचे अकृषक रूपांतर करण्यात आले आणि त्यानंतर मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन, स्टोन क्रशर व डांबर हॉट मिक्स प्लांटसारखे प्रदूषणकारी उद्योग उभारण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे, या सर्व व्यवहारांमध्ये जिल्हाधिकारी किंवा शासनाची कोणतीही विधिसम्मत परवानगी घेण्यात आलेली नाही.

केवळ १०० रुपयांच्या बाँडवर भाडेपट्टे आणि करारनामे करून आदिवासींच्या जमिनी बळकावल्या गेल्या, आणि त्याच जमिनींवर कोट्यवधींची गुंतवणूक दाखवत उद्योग उभे करण्यात आले. याहूनही गंभीर बाब म्हणजे, या बेकायदेशीर उद्योगांच्या आधारे जिल्हा उद्योग केंद्राकडून कोट्यवधींची सबसिडी उकळण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. म्हणजेच, आदिवासींची फसवणूक तर झालीच, पण शासनालाही फसवून सार्वजनिक पैशांची लूट करण्यात आली.

ज्यांच्या जमिनींवर हे उद्योग उभे आहेत, तेच आदिवासी आजही दारिद्र्य रेषेखालील योजनांचे लाभार्थी आहेत. त्यांच्या अज्ञानाचा आणि गरिबीचा फायदा घेत त्यांच्याच जमिनींवर त्यांना परके बनवले जात आहे. आगामी पिढ्यांचे भविष्य अक्षरशः उद्ध्वस्त करण्याचा हा प्रकार असून, हा केवळ जमीन बळकावण्याचा नव्हे तर सामाजिक अन्यायाचा परमोच्च बिंदू ठरत आहे.प्रशासनाची भूमिका यामध्ये सर्वात संशयास्पद ठरत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उद्योग उभे राहत असताना संबंधित अधिकारी अनभिज्ञ राहू शकतात का? की त्यांनी जाणीवपूर्वक डोळेझाक केली आहे? शासनाचे नोकर म्हणून काम करणारे अधिकारी खरोखरच जनतेसाठी काम करतात की खदान व क्रशर मालकांचे भागीदार झाले आहेत, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, या प्रकरणी तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून बेकायदेशीर भाडेपट्टे, उद्योग आणि सबसिडी घोटाळा उघड करण्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा गाजीपूर-रुदाळीतील आदिवासींचे अस्तित्वच धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

### ■ अधिकारी झाले मुकदर्शक-

एकीकडे आदिवासी विकासाच्या नावाखाली शासन शेकडो कोटींचा निधी खर्च करत असल्याचा दावा करते; मात्र दुसरीकडे त्याच आदिवासींच्या जमिनींची उघड लूट सुरू असताना प्रशासन गप्प का? अकोट तालुक्यातील अधिकाऱ्यांची ही अर्थपूर्ण डोळेझाक त्यांच्या कार्यक्षमतेवरच नव्हे तर प्रामाणिकतेवरही प्रश्न उपस्थित करत आहे.

### ■ लोकप्रतिनिधींचे मौन संशयास्पद

या गंभीर प्रकरणाची माहिती स्थानिक आमदार प्रकाश भारसाकळे, खासदार अनुप धोत्रे आणि पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्यापर्यंत पोहोचली असूनही त्यांनी घेतलेले मौन अनेक शंका निर्माण करणारे आहे. जनतेच्या हक्कासाठी लढण्याची जबाबदारी असलेल्या लोकप्रतिनिधींची ही शांतता नेमकी कोणाच्या फायद्यासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या सर्व गैरप्रकारांना राजकीय आश्रय मिळत असल्याची चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे.

# वाघ शिकार प्रकरणात वनपाल व वनरक्षक निलंबित

## पंढरी बीटमधील घटनेनंतर वनविभागाचा कठोर निर्णय

**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड सर्कल अंतर्गत येणाऱ्या पंढरी बीटमध्ये वाघाच्या संशयित शिकारीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर वनविभागाने कठोर भूमिका घेत संबंधित वनपाल आणि वनरक्षकाला (दि.२७) निलंबित केले आहे. कर्तव्यात निष्काळजीपणा आणि गस्तीत झालेल्या त्रुटीमुळे ही गंभीर घटना घडल्याचा ठपका ठेवत उपवनसंरक्षक आर. के. अर्जुना यांनी ही कारवाई केली.



माहितीनुसार, ३ फेब्रुवारी रोजी पंढरी बीट परिसरात गस्तीदरम्यान वनकर्मचाऱ्यांना एका वाघाचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत आढळून आला होता. अंदाजे आठ वर्षांचा हा वाघ काही दिवसांपूर्वी मृत्यूमुखी पडल्याचे प्राथमिक निरीक्षणातून स्पष्ट झाले. या घटनेमुळे वनविभागात खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत उपवनसंरक्षक आर. के. अर्जुना, सहायक वनसंरक्षक डॉ. मयूर भैलुमे आणि विभागीय वन अधिकारी कमलेश पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यानंतर वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्या चौकशीत वाघाची शिकार झाल्याची बाब समोर आली. तपासात असे निष्पन्न झाले की, संबंधित बीटमध्ये नियमित आणि प्रभावी गस्त न झाल्यामुळे तसेच वन्यजीव सुरक्षेकडे दुर्लक्ष झाल्याने ही घटना घडली. यासाठी पंढरी बीटचे वनपाल सुनील ग्वालबंशी आणि वनरक्षक भारती प्रधान यांना जबाबदार ☞(पान २ वर)

# कपिलवस्तू नगरात कौटुंबिक वादातून मुलाने केली आईची हत्या

**अमरावती/प्रतिनिधी: -** शहरात माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. घरगुती कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान हत्येत झाले असून, पोटच्या मुलानेच आईवर कुऱ्हाडीने सपासप वार करून तिला यमसदन धाडले. ही थरारक घटना गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कपिलवस्तू नगर येथे घडली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मृत महिलेचे नाव भारती दीपक काळे (४६) असून, आकाश दीपक काळे (२७) असे आरोपी मुलाचे नाव आहे. शनिवारी (दि.२५) रात्री ८ वाजेच्या सुमारास भारती आणि आकाश यांच्यात घरगुती कारणावरून जोरदार भांडण झाले. वादाच्या भरात रागावरचे नियंत्रण सुटलेल्या आकाशने घरात असलेली कुऱ्हाड उचलली आणि आईवर भीषण हल्ला केला. या हल्ल्यात भारती काळे या गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडल्या.

हल्ला केल्यानंतर आरोपी आकाश घटनास्थळावरून पसार झाला. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या भारतीने तातडीने आपल्या मुलीला आणि जावयाला

# शौचालयाच्या टाक्यात पडून ८ वर्षीय बालकाचा मृत्यू

## शिक्षक कॉलनीत दुर्दैवी घटना, परिसरात हळहळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या शिक्षक कॉलनी परिसरात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. खेळताना शौलालयासाठी बांधण्यात आलेल्या उघड्या टाक्यात पडून ८ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

मृत बालकाचे नाव कार्तिक अमोल ठाकरे (वय ८) असे असून तो परिसरातील इतर मुलांसोबत खेळत होता. खेळाच्या नादात त्याला परिसरात शौचालयासाठी बांधलेली टाकी दिसून आलीं नाही आणि तो थेट त्यात पडला. घटनेच्या वेळी सोबत असलेली इतर मुले घाबरून तेथून निघून गेल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. दरम्यान, बराच वेळ कार्तिक घरी परतला नाही म्हणून त्याचे आई-वडील त्याचा शोध घेण्यासाठी बाहेर पडले. शोध घेत असताना त्यांना या दुर्घटनेची माहिती मिळाली. माहिती मिळताच कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. मुलाला टाक्यात पडल्याचे लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल ☞(पान २ वर)

# विद्युत प्रवाहाचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू



चांदूररेल्वे/प्रतिनिधीः- चांदूर रेल्वे तालुक्यातील कवठा येथील एका ४० वर्षीय युवा शेतकऱ्याचा शेतात काम करत असताना विद्युत प्रवाहाचा (करंट) धक्का लागून मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना सोमवार, २७ एप्रिल रोजी घडली. वैभव संजय जुमडे असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा ☞(पान २ वर)

# रहाटगावात प्राणघातक हल्ला -दोघे जखमी

## एकाची प्रकृती गंभीर, नागपूरला रेफर

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रहाटगाव परिसरात दोन इसमांवर चाकूने प्राणघातक हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले आहे.



जखमींची नावे बाळू उर्फ अनिल नामदेव अडाळसे (वय ४०) आणि संजय नामदेव अडाळसे (वय ३५, दोघेही रा. रहाटगाव) अशी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात कारणावरून दोघांवर चाकूने हल्ला करण्यात आला. हल्ल्यानंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर जखमींना तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर बाळू अडाळसे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नागपूर येथे रेफर करण्यात आल्याची माहिती आहे. संजय अडाळसे यांच्यावर जिल्हा सामान्य ☞(पान २ वर)

# स्वस्तिक स्क्रॅप सेंटरवर पोलिसांची धाड १.४९ लाखाचे मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** जवाहर गेट परिसरातील स्वस्तिक स्क्रॅप सेंटरवर पोलिसांनी सोमवारी दुपारी धाड मारून येथून एमएसईबी वायरचे एकूण १७ बंडल अंदाजे किंमत १ लाख ४९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. स्वस्तिक स्क्रॅप सेंटर दुकानांमध्ये एमएससीबी चे अ‍ॅल्युमिनियम वायर मोठ्या प्रमाणात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यावरून पोलिसांनी दुकानाची




पाहणी केली असता तिथून १ लाख ४९ हजार ७०० रूपयांचे ४६९ किलो अ‍ॅल्युमिनियमचे वायर मिळून आले. सेंटर मालक निरंजन संजय अग्रवाल (वय २५, जवाहर ☞(पान २ वर)

# अनाथ विद्यार्थिनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल

## निवासी शाळेच्या निष्काळजीपणाचा संतापजनक प्रकार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी: -** अंजनगाव सुर्जी येथील ग्रामीण रुग्णालयात एका अनाथ विद्यार्थिनीवर उपचार सुरू असताना संबंधित निवासी शाळेच्या प्रशासनाकडून झालेल्या निष्काळजीपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. समीक्षा रवींद्र इंगळे (रा.विश्रोळी ) इयत्ता ७ वी ही अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींच्या शासकीय निवासी शाळा, पांढरी खानमपूर (ता. अंजनगाव सुर्जी) येथील विद्यार्थिनी असून, तिला पोटदुखीच्या त्रासामुळे रुग्णालयात भरती करण्यात आले होते.



सोमवारपासून उपचार सुरू असतानाही शाळेच्या मुख्याध्यापिका किंवा अधीक्षिका यांनी एकदाही रुग्णालयात भेट दिली नसल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. चौकीदाराने मुलीला रुग्णालयात दाखल केल्यानंतर शाळा प्रशासनाने पुढील जबाबदारी झटकून टाकल्याचे चित्र दिसून आले. मुलीची तब्येत अधिकच बिघडत गेली असून तिला रक्ताच्या उलट्या देखील झाल्या. त्यामुळे ती भयभीत झाली होती. तिच्यासोबत असलेली तिची वृद्ध आत्या देखील तिथेच आजारी पडली आणि तिलाही सलाईन लावावी ☞(पान २ वर)

'वस्तीगृहातील संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून कसूर आढळल्यास कडक कारवाई करू'

**-राजेंद्र जाधववर,** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य अधिकारी, अमरावती

'मुलीला भरती करून सोडून दिलं, कोणीही विचारपूस केली नाही; मी सुद्धा आजारी पडले, आता तिची काळजी कोण घेणार?'

— **शांताबाई इंगळे,** नातेवाईक

# दर्यापूर तहसिलसमोर अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न

**पोलिसांनी वेळीच रोखले, प्रशासनात खळबळ**



**खल्लार/प्रतिनिधीः-** रेतीचा जप्त केलेला ट्रॅक्टर सोडावा म्हणून रेती ट्रॅक्टर मालकाने चक्क तहसिल कार्यालया समोर आज (दि.२८) अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला आहे. दर्यापूर आणि येवदा पोलिसांनी हा प्रयत्न हाणून पाडत आंदोलनकर्त्याला वाचवले.

नागेश वावरे रा. करतखेड असे आंदोलन कर्त्यांचे नाव आहे.दर्यापूर तालुक्यात महसूल प्रशासनाच्या वतीने वाळू घाट लिलाव करण्यात आले आहे. या वाळू घाटातून दररोज मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा केला जात आहे. शासनाने वाळू उचलण्यासाठी वाळू व्यावसायिकांना ☞(पान २ वर)

■ अवैध रेतीचा व्यवसाय करणाऱ्यांवर महसूल पथक नेहमीच कारवाई करते, ट्रॅक्टर पकडला तेव्हा ते नियमाचे उल्लंघन करत रेती वाहून नेत असताना ही करावाई झाली आहे. त्यामुळे त्याचा सदर ट्रॅक्टर तहसिल कार्यालयामध्ये जप्त करण्यात आला व नियमानुसार कारवाई करत त्याच्यावर दडात्मक केली आहे. **-रविंद्र कानडजे** -तहसिलदार, दर्यापूर

# कृषी केंद्र संचालकांच्या संपामुळे व्यवहार ठप्प

**जिल्ह्यातील १५०० दुकानांवर टाळे**

## खत कंपन्यांच्या मनमानीचा विरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासकीय खत कंपनी इफको, आरसीएफ आणि इतर कंपन्यांच्या मनमानी कामकाजाच्या विरोधात आज सोमवार २७ एप्रिल रोजी कृषी केंद्र संचालकांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपाला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील १५०० दुकानांवर सकाळपासून ताळे दिसले. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा




लागत आहे. शासकीय खत कंपनी सरकारी नियमानुसार माल खरेदी केल्यावर इतर माल घेण्यासाठी त्यांना बाध्य करतात. ही अशी सामग्री असते ज्यांची वर्षभर विक्री होत नाही. याचा फटका दुकानदाराला बसतो. खत कंपनी द्वारा दिलेला माल जर निकृष्ट दर्जाचा निघाला तर संचालकांना आरोपी बनविले जाते. केंद्र संचालकांवर हा अन्याय ☞(पान २ वर)

# १० कृषी केंद्रांचे परवाने निलंबित

## -कृषी विभागाची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी आणि कृषी निविष्ठांची गुणवत्ता राखण्यासाठी जिल्हा कृषी विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील कृषी केंद्रांची कसून तपासणी करण्यात येत आहे. यात गंभीर त्रुटी आढळल्याने १० कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत, तर ६ केंद्रांना कडक ताकीद देण्यात आली आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहूल सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली नेमण्यात आलेल्या भरारी पथकांनी जिल्ह्यातील विविध केंद्रांची तपासणी केली. या तपासणीत ई-पॉस मशीनवरील नोंद आणि दुकानातील प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळणे, खतांची छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे किंवा पक्के बिल न देणे, परवाना नसताना बियाण्यांची साठवणूक करणे किंवा नोंदवही अद्ययावत नसणे, अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांची ☞(पान २ वर)

# वरूडातील आडवडी बाजाराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**वरूड/प्रतिनिधीः-** वरूडातील नागपूर रोडवरील २.२४ हेक्टर क्षेत्रावरील आठवडी बाजाराच्या निर्मितीसाठी जागा आरक्षित करण्यात आली होती. त्या जागेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या बाजारामुळे स्थानिक शेतकरी, छोटे व्यावसायिक आणि विक्रेत्यांना लाभ मिळणार होता व थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध होणार होती. त्यामुळे ☞(पान २ वर)

## -आरक्षित जागेचा प्रश्न न्यायप्रविष्ट, न्यायालयाच्या निकालाकडे सर्वांच्या नजरा!

■ आठवडी बाजाराच्या आरक्षित जागेसाठी मी शासनाकडे सतत पाठपुरावा केला आहे. शासनाने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू केलेली आहे. जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लागावे याकरिता मी आमदार म्हणून माझ्या कडुन सतत प्रयत्नशील आहे. त्यामुळे ही जमीन नगर परिषदेला बाजारपेठेकरिता उपलब्ध व्हावी यासाठी मी आणि नगर परिषदेचे नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक पुढेही प्रयत्नशील राहणार आहोत. परंतु , ते प्रकरण न्यायालयात गेल्याने आम्ही आमची बाजू योग्य पद्धतीने न्यायालयात मांडणार आहोत. **-उमेश उर्फ चंदु यावलक-** आमदार वरूड मोर्शी मतदार संघ